सकाळ

# जिल्हा मुख्यालयाला टंचाई आराखड्याची प्रतीक्षा

## उपाययोजनांसाठी ७.३८ कोटी; जिल्हा परिषदेचा संथगती कारभार

■ सकाळ वृत्तसेवा

नाशिक, ता. २१ : जिल्ह्यातील संभाव्य टंचाई निवारणासाठी जिल्हा परिषदेने सात कोटी ३८ लाखांचा कृती आराखडा तयार केला आहे. या आराखड्यात टँकरसह विहिरी अधिग्रहण व वेगवेगळ्या उपाययोजना प्रस्तावित केल्या आहेत. पण वारंवार पाठपुरावा करूनही अद्याप जिल्हा परिषदेकडून हा अहवाल प्राप्त झाला नसल्याची माहिती जिल्हा प्रशासनातील सूत्रांनी दिली.

दर वर्षी १५ ऑक्टोबरला धरणांमधील उपलब्ध साठा तसेच पडलेल्या पावसाच्या सरासरीवरून जिल्ह्याचा पुढील वर्षीचा टंचाई कृती आराखडा तयार करण्यात येतो. जिल्हा परिषदेच्या पाणीपुरवठा विभागातर्फे तयार करण्यात येणाऱ्या आराखड्यात तीन टप्पे केले जातात. प्रत्येक टप्प्यानुसार टँकर, विहिरी अधिग्रहण, तात्पुरत्या नळयोजनांच्या तरतुदी करण्यात येतात. अंतिम मान्यतेसाठी हा आराखडा जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर केला जातो. परंतु, यंदा जानेवारीचे तीन आठवडे संपुष्टात येऊनही जिल्हा परिषदेने तयार केलेला आराखडा जिल्हा मुख्यालयाकडे प्राप्त झालेला नसल्याने आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे.

### नियोजन असे

- टंचाई निवारणासाठी टँकर प्रस्तावित
- एप्रिल-मेमध्ये सर्वाधिक टंचाईच्या झळा
- गावांमध्ये तात्पुरत्या नळयोजना प्रस्तावित

### आराखड्याला विलंब

जिल्ह्यात या वर्षी सरासरीपेक्षा अधिक पाऊस झाल्याने नद्या-नाले व गावोगावीचे पाण्याचे स्रोत तुडुंब भरले आहेत. त्यामुळे पहिल्या टप्प्यात जिल्ह्यात टंचाई भासली नाही. पण, फेब्रुवारीपासून उन्हाचा तडाखा वाढण्याची शक्यता आहे. परिणामी संभाव्य टंचाईच्या पार्श्वभूमीवर आतापासूनच उपाययोजना राबविणे गरजेचे आहे. त्यासाठी जिल्हा परिषदेच्या पाणीपुरवठा तयार केलेल्या सात कोटी ३८ लाखांच्या आराखड्याला जिल्हाधिकाऱ्यांची तातडीने मंजुरी घेणे आवश्यक आहे. परंतु, जिल्हा परिषदेच्या वेळकाढू धोरणामुळे आराखड्याला विलंब होत आहे.

Nashik, Main
22/01/2026 Page No. 5

सकाळ

# लग्रो इंडियाचा देशातील सर्वांत मोठा प्रकल्प नाशिकमध्ये

## उत्पादनास प्रारंभ : ३० हजार चौरस मीटर क्षेत्रफळावर प्रकल्पाची उभारणी

**सकाळ वृत्तसेवा**

नाशिक, ता. २१ : औद्योगिक प्लग आणि सॅकिटच्या उत्पादनात अग्रेसर असलेल्या 'लग्रो समूहा'ने देशातील आतापर्यंतचा सर्वांत मोठा प्रकल्प नाशिकमध्ये सुरू केला आहे. ३० हजार चौरस मीटर क्षेत्रफळावरील या प्रकल्पाचे उद्‌घाटन झाले. अत्याधुनिक तंत्रज्ञानाची उत्पादने बाजारात दाखल होण्यास सुरुवात होत आहे.

नाशिकच्या प्रकल्पात 'बस बार ट्रंकिंग सिस्टिम्स', 'डिस्ट्रिब्युशन बोर्ड', 'रॅक्स', 'कॅब्लोफिल केबल ट्रे', तसेच औद्योगिक प्लग आणि सॅकिटचे उत्पादन केले जाणार आहेत. निवडक उत्पादनांची निर्यात आधीच सुरू झाली असून, भविष्यात अधिक उत्पादन श्रेणींमध्ये जागतिक निर्यात वाढविण्याची योजना आहे. त्यामुळे हा प्रकल्प 'मेड इन इंडिया, मेड फॉर द वर्ल्ड' असा जागतिक पुरवठा केंद्र म्हणून विकसित होत आहे. या प्रकल्पाच्या छतावर एक मेगावॉट क्षमतेची सौरऊर्जा प्रणाली बसविण्यात आली आहे. शून्य द्रव उत्सर्जन धोरणाचे पालन केले जात असल्याने कंपनीच्या वतीने सांगण्यात आले. 'ग्रुप लग्रो इंडिया'चे सीईओ आणि व्यवस्थापकीय संचालक टोनी बरलॉं म्हणाले, 'नाशिक येथील प्रकल्प लग्रो इंडियाच्या प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा आहे. भारतात दीर्घकालीन क्षमतांची उभारणी करण्यावर आमचा सातत्यपूर्ण भर राहील. या प्रकल्पामुळे भारतात व जागतिक बाजारपेठांमध्ये आमचा ग्राहक, कर्मचारी आणि सर्व भागधारकांसाठी मोठी मूल्यनिर्मिती होईल, याची आम्हाला पूर्ण खात्री आहे.'

Nashik, Main
22/01/2026 Page No. 5

सकाळ

# इगतपुरी तालुक्यात नैसर्गिक शेतीची चळवळ बहरली

## तीनशे हेक्टरवर विषमुक्त अन्नाचा संकल्प; 'आत्मा'च्या पुढाकाराने सहा गटांची स्थापना

सकाळ वृत्तसेवा

**गोंदे दुमाला, ता. २१ : रासायनिक खतांच्या आणि कीटकनाशकांच्या अतिवापरामुळे जमिनीची ढासळलेली प्रत आणि आरोग्यावर होणारे दुष्परिणाम रोखण्यासाठी इगतपुरी तालुक्यात आता नैसर्गिक शेतीची चळवळ उभी राहत आहे. महाराष्ट्र शासनाच्या राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियानांतर्गत तालुक्यात ३०० हेक्टर क्षेत्रावर नैसर्गिक शेतीशी निगडित सहा गट स्थापन करण्यात आले आहेत. यामुळे भविष्यात इगतपुरी तालुका विषमुक्त शेतीकडे वाटचाल करत असल्याचे शुभ संकेत मिळत आहेत.**

रासायनिक खतांच्या माऱ्यामुळे जमिनीची नापिकता वाढत असल्याने जमिनीचे आरोग्य सुधारण्यासाठी कृषी विभागाने कंबर कसली आहे. कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) चे प्रकल्प संचालक अभिमन्यू काशीद व इगतपुरीचे तालुका कृषी अधिकारी रामदास मडके यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविला जात आहे. शेतकऱ्यांचे गट तयार करून त्यांना नैसर्गिक शेतीचे ज्ञान देणे, सेंद्रिय व नैसर्गिक पद्धतींचा अवलंब करण्यास प्रवृत्त करणे आणि शेतमालाचे प्रमाणीकरण करणे हे या अभियानाचे मुख्य उद्दिष्ट आहे.

शेतकऱ्यांनी गटाच्या माध्यमातून एकत्रित येत सेंद्रिय व नैसर्गिक शेती योजना पुढे नेण्यासाठी चर्चासत्रांचे आयोजन केले जात आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याच्या दृष्टीने कृषी विभाग वेळोवेळी मार्गदर्शन करत आहे. प्रत्येक गटातून दोन याप्रमाणे एकूण १२ कृषी सखींची निवड करण्यात आली असून, त्यांना कृषी विज्ञान केंद्रामार्फत पाच दिवसांचे प्रशिक्षण देण्यात आले आहे. या उपक्रमामुळे जमिनीचा सेंद्रिय कर्ब वाढवून सुपीकता टिकवण्यास मदत होणार आहे.




**मोगरे (ता. इगतपुरी) :** नैसर्गिक शेतीतून पिकविलेला माल दाखविताना शेतकरी देवराम गवारी. दुसऱ्या छायाचित्रात प्रशिक्षण वर्गात शेतकऱ्यांना जीवामृत व दशपर्णी अर्क तयार करण्याचे मार्गदर्शन करताना प्रकल्प संचालक अभिमन्यू काशीद. शेजारी श्यामराव मोगल व कृषी सखी शारदा तांदळे.

### यशाची 'पंचसूत्री'

नैसर्गिक शेतीमध्ये बीजामृत, जीवामृत, नैसर्गिक आच्छादन, दशपर्णी अर्क आणि पीक विविधता/मिश्र पीकपद्धती या 'पंचसूत्री'चा वापर केला जातो. यामुळे जमिनीचा पोत सुधारतो आणि उत्पादन खर्चात मोठी बचत होते. शेतकऱ्यांनी जास्तीत जास्त नैसर्गिक शेतीचा अवलंब करावा, असे आवाहन प्रकल्प संचालक अभिमन्यू काशीद यांनी केले.

| | |
|---|---|
| एकूण गट | ६ (राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियानांतर्गत) |
| प्रतिगट क्षेत्र | ५० हेक्टर |
| एकूण क्षेत्र | ३०० हेक्टर |
| सहभागी शेतकरी | ७५० |
| नियुक्त कृषी सखी | १२ (प्रशिक्षित) |

### नैसर्गिक शेतीची मुख्य उद्दिष्टे

- **रसायनमुक्त शेती :** रासायनिक खते व कीटकनाशकांचा वापर पूर्णपणे थांबविणे.
- **जमीन आरोग्य :** सेंद्रिय कर्ब वाढवून जमिनीची सुपीकता व पाणी धरून ठेवण्याची क्षमता वाढविणे.
- **पोषणमूल्य :** सुरक्षित, सकस आणि पोषणयुक्त शेतमाल उत्पादित करणे.
- **खर्च कपात :** स्थानिक नैसर्गिक संसाधनांचा वापर करून उत्पादन खर्च कमी करणे.
- **जैवविविधता :** मित्र कीटक, प्राणी आणि सूक्ष्मजंतूंचे संवर्धन करणे.

सकाळ

# परिक्रमा मार्गाच्या भूसंपादनास हरकती

## नियुक्त अधिकाऱ्यांचा गावांमधील शेतकऱ्यांशी संवाद

**सकाळ वृत्तसेवा**

नाशिक, ता. २१ : सिंहस्थ-कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिक शहराभोवती उभारण्यात येणाऱ्या परिक्रमा (बाह्य रिंग रोड) मार्गासाठी भूसंपादनाची प्रक्रिया सुरू झाली असून, जिल्हा प्रशासनाने यासाठी अधिसूचना प्रसिद्ध केल्या आहेत. मात्र, या अधिसूचना जाहीर होताच बाधित शेतकऱ्यांनी हरकती नोंदविण्यास सुरवात केल्याने प्रशासनाची कोंडी झाली आहे. परिणामी, भूसंपादनासाठी नियुक्त करण्यात आलेले अधिकारी थेट गावांमध्ये जाऊन शेतकऱ्यांशी संवाद साधत आहेत.

केंद्र व राज्य शासनाच्या संयुक्त सहकार्यातून नाशिक शहराभोवती सुमारे ६६ किलोमीटर लांबीचा बाह्य रिंगरोड उभारण्यात येत आहे. या प्रकल्पासाठी २५ गावांतील ३८६.३८ हेक्टर जमीन संपादित केली जाणार असून, एकूण १ हजार ९६२ गट यामुळे बाधित होणार आहेत. भूसंपादनाची प्रक्रिया राबवण्यासाठी जिल्हा प्रशासनाने उपजिल्हाधिकारी दर्जाचे सात अधिकारी नियुक्त केले आहेत. या अधिकाऱ्यांमार्फत टप्प्याटप्प्याने गावनिहाय अधिसूचना प्रसिद्ध केल्या जात आहेत.

मात्र, अधिसूचना जाहीर होताच शेतकऱ्यांकडून नाराजीचा सूर उमटत आहे. जमीन संपादनाच्या मोबदल्याबाबत स्पष्टता नसणे, तसेच इतर लाभांची पूर्तता होईपर्यंत जमीन देण्यास शेतकऱ्यांनी नकार दिला आहे. त्यामुळे अधिसूचना प्रसिद्ध झाल्यानंतर मोठ्या प्रमाणावर हरकती दाखल केल्या जात असून, प्रशासनाची डोकेदुखी वाढली आहे.

दरम्यान, नाशिक शहराभोवती उभारण्यात येणाऱ्या या रिंग रोड प्रकल्पासाठी सुमारे ७ हजार ८०० कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. सिंहस्थ कुंभमेळ्यापूर्वी हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प पूर्ण करण्यासाठी शासन आग्रही असून, त्यादृष्टीने ३१ मार्चपर्यंत संपूर्ण जमीन ताब्यात घेण्याचे उद्दिष्ट प्रशासनाने ठेवले आहे. मात्र, प्रत्यक्षात बाधित शेतकऱ्यांचा तीव्र विरोध पाहता हे उद्दिष्ट गाठणे आव्हानात्मक ठरत आहे.

या पार्श्वभूमीवर भूसंपादनासाठी नियुक्त केलेले सातही अधिकारी प्रत्यक्ष फिल्डवर उतरले असून, संबंधित गावांमध्ये जाऊन शेतकऱ्यांशी थेट संवाद साधत आहेत. या बैठकीदरम्यान शेतकऱ्यांच्या शंकांचे निरसन करण्याचा प्रयत्न केला जात असून, काही ठिकाणी सकारात्मक प्रतिसाद मिळत असल्याची माहिती एका वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली आहे.

सकाळ

# नाशिकला ३०,१०० कोटींची गुंतवणूक

## उद्योगमंत्री उदय सामंत : ७ उद्योजकांशी सामंजस्य करार, १३ लाख रोजगारांची शक्यता

■ सकाळ वृत्तसेवा

**नाशिक, ता. २१ : दावोस येथे सुरू असलेल्या जागतिक आर्थिक परिषदेतून महाराष्ट्रासाठी आतापर्यंत ३७ लाख कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे सामंजस्य करार झाले असून, त्यातील ३० हजार १०० कोटींचे सात करार एकट्या नाशिक विभागासाठी झाले असल्याची माहिती राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दिली.**

जागतिक आर्थिक मंच च्या वार्षिक परिषदेसाठी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व मंत्री सामंत दावोस येथे उपस्थित आहेत. या परिषदेत कोकण, नागपूर, छत्रपती संभाजीनगर आणि नाशिक विभागात उद्योग उभारणीसाठी देश-विदेशातील उद्योजकांशी सामंजस्य करार करण्यात आले आहेत.

या एकूण गुंतवणुकीतून राज्यात सुमारे १३ लाख रोजगारनिर्मिती होईल, असा विश्वास मंत्री सामंत यांनी व्यक्त केला. केवळ देशांतर्गतच नव्हे, तर ४० ते ५० टक्के गुंतवणूक ही परकीय स्वरूपातील असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. आजवर झालेल्या सर्व करारांची संपूर्ण व पारदर्शक माहिती गुरुवारी जनतेसमोर सादर केली जाईल, असेही त्यांनी सांगितले.

### महिंद्राचा नाशिक प्रकल्प विस्तार

■ वाहननिर्मिती क्षेत्रातील महिंद्रा अ‍ॅन्ड महिंद्रा कंपनी नाशिकमधील प्रकल्पाचा विस्तार करणार असून, याबाबतचा करार दावोस परिषदेत झाला आहे. इगतपुरी तालुक्यातील आडवण येथे ३०० एकरवर हा प्रकल्प उभारला जात असून, त्यातून १,५०० ते २,००० रोजगारनिर्मिती होण्याची शक्यता आहे.

### नाशिक विभागात उद्योग विस्ताराला गती

नाशिक विभागात ग्लोबल प्रायव्हेट लिमिटेड, जनरल पॉलिफिल्म्स तसेच संरक्षण क्षेत्राशी संबंधित कंपन्यांशी एकूण ३०,१०० कोटी रुपयांचे करार करण्यात आले आहेत. यामुळे मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती होणार असून, सध्या कार्यरत उद्योगांचाही विस्तार केला जाणार आहे. दरम्यान, अदानी उद्योग समूह यांच्यामार्फत प्रस्तावित ६ लाख कोटी रुपयांच्या गुंतवणुकीसाठी स्थळनिश्चिती अद्याप झालेली नाही, असे मंत्री सामंत यांनी स्पष्ट केले.

Nashik, Main
22/01/2026 Page No. 3

सकाळ

# जिल्ह्यात विकासाचा वेग वाढणार

## दुसऱ्या टप्प्यात २७0 कोटींचा निधी; रखडलेल्या कामांना हिरवा कंदील

■ सकाळ वृत्तसेवा

नाशिक, ता. २१ : निवडणूक आचारसंहितेमुळे ठप्प झालेल्या विकासकामांना अखेर गती मिळणार आहे. राज्य सरकारने नाशिक जिल्ह्यासाठी दुसऱ्या टप्प्यात २७० कोटी रुपयांचा निधी मंजूर केला असून, जिल्हा नियोजन विभागाने या निधीचे प्राधान्यक्रमानुसार नियोजन सुरू केले आहे. त्यामुळे रस्ते, आरोग्य व तातडीच्या विकासकामांना लवकरच चालना मिळणार आहे.

पालिका व महापालिका निवडणुकांमुळे जिल्ह्यातील अनेक विकासकामांवर ब्रेक लागला होता. आचारसंहितेमुळे जिल्हा नियोजन समित्यांच्या निधीवाटपावर निर्बंध होते. मात्र आचारसंहिता संपताच राज्य सरकारने निधी वितरणाला सुरवात केली असून, त्यानुसार नाशिक जिल्ह्यासाठी दुसऱ्या टप्प्यातील २७० कोटी रुपये उपलब्ध करून दिले आहेत. चालू आर्थिक वर्षासाठी जिल्ह्याचा एकूण सर्वसाधारण आराखडा ९०० कोटी रुपयांचा आहे. यापूर्वी ऑक्टोबरअखेर पहिल्या टप्प्यातही २७० कोटींचा निधी मिळाला होता. मात्र कामांची संख्या आणि मर्यादित निधी यामुळे प्रशासनाला तारेवरची कसरत करावी लागली होती. आता दुसऱ्या टप्प्यातील निधी मिळाल्याने रखडलेल्या कामांना गती देण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या निधीतून तातडीची विकासकामे, आरोग्य सुविधा, रस्ते व अन्य महत्त्वाच्या प्रकल्पांवर खर्च केला जाणार असल्याची माहिती प्रशासनातील सूत्रांनी दिली.

### ३६० कोटींची प्रतीक्षा कायम

■ जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत सर्वसाधारण आराखड्याचा एकूण निधी ९०० कोटी रुपये आहे. आतापर्यंत राज्य स्तरावरून ५४० कोटी रुपये प्राप्त झाले असून, अद्याप ३६० कोटी रुपये मिळणे बाकी आहेत. आर्थिक वर्ष समाप्तीसाठी आता अडीच महिन्यांपेक्षा कमी कालावधी शिल्लक आहे. उर्वरित निधी कधी मिळेल, याची वाट न पाहता प्रशासनाने आतापासूनच कामांचे नियोजन सुरू केले असून, निधी उपलब्ध होताच तो तातडीने संबंधित यंत्रणांना वितरित करून शंभर टक्के खर्चाचे उद्दिष्ट साध्य करण्याचा निर्धार करण्यात आला आहे.

सकाळ

# पदोन्नतीसाठी टीईटी उत्तीर्ण अनिवार्य

## संदिग्धता दूर : मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख, विस्ताराधिकारी पदासाठी ज्येष्ठांची परीक्षा

■ सकाळ वृत्तसेवा

**येवला/नाशिक, ता. २१ : न्यायालयाने निर्णय दिला, सोशल मीडियावर बातम्यांचा महापूर आला; मात्र टीईटी उत्तीर्ण न झाल्यास पुढे काय, याबाबत शिक्षकांमध्ये प्रचंड संभ्रम होता. अखेर शिक्षण विभागाने स्पष्ट आदेश काढत पदोन्नतीसाठी टीईटी परीक्षा अनिवार्य असल्याचा ठोस निर्णय घेतला आहे.**

पदवीधर शिक्षक, मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख व विस्ताराधिकारी या पदांवर पदोन्नती हवी असेल, तर टीईटी उत्तीर्ण व्हावेच लागेल, असा स्पष्ट आदेश जारी करण्यात आला आहे. त्यामुळे वर्षानुवर्षे सेवा दिलेल्या, प्रमोशनच्या प्रतीक्षेत असलेल्या हजारो ज्येष्ठ शिक्षकांसमोर आता कठोर वास्तव उभे राहिले आहे.

### सर्वोच्च न्यायालयाचा दणका

सर्वोच्च न्यायालयाने १ सप्टेंबर २०२५ मध्ये दिलेल्या निकालानुसार, टीईटी परीक्षा केवळ नवीन भरतीसाठीच नव्हे, तर पदोन्नतीसाठी आणि सेवेत टिकून राहण्यासाठीही सक्तीची करण्यात आली आहे.

पहिली ते आठवीपर्यंत अध्यापन करणारे सर्व शिक्षक, तसेच प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांना पदोन्नती हवी असल्यास टीईटी अपरिहार्य ठरविण्यात आली आहे. यामुळे पदोन्नतीची स्वप्ने रंगविणाऱ्या शिक्षकांच्या स्वप्नांवर न्यायालयीन शिक्का बसला आहे.

### टीईटी नाही, तर प्रमोशन नाही!

राज्यातील सरकारी व शासनमान्य शाळांतील शिक्षकांसाठी आता पदोन्नतीसाठी टीईटी उत्तीर्ण होणे बंधनकारक झाले आहे. न्यायालयाचा आदेश पारित झाल्यापासून दोन वर्षांच्या मुदतीत टीईटी उत्तीर्ण होण्याच्या अटीशिवाय कोणतीही पदोन्नती मान्य होणार नाही. टीईटीसह इतर शैक्षणिक अर्हता पूर्ण करणाऱ्यांनाच यापुढे पदोन्नती मिळणार. त्यामुळे सेवा ज्येष्ठतेच्या जोरावर पदोन्नती मिळेल, ही धारणा आता मोडीत निघाली आहे.

उतारवयात टीईटीची परीक्षा देण्याची वेळ आल्याने अनेक ज्येष्ठ शिक्षकांपुढे मोठी मानसिक कसरत उभी राहिली आहे. टीईटी ही आता केवळ परीक्षा उरलेली नाही; ती पदोन्नतीची चावी, सेवेत टिकण्याची अट आणि शिक्षकांच्या भवितव्याचा निर्णायक टप्पा ठरली आहे. सरकार, न्यायालय आणि नियमांच्या त्रिकोणात आता शिक्षकांची खरी परीक्षा सुरू झाली आहे.

### १६ जानेवारीच्या टीईटी निकालावर एक दृष्टिक्षेप

- एकूण नोंदणी ........................ ३,८२,६६७ उमेदवार
- पात्र उमेदवार ........................ अंदाजे ३८ ते ४० हजार
- यशाचे प्रमाण........................ सुमारे १० टक्के
- २०२४ चा निकाल.................. फक्त ३.३८ टक्के

### पात्रतेसाठी आवश्यक गुण

- खुला प्रवर्ग........................ ६० टक्के (१५० पैकी ९० गुण)
- राखीव प्रवर्ग ........................ ५५ टक्के (१५० पैकी ८२.५ गुण

### राज्यभर संभ्रम... अखेर शासनाचा आदेश

■ स्पष्ट शासन आदेश नसल्याने शिक्षणाधिकाऱ्यांपुढे मोठा पेच निर्माण झाला होता. पदोन्नतींना मान्यता द्यावी की नाही, याबाबत राज्यभर संभ्रमाचे वातावरण होते. या पार्श्वभूमीवर शिक्षण संचालकांनी शासनाकडे विचारणा केली आणि त्यानंतर शिक्षण विभागाने सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचा संदर्भ देत अंतिम आणि बंधनकारक निर्णय घेतला.

**TET**

**Teacher Eligibility Test**

### २०११ पूर्वीच्या शिक्षकांना दिलासा?

■ केंद्र सरकारने २०११ पूर्वी व त्यानंतर नियुक्त शिक्षकांची माहिती मागविली आहे. तसेच किती शिक्षक टीईटी उत्तीर्ण आहेत व किती नाहीत, याचाही तपशील संकलित केला जात आहे. आरटीई कायदा २०११ नंतर लागू झाल्याने, २०११ पूर्वी नियुक्त शिक्षकांना सवलत मिळू शकते, अशी चर्चा सुरू आहे. मात्र सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या दोन वर्षांच्या मुदतीत किती परीक्षा घेता येतील, याच्या नियोजनासाठीच ही माहिती मागविण्यात आल्याचेही सांगितले जात आहे. अंतिम निर्णय होईपर्यंत सस्पेन्स कायम आहे.

Nashik Nashik-Today
22/01/2026 Page No. 3

सकाळ

# ग्रामपंचायतीसह १,०६१ नागरिकांचे भूसंपादन

## मनमाड–इंदूर रेल्वे प्रकल्पासाठी 'लळिंग' ग्रामपंचायत भवनही जाणार

■ सकाळ वृत्तसेवा

मालेगाव शहर, ता.२१ : मनमाड–इंदूर रेल्वे प्रकल्पांतर्गत भूसंपादनामुळे सर्वाधिक बाधित नागरिकांची संख्या धुळे जिल्ह्यात आढळून आली आहे. धुळे तालुक्यातील लळिंग गावात एक हजार ६१ नागरिकांच्या जमिनीचे संपादन करण्यात आले आहे.

या प्रकल्पातील एकाच गावातील आतापर्यंतचा सर्वात मोठा भूसंपादनाचा प्रकार मानला जात आहे. विशेष म्हणजे या भूसंपादनात ग्रामपंचायत भवनाचाही समावेश आहे.

**प्रकल्प व्हावा म्हणून आंदोलन**

मनमाड–इंदूर रेल्वे प्रकल्पाबाबत महाराष्ट्रात सर्वाधिक चर्चा धुळे परिसरातच झाली. मुख्य कारण म्हणजे या रेल्वे मार्गासाठीचे पहिले आंदोलन याच भागातून सुरू झाले. बापू चौरे, मदनजी मिश्रा व साकलाजी यांनी खंडेराव बाजार रेल्वे समितीची स्थापना करून या जनहिताच्या कार्याची मुहूर्तमेढ रोवली. धुळ्याचे माजी आमदार अनिल गोटे यांनी आंदोलन अधिक तीव्र करून ते राज्यपातळीवर चर्चेत आणले.या आंदोलनाचे दुसरे महत्त्वाचे केंद्र सेंधवा येथे होते. येथे खंडेराव बाजार रेल्वे समितीसोबत मिळून रेल्वे संघर्ष समिती स्थापन करण्यात आली.

या ठिकाणी मनोज मराठे यांनी आंदोलनाचे नेतृत्व करत या प्रकल्पासंदर्भातील बाबी जनहित याचिकेद्वारे शासन व न्यायालयासमोर मांडल्या. हा प्रकल्प का आणि कसा आवश्यक आहे, हे त्यांनी ठोस पुराव्यांसह स्पष्ट केले.

अनेक वेळा सर्वेक्षण करण्यात आले. विविध त्रुटी व अडचणी समोर आल्या, त्या न्यायालयाच्या निर्देशानुसार पूर्ण करण्यात आल्या.

### आठ टक्के लाभात

■ रेल्वेकडून हा मार्ग ८ टक्के फायदेशीर असल्याचे सांगितले जात होते; मात्र श्री. मराठे यांच्या प्रयत्नांमुळे न्यायालयात हा प्रकल्प १८ ते २० टक्के फायदेशीर असल्याचे सिद्ध झाले. त्यानंतर प्रकल्पाला मंजुरी मिळाली आणि भूसंपादन प्रक्रियेला सुरुवात झाली. आतापर्यंत धुळे तालुक्यातील भूसंपादन प्रलंबित होते. अलीकडेच रेल्वे प्रशासनाने याबाबतची यादी जाहीर केली आहे. या यादीप्रमाणे, धुळे शहरा लगतच्या ग्रामपंचायत हद्दीत हे आतापर्यंतचे सर्वात मोठे भूसंपादन ठरले आहे.



सकाळ

# धोकादायक शाळा पाडणार

## झेडपी अखत्यारित वास्तूंबाबत 'ग्रामविकास'चा निर्णय

प्रशांत कोतकर : सकाळ वृत्तसेवा

**नाशिक, ता. २१ : जीव धोक्यात घालून शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या प्रश्नावर अखेर राज्य सरकारला जाग आली आहे. जिल्हा परिषदांच्या अखत्यारीतील मोडकळीस आलेल्या व धोकादायक ठरलेल्या शाळा इमारती व वर्गखोल्या तातडीने पाडण्याबाबत ग्रामविकास विभागाने कठोर व स्पष्ट आदेश जारी केले आहेत. शाळांच्या जीर्ण अवस्थेवरून सातत्याने होणाऱ्या चौफेर टीकेनंतर आणि माध्यमांतून येणाऱ्या बातम्यांनंतर सरकारने हा निर्णय घेतल्याचे स्पष्ट झाले आहे.**



जीर्ण शाळा (संग्रहित छायाचित्र)

राज्यात अनेक ठिकाणी शाळांच्या छतांमधून पाणी गळते, भिंतींना तडे गेलेले आहेत, तर काही इमारती अक्षरशः कोसळण्याच्या अवस्थेत आहेत. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांना वर्गात बसवणे म्हणजे त्यांच्या जिवाशी खेळ असल्याचा आरोप पालक व शिक्षक संघटनांकडून सातत्याने होत होता. मात्र, प्रशासनाच्या हलगर्जीमुळे हा प्रश्न वर्षानुवर्षे प्रलंबित राहिला.

### 'प्रस्ताव-तपासणी-पाडकाम'

**नव्या शासन परिपत्रकानुसार, मोडकळीस आलेल्या शाळा व वर्गखोल्यांचा सविस्तर प्रस्ताव पंचायत समिती स्तरावर तयार करणे बंधनकारक करण्यात आले आहे. गटविकास अधिकारी व बांधकाम विभागाचे उपअभियंता संयुक्त तपासणी करून संरचनात्मक अहवाल देणार आहेत. अहवालासह प्रस्ताव शिक्षणाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे सादर केला जाणार आहे. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची मंजुरी मिळाल्यानंतर जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेतून अंतिम निर्णय घेतला जाणार आहे.**

### विलंबाला माफी नाही

विशेष म्हणजे, अत्यंत धोकादायक ठरलेल्या इमारतींसाठी आता वरिष्ठ पातळीवरील अनावश्यक परवानग्यांची गरज नसणार आहे. वेळकाढूपणा टाळण्यासाठी थेट निर्णय घेण्याचे अधिकार स्थानिक पातळीवर देण्यात आले आहेत. ५० हजार रुपयांपेक्षा कमी घसारा मूल्य असलेल्या इमारती पाडण्याचे संपूर्ण अधिकार पंचायत समिती स्तरावर देण्यात आले आहेत.

### इतकी वर्षे कोण जबाबदार?

सरकारचे हे आदेश स्वागतार्ह असले तरी एक प्रश्न अनुत्तरितच आहे. आतापर्यंत विद्यार्थ्यांच्या जिवाशी खेळ सुरू असताना प्रशासन झोपेत का होते? मोडकळीस आलेल्या शाळांची संख्या, त्यांची अवस्था आणि संभाव्य धोक्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई होणार का, हा सवाल उपस्थित होत आहे. राज्य सरकारने अखेर पाऊल उचलले असले, तरी आता या आदेशांची कठोर अंमलबजावणी झाली नाही तर हा निर्णयही कागदावरच राहण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

सकाळ

# कुंभमेळ्यासाठी देवळाली कॅम्प 'कनेक्टिव्हिटी'वर भर

## दक्षिण भारतातील भाविकांची सोय; लष्करी रस्ते होणार चकाचक

■ सकाळ वृत्तसेवा

**नाशिक, ता. २१ : सिंहस्थ कुंभमेळ्यात दक्षिण भारतातून येणाऱ्या रेल्वेगाड्या देवळाली कॅम्प स्थानकावर थांबविल्या जाणार आहेत. त्यामुळे येथे उतरणाऱ्या भाविकांना घाट परिसरात आणण्यासाठी कॅम्प रेल्वेस्थानक ते महापालिका हद्दीतील मुख्य रस्त्यांकडे आणण्यासाठी देवळाली कटक मंडळाचे रस्ते विकसित केले जाणार आहेत.**



**नाशिक :** लष्करी अधिकाऱ्यांशी चर्चा करताना महापालिका आयुक्त मनीषा खत्री. समवेत आर्टिलरी सेंटरचे ब्रिगेडियर एन. आर. पांडे, देवळाली कन्टोन्मेंटचे कर्नल डी. के. सिंग व महापालिकेचे शहर अभियंता संजय अग्रवाल व कार्यकारी अभियंता नवनीत भामरे

महापालिका आयुक्त मनिषा खत्री यांनी आर्टिलरी सेंटरचे ब्रिगेडियर एन. आर. पांडे, देवळाली कॅन्टोन्मेंटचे कर्नल डी. के. सिंग यांच्यासमवेत पाहणी केली. कुंभमेळ्यात मुंबई तसेच दक्षिण भारताकडून येणाऱ्या मोठ्या प्रमाणातील रेल्वेगाड्या देवळाली स्टेशन येथे थांबणार असल्याने, तेथून उतरणाऱ्या भाविकांना घाट परिसराकडे सुरक्षित, सुकर व नियोजित मार्गाने कसे वळवायचे, याबाबत वाहतूक नियोजनाच्या दृष्टीने चर्चा करण्यात आली. भाविकांच्या वाढीव गर्दीचा विचार करून पर्यायी मार्ग, स्वतंत्र वाहतूक प्रवाह व आवश्यक तेथे रस्ते रुंदीकरण यासंदर्भातही प्राथमिक नियोजन करण्यात आले. गांधीनगर रोडवरील आर्टिलरी सेंटर अंतर्गत देवळाली गाव व देवळाली कॅम्प परिसराला भेट देऊन नियोजित पूल, मुख्य रस्ते, अंतर्गत रस्ते तसेच बाह्य संपर्क रस्त्यांच्या विकासकामांची पाहणी केली. देवळाली कॅन्टोन्मेंट बोर्ड अंतर्गत असलेल्या रस्त्यांची प्रत्यक्ष पाहणी करून रस्ते पुढे जाऊन महापालिकेच्या रस्त्याशी कुठे व कशा पद्धतीने जोडले जातात, त्या ठिकाणी वाहतुकीचा अडथळा निर्माण होतो, रस्ते विकास, सुधारणा किंवा रुंदीकरणाची आवश्यकता या संदर्भात आढावा घेतला. मिलिटरी प्रशासनाकडून आवश्यक ना-हरकत प्रमाणपत्रे व परवानग्या तत्काळ देण्याचे आश्वासन देण्यात आले. यामुळे महापालिकेच्या विकासकामांना गती मिळणार आहे. तसेच महापालिकेच्या प्रलंबित ना-हरकत प्रमाणपत्रे व परवानगी विषयक बाबींचा तातडीने निपटारा करण्यासाठी आयुक्त व संबंधित अधिकारी स्वतः विविध कार्यालयांना भेट देऊन समन्वय साधणार असल्याचे आश्वासन कॅन्टोन्मेंट प्रशासनास देण्यात आले.

### कॅन्टोन्मेंट करणार विकास

■ देवळाली कॅम्प परिसरातील अंतर्गत रस्त्यांचा विकास आर्मी कॅम्प प्रशासनामार्फत करण्यात येणार असून, कॅम्पच्या बाह्य रस्त्यांचा तसेच महानगरपालिकेच्या हद्दीतील संपर्क रस्त्यांचा विकास महापालिकेमार्फत केला जाणार आहे. या वेळी महापालिकेचे शहर अभियंता संजय अग्रवाल व कार्यकारी अभियंता नवनीत भामरे आदी उपस्थित होते. रस्त्यांची सद्यःस्थिती, भविष्यातील वाहतूक भार, आवश्यक तांत्रिक सुधारणा व नियोजित कामांबाबत माहिती सादर केली.

सकाळ

# ‘पेसा’ निधी वितरणात पारदर्शकता

## जिल्हा परिषद- युनियन बँक ऑफ इंडिया यांच्यात सामंजस्य करार

नाशिक, ता. २१ : अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतींना पेसा कायदा अंतर्गत मिळणाऱ्या पाच टक्के निधीच्या वितरणात पारदर्शकता, गती व प्रभावी व्यवस्थापन सुनिश्चित करण्यासाठी नाशिक जिल्हा परिषद व युनियन बँक ऑफ इंडिया यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला आहे.

नाशिक जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार व युनियन बँक ऑफ इंडियाचे क्षेत्रीय प्रमुख प्रभात कुमार जेना यांच्या स्वाक्षरीने हा करार संमत झाला. यावेळी ग्रामपंचायत विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. वर्षा फडोळ, युनियन बँकेचे उपक्षेत्रीय प्रमुख हरेंद्रकुमार जेना, सहायक महाप्रबंधक शरद गोपाळे, मुख्य प्रबंधक मंगेश पाटील, वरिष्ठ प्रबंधक शशिकांत पाटील तसेच जिल्हा व्यवस्थापक (पेसा) राकेश वाघ उपस्थित होते.




नाशिक : युनियन बँकेसोबत सामंजस्य करार करताना जिल्हा परिषदेचे ओमकार पवार, वर्षा फडोळ.

### निधी थेट ग्रामपंचायतींच्या खात्यावर

या करारानुसार पेसा ग्रामपंचायतींतील गावांच्या बँक खात्यांवर निधी थेट वर्ग केला जाणार आहे. त्यामुळे निधी वितरणातील विलंब, मानवी हस्तक्षेप आणि संभाव्य त्रुटींना आळा बसेल. निधीचे डिजिटल नियोजन, वास्तविक वेळेतील (रिअल टाइम) देखरेख आणि पारदर्शक वितरण शक्य होणार असून निधीचा योग्य वापर होऊन स्थानिक विकास कामांना चालना मिळेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

### प्रणालीची व्याप्ती

pesazpnashik.com या पोर्टलद्वारे जिल्ह्यातील अनुसूचित क्षेत्रातील सर्व ग्रामपंचायती, पंचायत समित्या व जिल्हा परिषद एका डिजिटल व्यासपीठावर जोडण्यात आल्या आहेत. ही प्रणाली चार-स्तरीय संरचनेवर आधारित असून समन्वित कामकाज, स्वयंचलित अहवाल प्रणाली व प्रभावी नियंत्रणावर भर देण्यात आला आहे.

### स्पष्ट जबाबदारी व्यवस्था

या ऑनलाइन प्रणालीत ग्रामपंचायत स्तरावर सरपंच व ग्रामपंचायत अधिकारी, पंचायत समिती स्तरावर गट विकास अधिकारी व तालुका व्यवस्थापक (पेसा), ग्रामकोश समिती स्तरावर कोष समिती सदस्य व सचिव, जिल्हा परिषद स्तरावर जिल्हा पेसा कक्ष व जिल्हा व्यवस्थापक (पेसा) यांच्या जबाबदाऱ्या स्पष्टपणे निश्चित करण्यात आल्या आहेत. त्यामुळे निधी व्यवस्थापन अधिक शिस्तबद्ध, पारदर्शक आणि उत्तरदायी होणार आहे.

**दै.लोकमत** **दि.२२ जानेवारी,२०२६**

लोकमत

# शिधापत्रिकांचे शुद्धीकरण; १० हजार संशयास्पद लाभार्थ्यांची नावे जाणार!

## 'मिशन सुधार अभियान' मध्ये आधार क्रमांक आणि तांत्रिक माहितीच्या आधारे पडताळणी

लोकमत न्यूज नेटवर्क

**जळगाव :** शासनाकडून 'मिशन सुधार अभियान' हाती घेण्यात आले आहे. या अभियानांतर्गत आता शिधापत्रिकांचे शुद्धीकरण करण्यात येत असून, जिल्ह्यातील सुमारे १० हजार संशयास्पद लाभार्थ्यांची नावे यादीतून वगळण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. आधार क्रमांक आणि तांत्रिक माहितीच्या आधारे ही पडताळणी केली जात असून, यामुळे खऱ्या गरजूंना धान्याचा लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

अंत्योदय, प्राधान्य कुटुंबासह विविध गटातील शिधापत्रिकाधारकांना राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेंतर्गत धान्याचा लाभ दिला जात आहे. परंतु, बऱ्याच ठिकाणी शिधापत्रिकेचा गैरवापर होत असल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे या गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी मयत, दुबार आणि स्थलांतरित लाभार्थ्यांची पडताळणी केली जात आहे. पडताळणीअंती शिक्कामोर्तब झाल्यानंतर संबंधितांचे रेशन कार्ड रद्द ठरविण्यात येत आहे.




### .. यांच्या नावावर फुली

निधन झाल्यानंतरही नाव कमी न केलेल्या, एकापेक्षा जास्त शिधापत्रिकेत नाव असलेल्या आणि माहितीमध्ये तफावत असलेले किंवा बोगस कागदपत्रे असलेल्यांची रेशन कार्ड रद्द करण्यात येत आहेत.

### अनेकांवर गंडांतर

जिल्ह्यात सुमारे १० हजार लाभार्थी संशयास्पद आढळले आहेत. या सर्वांची पडताळणी सुरू असून, निकषात न बसणाऱ्यांची नावे कायमची वगळली जाणार आहेत. यामुळे सरकारी धान्याची होणारी चोरी थांबणार आहे.

### घरोघरी तपासणी सुरू

संशयास्पद नावांची यादी घेऊन पुरवठा निरीक्षक आणि कर्मचारी हे थेट लाभार्थ्यांच्या घरी जाऊन पाहणी करीत आहेत. सदस्यांची संख्या व कागदपत्रांची खातरजमा केली जात आहे.

### आधार क्रमांकाचा आधार

हे शुद्धीकरण पूर्णपणे तंत्रज्ञानावर आधारित आहे. शिधापत्रिकेला लिंक असलेला आधार क्रमांक आणि 'ई-पॉस' (E-PoS) मशिनमधील डेटा यांचा वापर करून ही संशयास्पद यादी तयार करण्यात आली आहे. 'वन नेशन वन रेशन' अंतर्गत डेटा मॅचिंग केल्यामुळे दुबार नावे सहज समोर येत आहेत.

### अधिकार तहसीलदारांना

पुरवठा निरीक्षकांनी घरोघरी जाऊन अहवाल सादर केल्यानंतर, संबंधित नाव वगळायचे की नाही, याचे अंतिम अधिकार तहसीलदारांना देण्यात आले आहेत. पात्र व्यक्तीवर अन्याय होऊ नये, यासाठी तहसीलदार स्तरावर या अहवालांची छाननी केली जाईल.

> नियमित धान्य वितरणातील पारदर्शकता वाढविण्यासाठी नागरिकांनी तपासणीसाठी येणाऱ्या कर्मचाऱ्यांना योग्य ती माहिती देऊन सहकार्य करावे.
>
> **- रूपेश बिजेवार,** सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी

### अपात्र लाभार्थी असे...

| तालुका | रद्द कार्ड | तालुका | रद्द कार्ड |
|---|---|---|---|
| अमळनेर | ५६३ | एरंडोल | २६४ |
| भडगाव | १७६ | जळगाव | २,५१७ |
| भुसावळ | ४८४ | जामनेर | ९९८ |
| बोदवड | ९१ | मुक्ताईनगर | ४५४ |
| चाळीसगाव | ६६६ | पारोळा | १८१ |
| चोपडा | ५८८ | रावेर | २८९ |
| धरणगाव | ३२० | यावल | १,२२७ |

एकूण १०,३१६

लोकमत

# जळगाव - इंदूर विमानसेवा लवकरच होणार सुरू

## 'फ्लाय ९१' कंपनीकडून हालचालींना वेग

लोकमत न्यूज नेटवर्क

**जळगाव :** मुंबई, पुणे, गोवा आणि हैदराबाद या शहरांनंतर आता जळगाव लवकरच विमानसेवेद्वारे इंदूरशी जोडले जाणार आहे. 'फ्लाय ९१' या विमान कंपनीने या मार्गावर सेवा सुरू करण्यासाठी हालचाली सुरू केल्या आहेत. लवकरच याचे अधिकृत नियोजन पूर्ण होणार आहे.

छत्रपती संभाजीनगर पर्यटन विकास संस्थेच्या नागरी विमान वाहतूक समिती आणि जनसंपर्क समितीचे अध्यक्ष सुनील कोठारी यांनी यासंदर्भात माहिती दिली. जळगाव ते इंदूर या विमानफेरीचे नियोजन अंतिम टप्प्यात आहे.

**येत्या काही दिवसांत या सेवेचे वेळापत्रक आणि तिकीट दरांची घोषणा होण्याची शक्यता आहे.**

## नाइट लॅण्डिंगचा फायदा

जळगाव विमानतळावर अलीकडेच नाइट लॅण्डिंगसह इतर अत्याधुनिक सुविधा उपलब्ध झाल्या आहेत. या पायाभूत सुविधांमुळे नवीन विमान कंपन्यांना जळगावातून सेवा विस्तारणे सोपे झाले आहे. याच पार्श्वभूमीवर इंदूरची विमानसेवा विनाविलंब सुरू होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

## विकासाला चालना

सध्या जळगावमधून मुंबई, पुणे यासारख्या प्रमुख शहरांसाठी विमानसेवा सुरू असल्याने प्रवाशांचा वेळ वाचत आहे. आता इंदूरशी थेट कनेक्टिव्हिटी मिळाल्यास खान्देश आणि मध्य प्रदेशातील व्यावसायिक संबंध अधिक दृढ होतील. शैक्षणिक, वैद्यकीय आणि व्यापार या तिन्ही दृष्टीने ही सेवा जळगावकरांसाठी मोलाची ठरणार आहे.

लोकमत

मस्ट READ

# मृत व्यक्ती जिवंत दाखवून शेतजमीन लाटली

## यावलमध्ये ३ हेक्टरहून अधिक जमिनीचा बनावट दस्तऐवज घोटाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

**यावल :** मृत व्यक्तीच्या नावाने बनावट कागदपत्रे तयार करून त्याला जिवंत असल्याचे भासवत तब्बल ३ हेक्टर १९ आर शेतजमिनीची परस्पर विक्री केल्याचा धक्कादायक प्रकार यावल तालुक्यात उघडकीस आला आहे. या प्रकरणी जालन्याच्या एका महिलेने दिलेल्या तक्रारीवरून अंबरनाथ, नवी मुंबई, वसई आणि यावल येथील एकूण १२ जणांविरुद्ध यावल पोलिस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा मंगळवारी रात्री दाखल झाला आहे.

फिर्यादी कांचन संजय खत्री (वय ५२, रा. जालना) यांचे काका गेलाराम भुरोमल यांच्या नावे बोरावल खुर्द शिवारात गट क्रमांक १९३ मध्ये शेतजमीन होती. गेलाराम भुरोमल यांचे १ जानेवारी १९९५ रोजी निधन झाले होते. मात्र, आरोपींनी मृत व्यक्तीच्या नावाचा गैरवापर करत हा घोटाळा रचल्याचे तक्रारीत नमूद आहे. तक्रारीनुसार, आरोपी अजित तुळशीराम भंडारी (रा. अंबरनाथ) याने श्याम मनोहर मुंदडा (रा. वसई) याला बनावट 'गेलाराम' म्हणून दुय्यम निबंधक कार्यालयात उभे केले. त्यासाठी बनावट आधार कार्ड व पॅनकार्ड तयार करून सदर शेतजमीन अवघ्या ११ लाख १५ हजार रुपयांत विक्री केल्याचा आरोप आहे.

### बनावट खरेदीखताच्या आधारावर जमिनीचे केले तुकडे

बनावट खरेदीखताच्या आधारे आरोपींनी जमिनीचे दोन तुकडे केले. त्यापैकी १ हेक्टर ४५ आर जमीन सकूबाई दशरथ धनगर हिच्या नावावर, तर उर्वरित १ हेक्टर ७४ आर जमीन प्रशांत वसंतराव पाटील याने स्वतःच्या नावावर करून घेतली. या व्यवहारात नवी मुंबई व विरार येथील काही आरोपींनी खोटे साक्षीदार म्हणून स्वाक्षऱ्या केल्याचा आरोप आहे. स्थानिक स्तरावरील काही व्यक्तींनी जमीन मालकीची खातरजमा न करता संगनमताने भूमिका बजावल्याचे तक्रारीत नमूद आहे.

### यावल पोलिस ठाण्यात बारा जणांवर गुन्हा दाखल

या प्रकरणी यावल पोलिस ठाण्यात अजित भंडारी (रा. ठाणे), श्याम मुंदडा (रा. पालघर), सचिन राऊत (रा. नवी मुंबई), उमेश कदम (वय ४१), सकूबाई धनगर, शांताराम धनगर, रवींद्र धनगर, ईश्वर पाटील, दिलीप धनगर (सर्व रा. बोरावल खुर्द, ता. यावल), प्रशांत पाटील, किशोर माळी व शेख युसूफ शेख फारुख (तिघे रा. यावल) अशा १२ जणांविरुद्ध फसवणुकीसह संबंधित कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिस निरीक्षक रंगनाथ धारबळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक अनिल महाजन हे या प्रकरणाचा सखोल तपास करीत असून, बनावट कागदपत्रे, आर्थिक व्यवहार आणि इतर संबंधित बाबींची चौकशी सुरू आहे.

लोकमत

# केळी पीक विम्याबाबत थांबलेली पडताळणी पुन्हा केली जाणार!

## आता 'सॅटेलाइट'द्वारे तपासणी : शेतकऱ्यांची संख्या वाढल्यामुळे शंका वाढली

लोकमत न्यूज नेटवर्क

**जळगाव:** केळी पीक विमा योजने अंतर्गत यंदा जळगाव जिल्ह्यातून विक्रमी १ लाखांहून अधिक शेतकऱ्यांनी विमा काढला आहे. मात्र, या विक्रमी नोंदणीत काही प्रमाणात बोगस विमा काढला असल्याची शक्यता कृषी विभाग आणि विमा कंपनीने वर्तवली आहे. शेतात केळीची लागवड नसतानाही विमा काढल्याची शंका असल्याने, विमा काढणाऱ्या शेतकऱ्यांची पडताळणी पुन्हा सुरू होणार आहे.

डिसेंबर महिन्यात कृषी आयुक्तालयाच्या पथकाने काही तालुक्यांमध्ये प्रत्यक्ष शेतात जाऊन पडताळणी मोहीम राबवली होती.

### 'एमआरसॅक' तंत्रज्ञानाचा घेणार आधार

यंदाची पडताळणी ही केवळ कागदोपत्री नसून ती आधुनिक 'एमआरसॅक' उपग्रह तंत्रज्ञानाच्या आधारावर केली जाणार आहे. यामुळे ज्या शेतकऱ्यांनी शेतात प्रत्यक्षात केळी नसताना केवळ कागदोपत्री विमा भरला आहे, त्यांचे बिंग फुटणार आहे. तसेच, काही शेतकऱ्यांनी एकाच गटात ४ हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्रावर विमा काढल्याने संशय अधिक बळावला आहे.



### यंदा अपात्रचा आकडा वाढणार

काही कारणास्तव थांबलेली ही मोहीम आता पुन्हा नव्याने सुरू केली जाणार असल्याची माहिती कृषी विभागाच्या सूत्रांनी दिली आहे. गेल्या हंगामात ५ ते ८ हजार शेतकरी अपात्र ठरले होते, मात्र यंदा हा आकडा दुपटीने म्हणजेच १० हजारांपर्यंत जाण्याची भीती व्यक्त होत आहे.

### बोगसगिरी रोखण्यासाठी कृषी विभाग आक्रमक

१ जिल्हा कृषी अधीक्षक कुर्बान तडवी यांच्याशी या संदर्भात संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता तो होऊ शकला नाही.

२ मात्र, कृषी विभागातील सूत्रांनुसार, खऱ्या आणि गरजू शेतकऱ्यांना विम्याचा लाभ मिळावा आणि सरकारी निधीचा अपव्यय थांबावा, यासाठी ही विशेष तपासणी मोहीम राबवण्यात येणार आहे.

३ चुकीची माहिती देऊन विमा हप्ता भरणाऱ्यांचे विमा अर्ज बाद केले जाणार आहेत.

Jalgaon Main
Page No. 2 Jan 22, 2026
Powered by: erelego.com

लोकमत

# अधिकाऱ्यांच्या कारभाराविरोधात शिक्षकांचा आक्रमक पवित्रा

## आमदार दराडे संतप्त : फेब्रुवारीअखेर समस्या निकाली काढण्याच्या सूचना

लोकमत न्यूज नेटवर्क

**नाशिकरोड** : वर्षानुवर्षे एकाच कामासाठी शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांकडे खेटे घालणाऱ्या शिक्षकांनी ढिसाळ कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त करीत अधिकाऱ्यांना धारेवर धरले. नाशिक, धुळे, जळगाव व नंदुरबार या चारही जिल्ह्यांतील सुमारे चारशे शिक्षक व कर्मचाऱ्यांनी आमदार दराडे यांच्याकडे प्रश्न सोडविण्याची मागणी केल्यानंतर दराडे यांनीही यांनीही शिक्षकांना संयमाचे धडे देत फेब्रुवारीअखेर समस्या मार्गी लावण्याचे आदेश दिले.

नाशिकरोड येथील शिक्षण उपसंचालक कार्यालयाच्या आवारात आ. किशोर दराडे यांच्या उपस्थितीत बुधवारी (दि. २१) शिक्षक दरबार पार पडला. त्यात नाशिक विभागातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी प्रलंबित समस्या व तक्रारींचा अक्षरशः पाऊस पाडला. यावेळी शिक्षक सेनेचे राज्य उपाध्यक्ष संजय चव्हाण यांनी, 'शिक्षकांचे वेतन अडविले जात असेल, तर अधिकाऱ्यांना पगार घेऊ देणार नाही,' असा इशाराही दिला. चारही जिल्ह्यांचे प्रश्न स्वतंत्रपणे सोडविण्यासाठी धुळे-नंदुरबारसाठी ४ फेब्रुवारी, जळगावसाठी ५ फेब्रुवारी तर नाशिक जिल्ह्यासाठी १८ फेब्रुवारी रोजी स्वतंत्र शिक्षक दरबार आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला.

शिक्षक व कर्मचाऱ्यांची मोठी गर्दी झाल्याने कार्यालयात रेटारेटी झाली. अखेर नाशिकरोड पोलिसांना पाचारण करून उपसंचालक कार्यालयासमोरील हिरवळीवर शिक्षक दरबार घेण्यात आला. शिक्षण उपसंचालक संजयकुमार राठोड, माध्यमिक शिक्षणाधिकारी प्रशांत दिग्रसकर, प्राथमिक शिक्षणाधिकारी सरोज जगताप यांच्या समोर शिक्षकांनी रखडलेली कामे, तक्रारी व समस्यांची सविस्तर मांडणी केली. शिक्षक सेनेचे राज्य समन्वयक संभाजी पाटील यांनी अधिकाऱ्यांशी संवाद साधत प्रत्येक प्रलंबित कामासाठी निश्चित कालमर्यादा ठरविण्याबाबत चर्चा केली.

त्यानुसार दिलेल्या मुदतीत कामे पूर्ण करण्याचे आश्वासन शिक्षण उपसंचालक कार्यालयातील अधिकाऱ्यांनी दिले. दरबारात मुख्याध्यापक महासंघाचे एस. बी. देशमुख, प्रदीप सांगळे, शिक्षक सेनेचे संजय चव्हाण, टीडीएफचे मोहन चकोर, शिक्षक परिषदेचे विजय ढढे, कास्ट्राईब संघटनेचे नीलेश गांगुर्डे, शिक्षकेतर कर्मचारी संघटनेचे सोमनाथ धात्रक यांच्यासह विविध संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.



नाशिकरोड येथील शिक्षण उपसंचालक कार्यालयाच्या आवारातील शिक्षक दरबारात तक्रारी मांडताना शिक्षक.

### आयडी घोटाळ्यामुळे रखडली कामे

शालार्थ आयडी प्रकरणातील एसआयटी चौकशीमुळे गेल्या आठ-नऊ महिन्यांपासून कामे रखडल्याचा आरोप झाला. शिक्षक मान्यता, पुरवणी बिले, अंशतः अनुदानित कर्मचाऱ्यांच्या समस्या, एकस्तर, कला शिक्षकांच्या समस्या, सेवा सातत्य, बदली मान्यता, वैद्यकीय बिले आदी अनेक प्रश्न मांडण्यात आले.

### कोणत्याही अधिकाऱ्याला पैसे देऊ नका...

कोणतेही काम करायचे असेल तर पैशांची मागणी होते, पैसे दिल्याशिवाय काम होत नसल्याचे आरोप शिक्षकांनी केल्यानंतर आमदार दराडे यांनी शिक्षकांना कोणत्याही कामासाठी शिक्षण विभागातील अधिकारी किंवा कर्मचाऱ्यांना पैसे देऊ नयेत, असा सल्ला दिला. 'कोणी पैसे मागत असेल तर त्याला थेट माझ्याकडे पाठवा,' असे सांगत त्यांनी घोषणाबाजी करणाऱ्या शिक्षकांना शांत राहण्याचे आवाहन केले.

लोकमत

# द्वारका चौक ते सिन्नर रस्ता रुंदीकरण होणार

**नाशिक :** आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर भाविक व नागरिकांची वाढती वाहतूक लक्षात घेता द्वारका चौक ते सिन्नर या महत्त्वाच्या मार्गाच्या विकास व रुंदीकरणाबाबत महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. सिंहस्थ काळात लाखो भाविक नाशिकमध्ये दाखल होणार असल्याने या मार्गावरील वाहतूक सुरळीत, सुरक्षित व गतिमान करण्याच्या दृष्टीने विविध उपाययोजनांवर चर्चा करण्यात आली.

बैठकीत द्वारका चौक ते सिन्नर रस्त्याच्या सध्याच्या स्थितीचा आढावा घेण्यात आला. बुधवारी (दि. २१) झालेल्या बैठकीस कुंभमेळा आयुक्त शेखर सिंह, मनपा आयुक्त मनीषा खत्री, शहर अभियंता संजय अग्रवाल, कार्यकारी अभियंता संदेश शिंदे, रवींद्र बागुल आदी उपस्थित होते. बैठकीत रस्त्याची अपुरी रुंदी, वाढती वाहनसंख्या, अपघातप्रवण ठिकाणे, अतिक्रमणे तसेच सेवा रस्त्यांचा अभाव याबाबत संबंधित अधिकाऱ्यांनी माहिती सादर केली. कुंभमेळ्याच्या काळात हा मार्ग अत्यंत महत्त्वाचा ठरणार असून, नाशिक-मुंबई, नाशिक-छत्रपती संभाजीनगर तसेच सिन्नर औद्योगिक व विमानतळाकडे जाणाऱ्या वाहतुकीचा मोठा भार याच मार्गावर असतो, याकडे बैठकीत लक्ष वेधण्यात आले. बैठकीत रस्त्याचे टप्प्याटप्प्याने रुंदीकरण, आवश्यक त्या ठिकाणी उड्डाणपूल किंवा भुयारी मार्ग, सिग्नल प्रणालीचे आधुनिकीकरण, पदपथ व ड्रेनेज व्यवस्था, तसेच अतिक्रमण हटविण्याबाबत नियोजन करण्याचा निर्णय घेण्यात आला.

Nashik Main
Page No. 4 Jan 22, 2026
Powered by: erelego.com

लोकमत

# रामकालपथाच्या कामामुळे वाहतूक मार्गात होणार बदल

लोकमत न्यूज नेटवर्क

नाशिक : सिंहस्थ कुंभमेळ्याच्या निमित्ताने रामकाल पथ प्रकल्पांतर्गत महापालिकेकडून गोदाकाठावर विविध विकासकामे हाती घेतले जाणार आहे. ही विकासकामे ७० दिवसांत पूर्ण करण्यात येणार असल्याचे मनपा प्रशासनाने पोलिसांच्या वाहतूक शाखेला कळविले आहे. यानुसार काळाराम मंदिराकडून सीता गुंफाकडे ये-जा करणारा रस्ता तसेच मंदिराच्या पूर्व, उत्तर, दक्षिण दरवाजासमोरील परिसरात दोन्ही बाजूंनी येणारी वाहतूक बंद करण्यात येणार असल्याची अधिसूचना वाहतूक नियंत्रण शाखेने जारी केली आहे. काळाराम मंदिराकडून सीतागुंफाकडे जाणारा व येणारा मार्गावरील वाहतूक बंद राहणार आहे. गुरुवारपासून (दि. २२) १ एप्रिलपर्यंत हे निर्बंध लागू राहणार आहेत. काम जोपर्यंत पूर्ण होत नाही, तोपर्यंत अधिसूचना अंमलात राहणार आहे.

लोकमत

# शहराबाहेरील गोदेतील पाणवेली काढण्यासाठी ४३ लाखांच्या होड्या

## सिंहस्थ कुंभमेळ्याच्या निमित्ताने गोदावरी स्वच्छ करण्यासाठी जि.प. मार्फत उपाययोजना

लोकमत न्यूज नेटवर्क

**नाशिक :** सिंहस्थ कुंभमेळ्याच्या निमित्ताने गोदावरी स्वच्छ करण्यासाठी वेगवेगळ्या उपाययोजना आखल्या जात आहेत. शहराबाहेरील नदीपात्रातील पाणवेली काढण्यासाठी जिल्हा परिषदेने ४३ लाख रुपयांच्या होड्या खरेदीचा प्रस्ताव तयार केला आहे. या होड्यांमध्ये कर्मचारी बसून त्यांच्याकडून नदीतील पाणवेली काढून घेण्यात येणार आहे.

गोदा स्वच्छतेसाठी नाशिक महापालिकेने मलनिस्सारण केंद्र उभारणे, गोदावरीत थेट सांडपाणी मिसळू न देण्यासाठी उपाययोजना यासारखी कामे केली जात आहेत. तसेच नाशिक महापालिकेने यापूर्वी मोठे मशीन खरेदी करून त्याच्या माध्यमातून पाणवेली काढण्याचे काम सुरू आहे. पण त्यामुळे पाणवेलींचा बंदोबस्त होऊ शकलेला नसल्याने या होड्यांमुळे काय होणार, असा प्रश्न उपस्थित होत आहे. नाशिक शहरात गोदावरीत थेट सांडपाणी मिसळत असल्याने नाशिक ते नांदूर मध्यमेश्वरपर्यंत पाणवेलींची मोठी समस्या निर्माण झाली आहे. महापालिकेने यापूर्वी पाणवेली काढण्यासाठी मशीन विकत घेऊनही पाणवेलींची समस्या कायमच राहिल्याचे दिसून आले.

### तरीही समस्या कायम

नाशिक महापालिका हद्दीबाहेर नाशिक व निफाड या तालुक्यातील जवळपास १५ गावे गोदावरीच्या काठावर आहेत. या गावांमधील सांडपाणी व मलजल थेट गोदावरीत मिसळू नये, यासाठी स्वच्छ भारत मिशनमधून जिल्हा परिषदेने यापूर्वीच तेथे मलनिस्सारण प्रकल्प बसवले आहेत. त्यामुळे तिथे गोदावरीत थेट पाणी मिसळण्यास अटकाव आला असला तरी गोदावरीतील पाणवेलींची समस्या कायम आहे.



### पाणवेलींपासून वस्तूनिर्मिती ठरली कुचकामी

जिल्हा परिषदेने दोन वर्षांपूर्वी पाणवेलीपासून वस्तू बनवण्याचा प्रयोग केला. त्यासाठी निफाड तालुक्यातील चांदोरी येथे महिलांना पाणवेलीपासून वस्तू तयार करण्याचे प्रशिक्षण देण्यात आले. आसामच्या ब्रह्मपुत्रा नदीमधून पाणवेली मागवत महिलांना प्रशिक्षण देण्यातून प्रचंड खर्चदेखील करण्यात आला. मात्र, गोदावरीतील पाणवेलीपासून टिकाऊ वस्तू बनवता येत नाही, हे समोर येईपर्यंत निष्कारण लाखो रुपये खर्च झाले होते.

### सर्व १५ गावांवर जबाबदारी

जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी जिल्हा परिषदेला या पाणवेली काढण्यासाठी प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार ग्रामीण पाणीपुरवठा विभागाने होड्या खरेदीचा ४३ लाख रुपयांचा प्रस्ताव सादर केला आहे. या प्रस्तावानुसार गोदावरी काठावरील १५ ग्रामपंचायत क्षेत्रात प्रत्येकी एक होडी दिली जाणार असून त्या ग्रामपंचायतीने त्यांच्या परिसरातील पाणवेली काढायच्या आहेत. म्हणजे नाशिक महापालिकेच्या चुकीमुळे गोदावरीत तयार होणाऱ्या पाणवेली खाली वाहत जाऊन त्याचा भुर्दंड ग्रामपंचायतींना सहन करावा लागणार असल्याची चर्चा आहे.

लोकमत

मस्ट READ

# पुढील महिन्यात द्वारका सर्कल वाहतुकीसाठी बंद

## अंडरपासच्या कामांना होणार सुरुवात

लोकमत न्यूज नेटवर्क

नाशिक : कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर शहरातील वाहतूककोंडी सोडविण्यासाठी महत्त्वाच्या असलेल्या द्वारका सर्कल येथील अंडरपास (भुयारी मार्ग) कामाला फेब्रुवारी महिन्यापासून सुरुवात होणार आहे. या कामासाठी द्वारका सर्कल वाहतुकीसाठी बंद करण्यात येणार आहे.

द्वारका चौफुली हा अत्यंत महत्त्वाचा मार्ग आहे. मात्र, अंडरपासच्या कामासाठी हा चौक बंद झाल्यानंतर वाहतूक पर्यायी मार्गाने वळविण्यात येणार आहे. यामध्ये वडाळा रोड, मुंबई नाका, इंदिरानगर बोगदा, राजीवनगर, राणेनगर आणि पाथर्डी फाटा या मार्गाचा प्रामुख्याने वापर केला जाणार आहे. परिणामी आधीच वाहतूककोंडीचा सामना करणाऱ्या मुंबई नाका सर्कलवरील ताण अधिक वाढण्याची शक्यता आहे.

परजिल्ह्यांतून येणाऱ्या एसटी बससाठी स्वतंत्र मार्ग निश्चित करण्याचा विचार केला जात आहे.

तसेच, द्वारका सर्कल बंद झाल्यानंतर भाभानगर मार्गे वाहतूक काठेगल्ली सिग्नलवरून नाशिक रोडकडे वळविण्यात येणार आहे. मात्र, हा रस्ता अरुंद असल्याने येथेही कोंडीची समस्या निर्माण होण्याची शक्यता आहे. तसेच, इंदिरानगर बोगदा ते गांधीनगर सिग्नल या मार्गावरही वाहतुकीचा ताण पडणार आहे.

### द्वारका सर्कल बंद झाल्यावर; वाहतूक कुठून वळणार?

- कामकाजाच्या कालावधीत द्वारका चौफुली वाहतुकीसाठी पूर्णतः बंद.
- नाशिक रोड वाहतूक पर्यायी मार्गाने वळविण्यात येणार.
- वडाळा रोड, मुंबई नाका सर्कल, इंदिरानगर बोगदा, राजीवनगर, राणेनगर, पाथर्डी फाटा पर्यायी मार्ग.
- मुंबई नाका सर्कलवरील वाहतूककोंडीत वाढ होण्याची शक्यता.
- काही मार्ग एकेरी करण्यावर प्रशासनाचा विचार.
- अवजड वाहनांसाठी उड्डाणपुलाचा वापर होण्याची शक्यता.
- भाभानगर मार्गे वाहतूक काठेगल्ली सिग्नलकडे वळणार.
- अरुंद रस्त्यांमुळे नव्या कोंडीचा धोका.
- इंदिरानगर बोगदा-गांधीनगर सिग्नल मार्गावर ताण वाढणार.
- या मार्गावरून अवजड वाहनांना स्थानिकांचा विरोध.
- मुंबई नाका, इंदिरानगर भागात कोंडी तीव्र होण्याची शक्यता.
- वाहतूक पोलिस व महापालिकेच्या सातत्याने बैठका.
- काही पर्यायी मार्ग एकेरी करण्यावर चर्चा.
- अवजड वाहनांना सर्व्हिस रोडऐवजी उड्डाणपुलाचा वापर.
- परजिल्ह्यातून येणाऱ्या एसटी बससाठी स्वतंत्र मार्ग नियोजन.
- शहरातील अंतर्गत वाहतुकीवरील ताण कमी करण्याचा प्रयत्न.

लोकमत

# विविध योजनांचा लाभ मिळत नसल्याची तक्रार

लोकमत न्यूज नेटवर्क

**अमळनेर :** केंद्र व राज्य सरकारच्या घरकूल योजनेसह विविध सामाजिक व कृषी योजनांचा लाभ लाभार्थ्यांना वेळेत मिळत नसल्याबाबत क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या वतीने अमळनेर प्रांताधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.

केंद्र व राज्य शासनांतर्गत राबविण्यात येणाऱ्या घरकूल योजना तसेच विधवा, परित्यक्ता, ज्येष्ठ महिला व पुरुषांसाठी सुरू असलेल्या संजय गांधी योजना, श्रावण बाळ योजना व इंदिरा गांधी योजना यांचा लाभ अनेक पात्र लाभार्थ्यांना मिळालेला नाही. तसेच शेतकऱ्यांना झालेल्या पीक नुकसानीबाबत शासनाने पीक विमा व नैसर्गिक आपत्ती अनुदान वेळेत का दिले नाही, असा सवालही निवेदनात उपस्थित करण्यात आला आहे.

महात्मा गांधी रोजगार हमी योजनेंतर्गत सिंचन विहिरी (२७३), गोठा शेड (१४८), शोषखड्डे (२७) व घरकूल (३८१७) या कामांसाठी कुशल व अकुशल मजुरीचे अनुदान संबंधित लाभार्थ्यांना पूर्णतः व वेळेत मिळालेले नाही.

**१४८**
गोठाशेडची कामे अमळनेर तालुक्यात सुरु आहेत.



## योजनांचा लाभ नसल्याने उपासमारीची वेळ

संजय गांधी योजना, श्रावण बाळ योजना व इंदिरा गांधी योजनेच्या हजारो लाभार्थ्यांना डीबीटी प्रणालीच्या नावाखाली लाभापासून वंचित ठेवण्यात आले असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.

**हे लाभार्थी हे बहुतांशी शेतमजूर वर्गातील असून, लाभ न मिळाल्याने त्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न गंभीर बनला आहे. त्यामुळे सर्व पात्र लाभार्थ्यांना तत्काळ योजनांचा लाभ देण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.**

निवेदनावर जिल्हाध्यक्ष शरद पाटील, उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष ईश्वर पाटील, उपाध्यक्ष दिलीप पाटील यांच्यासह संघटनेच्या पदाधिकाऱ्यांच्या सह्या आहेत.

गांवकरी
www.gavakari.net
22 Jan 2026 - Page 5

# दिंडोरीत प्रलंबित मागण्यांसाठी किसान सभेचे आंदोलन

## चौथ्या दिवशी आंदोलन सुरू; आंदोलनकर्त्यांची चुलीची मांडणी

**दिंडोरी : प्रतिनिधी**

किसान सभेचे शेतकरी, शेतमजूर व आदिवासी बांधवांच्या विविध प्रलंबित मागण्यांकरिता दिंडोरी तहसील व इतर ठिकाणी सुरू असलेले बिऱ्हाड आंदोलन दिंडोरी येथे चौथ्या दिवशीही सुरूच आहे. जोपर्यंत मागण्या मान्य होत नाहीत तोपर्यंत हे आंदोलन असेच चालू राहणार असल्याचे आंदोलनकर्त्यांनी सांगितले.

नाशिक जिल्हा किसान सभा, माकपा, डीवायएफआय व जनवादी महिला संघटनांनी शेतकरी, कष्टकरी व कामगारांच्या विविध मागण्यांसाठी दिंडोरी तहसील कार्यालयासमोर चार दिवसांपासून चक्काजाम आंदोलनाचा विडा उचलला आहे. कडाक्याची थंडी, अंधारी रात्र व दिवसाचे तळपते ऊन अंगावर घेत आंदोलक रस्त्यावर ठाण मांडून आहेत. रस्त्यावरच आपली तीन विटांची चूल पेटवून त्यावर खिचडी शिजवली जात आहे. आपले घरदार मागे टाकून आपल्या हक्काच्या मागण्या मान्य झाल्याशिवाय माघार घेणार नसल्याचा ठाम पवित्रा घेतल्याने प्रशासनाची चांगलीच अडचण वाढणार असल्याचे



दिसत आहे. रात्रंदिवस शेकडो आंदोलक रस्त्यावर ठाण मांडून बसले आहेत. शेतकरी व शेतमजूर यांचे प्रश्न, आदिवासी बांधवांच्या हक्कांसाठी, विविध प्रलंबित मागण्यांच्या पूर्ततेसाठी किसान सभेच्या नेतृत्वाखाली हे बिऱ्हाड आंदोलन सुरू आहे. मागण्या मान्य होईपर्यंत आंदोलन मागे घेणार नसल्याचा निर्धार आंदोलनकर्त्यांनी यावेळी केला.

यावेळी किसान सभा जिल्हा सेक्रेटरी रमेश चौधरी, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे तालुका सेक्रेटरी देवीदास वाघ, डीवायएफआयचे जिल्हा सचिव आप्पा वटाणे यांच्यासह किसान सभा समिती, पक्षाचे तालुका समितीचे पदाधिकारी, कार्यकर्ते, शेतकरी, आदिवासी बांधव तहसील कार्यालयासमोर ठाण मांडून बसले आहेत.

### मागण्यांबाबत सकारात्मक निर्णय घ्यावा

तहसील कार्यालयासमोर आंदोलनकर्त्यांनी मुक्काम ठोकत भोजनासाठी चुली पेटवल्या आहेत. आंदोलनाला अधिक तीव्र स्वरूप प्राप्त झाले आहे. शासन व प्रशासनाने तातडीने मागण्यांबाबत सकारात्मक निर्णय घ्यावा, अन्यथा आंदोलन आणखी तीव्र करण्याचा इशारा यावेळी देण्यात आला.

गांवकरी
www.gavakari.net
22 Jan 2026 - Page 7

# कुंभमेळ्यापूर्वी सिन्नर थर्मलचे दोन युनिट सुरू होणार

## महाजनको–एनटीपीसीचा ऐतिहासिक करार; सिन्नरच्या विकासाला नवी ऊर्जा

**सिन्नर : प्रतिनिधी**

**वर्षानुवर्षे रखडलेला सिन्नर थर्मल पॉवर प्रकल्प आता पुन्हा कार्यान्वित होण्याच्या मार्गावर आला आहे. सिंहस्थ कुंभमेळ्यापूर्वी २७० मेगावॉट क्षमतेचे दोन युनिट सुरू करण्याचे उद्दिष्ट महाजनकोने निश्चित केले आहे. या दिशेने निर्णायक पाऊल टाकत महाराष्ट्र राज्य वीजनिर्मिती कंपनी (महाजनको) आणि एनटीपीसी लिमिटेड यांच्यात नवी दिल्ली येथे सिन्नर थर्मल पॉवर लिमिटेडच्या अधिग्रहणासाठी भागधारक करारावर अधिकृत स्वाक्षरी करण्यात आली.**



राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरणाने (एनसीएलटी) मंजूर केलेल्या ठराव योजनेनुसार २२ फेब्रुवारी २०२६ पर्यंत ३८०० कोटी रुपये महाजनको व एनटीपीसीकडून भरण्यात येणार आहे. त्यानंतर सिन्नर थर्मल प्रकल्पाचे औपचारिक हस्तांतरण या दोन्ही सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यांकडे होणार आहे. ही संपूर्ण प्रक्रिया कार्पोरेट दिवाळखोरी निवारण कायदा (आयबीसी) २०१६ अंतर्गत राबविण्यात येत आहे.



नवी दिल्ली येथील एनटीपीसीच्या स्कोप कार्यालयात झालेल्या करारावेळी महाजनकोकडून अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक राधाकृष्णन बी., संचालक (प्रकल्प) अभय हरणे, मुख्य अभियंता (प्रकल्प व नियोजन) अतुल सोनजे, तर एनटीपीसीकडून अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक गुरदीप सिंग, संचालक (वित्त) जयकुमार श्रीनिवासन, संचालक (संचलन) रविंदर सिंग यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

### सिन्नर परिसराला मिळणार नवा श्वास

सिन्नर थर्मल प्रकल्प पुन्हा सुरू झाल्यास सिन्नर व परिसरातील शेकडो युवकांना रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होणार आहेत. रस्ते, वाहतूक, निवास व इतर पायाभूत सुविधांच्या विकासाला गती मिळणार आहे. त्याचबरोबर राज्याच्या वाढत्या औद्योगिक व घरगुती वीज गरजांची पूर्तता करण्यासाठी हा प्रकल्प मोलाची भूमिका बजावणार आहे.

### कोळसा पुरवठ्यासाठी हालचाली सुरू

सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर वीजपुरवठा सुरळीत राहावा, यासाठी पहिल्या टप्प्यात दोन युनिट सुरू करण्यावर भर देण्यात आला आहे. त्यासाठी आवश्यक असलेला कोळसा पुरवठ्यासाठी महाजनकोचे वरिष्ठ अधिकारी देशपातळीवरील कोळसा पुरवठा करणाऱ्या कंपन्यांशी चर्चा करत आहेत, अशी माहिती महाजनकोचे मुख्य अभियंता अतुल सोनजे यांनी दिली.

गांवकरी
www.gavakari.net
22 Jan 2026 - Page 3

# काळाराम मंदिराच्या सुशोभीकरणामुळे वाहतूक मार्गात बदल

**पंचवटी : प्रतिनिधी**

सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर रामकाल पथ प्रकल्पांतर्गत सीतागुंफा व काळाराम मंदिर परिसरात सुशोभीकरणाचे काम हाती घेण्यात येणार असल्याने या मार्गावरील वाहतूक मार्गात बदल करण्यात आले आहे. याबाबतची अधिसूचना पोलीस आयुक्तालयामार्फत करण्यात येणार आहे.

काळाराम मंदिर परिसराचे संपूर्ण काँक्रीटीकरण, सुशोभीकरण, काळाराम मंदिर ते सीतागुंफा दरम्यान पेव्हरब्लॉक बसविणे, तसेच मालेगाव स्टँड ते रामकुंड मार्गावर कमान उभारण्याचे काम प्रस्तावित आहे. या कामासाठी सीतागुंफा- काळाराम मंदिर परिसरातील रस्त्यांवर सर्व प्रकारच्या वाहनांची वाहतूक तात्पुरती बंद ठेवणे आवश्यक असल्याचे पोलीस प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

या निर्णयानुसार काळाराम मंदिराकडून सीतागुंफेकडे जाणारा व येणारा रस्ता, तसेच काळाराम मंदिराच्या उत्तर, पूर्व व दक्षिण दरवाजासमोरील मार्गावर सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंद राहील. नागरिकांच्या सोयीसाठी वाहतूक श्रीराम मंदिर- नाग चौक- काट्या मारुती चौकी- गणेशवाडी- गौरी पटांगण या मार्गाने वळविण्यात येणार आहे. तसेच सीतागुंफा रोड- सप्तशृंगी मंदिर या मार्गानेही वाहतूक वळवली जाणार आहे. भाविकांनी आपली वाहने गौरी पटांगण येथे करण्यात आली आहे. सीतागुंफा व काळाराम मंदिर येथे दर्शनासाठी भाविकांना पायी जावे लागणार आहे. वाहतूक नियंत्रणासाठी काळाराम मंदिराच्या उत्तर व दक्षिण दरवाजाजवळ बॅरिकेड्स लावण्यात येणार आहेत.

कामाच्या ठिकाणी अपघात टाळण्यासाठी ठेकेदार व संबंधित विभागांना योग्य साइनबोर्ड, दिशादर्शक फलक, रात्रीच्या वेळी प्रकाश व्यवस्था, सुरक्षा साहित्य व पुरेसे ट्रॅफिक वॉर्डन नेमण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. कामाच्या ठिकाणी अपघात झाल्यास संबंधित ठेकेदार जबाबदार राहणार आहे.

रुग्णवाहिका, अग्निशमन दल, शववाहिका तसेच अत्यावश्यक व आपत्कालीन सेवेच्या वाहनांना या निर्बंधातून वगळण्यात आले आहे. अधिसूचनेचे उल्लंघन करणाऱ्यांवर मोटार वाहन अधिनियम व मुंबई पोलीस अधिनियमानुसार कारवाई करण्यात येणार असल्याचेही पोलीस प्रशासनाने स्पष्ट केले आहे. ही वाहतूक नियंत्रण अधिसूचना २१ जानेवारी ते १ एप्रिल या कालावधीत लागू राहणार आहे.

* **प्रवेश बंद मार्ग :** १) काळाराम मंदिराकडून सीतागुंफाकडे जाणाऱ्या व येणाऱ्या दोन्ही बाजूचे मार्गावर सर्व प्रकारच्या वाहनांना वाहतुकीस प्रवेश बंद करण्यात येत आहे. काळाराम मंदिर उत्तर, पूर्व व दक्षिण दरवाजासमोरील रोडवरून जाणाऱ्या व येणाऱ्या दोन्ही बाजूचे मार्गावर सर्व प्रकारच्या वाहनांना वाहतुकीस प्रवेश बंद करण्यात येत आहे.

* **पर्यायी मार्ग :** श्रीराम मंदिर – नाग चौक– काट्या मारुती चौकी– गणेशवाडी– गौरी पटांगण या मार्गाने वाहतूक वळविण्यात आली आहे. राम मंदिर– नाग चौक– सीतागुंफा रोड– सप्तशृंगी मंदिर या मार्गाने वाहतूक वळविण्यात आली आहे.

* **वाहनतळ (पार्किंग व्यवस्था) :** गौरी पटांगण येथे भाविक आपले वाहने पार्क करून सीतागुंफा व काळाराम मंदिर येथे दर्शन व धार्मिक विधीकरिता पायी जातील.

* **बॅरिकेडिंग पॉइंट :** १) हॉटेल रामा पॅलेस व सीतागुंफासमोर. २) ढिकले बंगल्यासमोरील पार्किंगसमोर. ३) काळाराम मंदिर उत्तर दरवाजासमोर. ४) काळाराम मंदिर दक्षिण दरवाजासमोर.

गांवकरी
www.gavakari.net
22 Jan 2026 - Page 8

# कुंभमेळामंत्री जेव्हा स्पीड बोट चालवतात...

**नाशिक : प्रतिनिधी**



कधी बिबट्याला पकडण्यासाठी मैदानात उतरणारे..लेझीम खेळण्यापासून तर ढोल वाजवत ठेका धरणारे, तर जळगावला थेट हायवा चालविण्यासही मागेपुढे न पाहणारे कुंभमेळामंत्री गिरीश महाजन हे नेहमीच चर्चेत राहतात. काल त्यांनी गंगापूर धरणात चक्क स्पीड बोटिंग चालवल्याने त्यांचा व्हिडिओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे.

गंगापूर धरण परिसरात आज आणि उद्या होणाऱ्या भारतीय वायुदलाच्या भव्य सूर्यकिरण 'एअर शो'च्या पार्श्वभूमीवर जलसंपदा व आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी काल सकाळी गंगापूर धरण परिसरास भेट देत प्रशासकीय यंत्रणेच्या तयारीचा सखोल आढावा घेतला. यावेळी त्यांनी गंगापूर धरण परिसरातील बोट क्लब येथे स्पीड बोटिंगचा आनंद घेत एक फेरी पूर्ण केली. लाइफ जॅकेट घालत त्यांनी लुटलेल्या बोटिंग सफारीचा आनंद कॅमेऱ्यात कैद झाला आणि सोशल मीडियावर व्हिडिओ तुफान व्हायरल झाला. यासंदर्भात नागरिकांच्या विविध प्रकारच्या कमेंटसही आल्या. यावेळी जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील, सहाय्यक जिल्हाधिकारी अर्पिता ठुबे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता नवनाथ सोनवणे, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अर्जुन गुंडे, निवासी उपजिल्हाधिकारी रोहितकुमार राजपूत यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

गांवकरी
www.gavakari.net
22 Jan 2026 - Page 8

# सिंहस्थासाठी सुशोभीकरणासाठी तांत्रिक सल्लागार समितीची स्थापना

**नाशिक : प्रतिनिधी**

नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा २०२७ च्या पार्श्वभूमीवर शहर सौंदर्यीकरण, सुशोभीकरण व नागरी रचनाविषयक कामे तज्ज्ञ मार्गदर्शनाखाली, नियोजनबद्ध व सांस्कृतिक संवेदनशीलतेने राबविण्यासाठी नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणांतर्गत शहर सुशोभीकरणासाठी तांत्रिक सल्लागार समिती स्थापन करण्यात आली आहे. कुंभमेळ्याच्या काळात लाखो भाविक नाशिक व त्र्यंबकेश्वर येथे दाखल होणार असल्याने शहराचे सौंदर्य, पर्यावरणीय संतुलन व सांस्कृतिक ओळख जपत, विकास करण्याच्या दृष्टीने हा निर्णय घेण्यात आला आहे. स्थापना करण्यात आलेल्या तांत्रिक सल्लागार समितीचे अध्यक्षपद, पर्यावरणीय लँडस्केपतज्ज्ञ व लँडस्केप आर्किटेक्ट डॉ. प्राजक्त बस्ते यांच्याकडे देण्यात आले आहे. समितीमध्ये सांस्कृतिक वारसा अभ्यासक दिनेश वैद्य, स्पर्शनीय व अमूर्त वारसा क्षेत्रातील तज्ज्ञ व संवर्धन वास्तुविशारद समृद्ध मोगल, तसेच कलाकार प्रफुल सावंत यांचा समावेश आहे. विविध क्षेत्रांतील तज्ज्ञांचा सहभाग असल्यामुळे शहर सुशोभीकरणाच्या कामांमध्ये पर्यावरण, वारसा संवर्धन, कार्यक्षम शहरी रचना व सौंदर्यदृष्टी यांचा समतोल राखला जाणार आहे. समिती, कुंभमेळा प्राधिकरण व त्यांच्या वतीने नेमण्यात आलेल्या सल्लागार संस्थांना संकल्पना मांडणी, आराखडा तयार करणे, नियोजन, निविदा प्रक्रिया व अंमलबजावणी या सर्व टप्प्यांवर तांत्रिक मार्गदर्शन व परीक्षण करणार आहे. समितीच्या कार्यकक्षेत गोदावरी नदीकाठावरील घाटांचे सुशोभीकरण व मजबुतीकरण, प्रमुख प्रवेश मार्ग व रस्त्यांचे सौंदर्यीकरण, महत्त्वाच्या चौकांचे शहरी लँडमार्क म्हणून विकास, उड्डाणपूल व पुलांचे सौंदर्यात्मक सुधारणा यांचा समावेश आहे. कुंभमेळा प्राधिकरण आयुक्त शेखर सिंह यांनी सांगितले, सिंहस्थ कुंभमेळा हा एक जागतिक स्तरावरील धार्मिक सोहळा आहे. यामुळेच सांस्कृतिक, ऐतिहासिक व जागतिक दर्जाची नाशिक व त्र्यंबकेश्वर शहरं घडविण्याची संधी आहे.

दै.महाराष्ट्र टाईम्स दि.२२जानेवारी,२०२६

# शिक्षक सात वर्षांपासून पगाराविना

## अभिनेते धर्मेंद्र यांच्या टोकडे येथील शाळेतील स्थिती

म. टा. प्रतिनिधी, नाशिक

मालेगाव तालुक्यातील टोकडे या गावी दिवंगत अभिनेते धर्मेंद्र यांच्या आर्थिक योगदानातून बाधण्यात आलेल्या व त्यांच्या आईच्या नावाने प्रसिद्ध असलेल्या सत्यवती कौर माध्यमिक विद्यालयातील एक शिक्षक तब्बल सात वर्षांपासून पगाराविना कार्यरत असल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. उपजीविकेच्या व संविधानातील कलम २१ अंतर्गत मूलभूत हक्कांचा गंभीर भंग करणारी ही बाब असल्याचे त्यांनी म्हटले आहे. याप्रश्नी पाठपुरावा करण्याचे आश्वासन शिक्षक आमदार किशोर दराडे यांनी त्यांना दिले आहे.

टोकडे गावातील कौर विद्यालय सुभाष कोंडीराम धाडिवाल यांना २०१० मध्ये शासकीय मान्यता मिळाली होती. या



मान्यतेच्या आधारावर त्यांनी नऊ वर्षे म्हणजे २०१९ पर्यंत शासकीय वेतन घेतले. सेवा बजावत असताना जून २०१९ मध्ये संस्थाचालकांनी स्वतःचे गैरकृत्य लपवण्यासाठी धाडिवाल यांची मान्यता बेकायदेशीरपणे रद्द करण्याबाबत शिक्षणाधिकारी, शिक्षण उपसंचालक कार्यालयास चुकीची माहिती दिली. वरिष्ठ कार्यालयानेही कागदपत्रांची शहानिशा न करता तत्कालीन शिक्षण उपसंचालकांनी १५ जून २०१९ रोजी अचानक धाडिवाल यांची मान्यता रद्द केली. मान्यता रद्द झाल्याने सात वर्षांपासून धाडिवाल वेतनापासून वंचित आहेत. यासाठी त्यांनी अनेक ठिकाणी दाद मागितली. यानंतर त्यांनी सामाजिक कार्यकर्ते विठोबा द्यानद्यान यांना आपबिती सांगितली. नंतर द्यानद्यान यांनी सर्व कागदपत्रांसह तत्कालीन शिक्षण उपसंचालक भाऊसाहेब चव्हाण यांचे मार्गदर्शन घेतले व वरिष्ठ स्तर मुंबईतील शिक्षण मंडळाच्या अध्यक्षांकडे सुनावणी घेण्यात आली व पुढील कार्यवाहीबाबत नाशिकमधील शिक्षण मंडळाचे भाऊसाहेब चव्हाण यांना धाडिवाल यांची मान्यता बहाल करण्याबाबत सांगितले. चव्हाण यांनीही ऑगस्ट २०२४ मध्ये धाडिवाल यांची मान्यता योग्य आहे याबाबत मुख्याध्यापक व संस्थाचालकांकडे कागदपत्रांची मागणी केली. मात्र, मुख्याध्यापक व संस्थाचालकांनी कागदपत्रे दिली नाहीत. प्रकरण पोलिसांत जाण्याच्या भीतीने मुख्याध्यापकांनी कागदपत्रे जमा केली. त्यातही कमतरता (पगारबिल) आढळून आली. याबाबत धाडिवाल यांनी बुधवारी झालेल्या शिक्षक परिषदेत आपबितीवर लक्ष वेधले. या प्रकरणाची दखल घेत शिक्षक आमदार दराडे यांनी ही बाब अत्यंत गंभीर असून, शिक्षकावर अन्याय होत असल्याचे मत व्यक्त केले. संबंधित विभागांनी तत्काळ वस्तुनिष्ठ चौकशी करून धाडिवाळ यांना न्याय मिळवून देण्याची आवश्यकता असल्याचे सांगितले. शिक्षण विभागाकडे याबाबत पाठपुरावा करून योग्य कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले.

# सुव्यवस्थेसाठी वाहतूकला 'बळ'

## आयुक्तालय नेमणार अतिरिक्त अंमलदार

म. टा. प्रतिनिधी, नाशिक

शहरातील वाहतूक सुरळीत राहण्यासाठी शंभर 'ट्रॅफिक वॉर्डन'ची तीन महिने नेमणूक करण्याकरिता निविदा काढलेल्या आयुक्तालयाने आता सुव्यवस्थेसाठी वाहतूकला 'बळ' देण्याचा निर्णय घेतला आहे. फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यापर्यंत अतिरिक्त अंमलदारांची नियुक्ती होणार आहे.

शहरातील एकवीस रस्ते, पाच पुलांसह नऊ रस्त्यांच्या दुरुस्तीचे काम सिंहस्थाच्या पार्श्वभूमीवर शहरात होत असल्याने वाहतुकीचा खोळंबा होत आहे. 'ट्रॅफिक वॉर्डन' आणि वाहतूक पोलिसांमार्फत वाहतूक सुरक्षेवर भर दिला जात असला, तरी मनुष्यबळ कमी पडत आहे. त्यामुळे हा निर्णय झाला आहे. पोलिस आयुक्त संदीप कर्णिक यांच्या आदेशान्वये वाहतूक उपायुक्त (अतिरिक्त कार्यभार) संदीप मिटके आणि सहाय्यक आयुक्त अद्विता शिंदे यांच्या पथकाने शहरातील वाहतूक नियमनाचा आढावा पूर्ण केला आहे. द्वारका येथील 'ग्रेड-सेप्रेटर'चे काम लवकरच सुरू होणार असून, शहरात सध्या पाचपेक्षा जास्त रस्ते, दोन बोगदे व एका लहान पुलाचे काम सुरू आहे. त्यामुळे पुढील टप्प्यात शहरातील सात वाहतूक पथकांना अतिरिक्त दहा ते पंधरा अंमलदार असे एकूण शंभरपेक्षा जास्त पोलिसांचे बळ दिले जाण्याची शक्यता आहे.

दरम्यान, महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळामार्फत नाशिक शहराच्या रिंगरोडचे काम प्रस्तावित आहे. नाशिक-मुंबई महामार्ग ते नाशिक-पुणे महामार्ग या पट्ट्यातील दोन महामार्गांना जोडणारा हा रिंगरोड असेल. त्यामध्ये रेल्वे स्थानक, बाह्य वाहनतळे, रेल्वेस्थानक, अमृतस्नानासाठी नियोजित घाटाकडे जाणाऱ्या रस्त्यांचा समावेश आहे. यासह साधुग्राम, अमृतस्नानाची ठिकाणे, अमृतमार्ग यासह प्रमुख रस्त्यांवर दुरुस्ती व नव्याने रुंदीकरण मंजूर आहे. त्यासाठी वाहतूक पोलिस, स्थानिक पोलिस ठाण्यांच्या पोलिसांसह अतिरिक्त मनुष्यबळाची तातडीची निकड भासत आहे. त्या पार्श्वभूमीवर तीन हजार 'ट्रॅफिक वॉर्डन' अपेक्षित असून, अतितातडीने ३६५ 'वॉर्डन' नोव्हेंबर २०२५ मध्ये मंजूर करण्यात आले आहेत.

### सिंहस्थाकरिता 'वाहतूक'ची विभागणी...

- मुख्य पथके : पंचवटी, सरकारवाडा, अंबड, नाशिकरोड
- अतिरिक्त : सातपूर, द्वारका, एक्स्लो पॉइंट

---

- महापालिका हद्दीत २१ रस्त्यांना मंजुरी; ९३०.२३ कोटी रुपये मंजूर
- महापालिका हद्दीत पाच ठिकाणी पूल बांधणी; ६२.८० कोटी रुपये मंजूर
- महापालिका हद्दीत नऊ ठिकाणी काँक्रिटीकरणासह डांबरीकरण; २९८.५५ कोटी रुपये मंजूर
- वाहतूकमध्ये एक उपायुक्त, एक सहाय्यक आयुक्त, सहा वरिष्ठ निरीक्षकासह एक उपनिरीक्षक नियुक्त
- शहरात सध्या राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (न्हाई), महापालिकेचे काही 'ट्रॅफिक वॉर्डन' कार्यरत
- पोलिसांमार्फत फेब्रुवारी महिन्यात १०० 'ट्रॅफिक वॉर्डन' नियुक्त होणार
- शहरात सुमारे सात किलोमीटर अंतरावर एक वाहतूक पोलिस अंमलदार नियुक्त

# होड्यांद्वारे पाणवेलींचे निर्मूलन

## ४३ लाख रुपयांच्या होड्या खरेदीचा जि. प. चा प्रस्ताव

म. टा. प्रतिनिधी, नाशिक

सिंहस्थाच्या तोंडावर सर्वच विभाग खडबडून कामाला लागल्यानंतर गोदाकाठच्या गावांना सतावणाऱ्या पाणवेलींचा प्रश्न कायमचा संपविण्यासाठी जिल्हा परिषदेने ४३ लाखांच्या होड्या खरेदीचा प्रस्ताव तयार केला आहे. या अगोदरही शहरातून जाणाऱ्या नदीच्या पात्रात वारंवार पाणवेलींच्या प्रश्नाने डोके वर काढले असताना त्यावर भरमसाठ खर्च केला होता. तरीही न मिटलेल्या या प्रश्नावर होड्या उपाय ठरतील का, याचे उत्तर येणारा काळच देऊ शकेल.



### ...असा आहे प्रस्ताव

पाणवेलींच्या निर्मूलनासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी जिल्हा परिषदेस प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना दिल्या होत्या. यानुसार ग्रामीण पाणीपुरवठा विभागाने होड्या खरेदीचा ४३ लाख रुपयांचा प्रस्ताव सादर केला. या प्रस्तावानुसार गोदावरी काठावरील १५ ग्रामपंचायत क्षेत्रात प्रत्येकी एक होडी देणे अपेक्षित आहे. या होडीच्या सहाय्याने संबंधित ग्रामपंचायतीने परिसरातील पाणवेलींचे निर्मलून करायचे आहे.

पाणवेलींच्या प्रादूर्भावास प्रामुख्याने पाणी प्रवाहित नसणे व गोदापात्रात मोठ्या प्रमाणावर सांडपाणी मिसळले जाणे, यासारखी कारणे आहेत. महापालिकेकडूनही मलनिस्सारण केंद्र उभारणे, सांडपाणी गोदावरीत थेट सांडपाणी मिसळू न देणे यासारखी कामे सुरू आहेत. पाणवेली काढण्यासाठी यंत्रांची मदत न घेता होड्यांमध्ये कर्मचाऱ्यांद्वारे नदीत साचलेल्या पाणवेली काढून घेण्याची ही योजना आहे. शहरातील गोदापात्रापासून तर चांदोरीच्या पुढील काही गावांपर्यंत ही समस्या व्यापक बनली आहे.

जिल्हा परिषदेने दोन वर्षांपूर्वी एका सामाजिक संस्थेच्या माध्यमातून चांदोरीमध्ये पाणवेलींपासून गृहोपयोगी वस्तू तयार करण्याचा प्रकल्प राबविला होता. यासाठी बचतगटातील महिलांची निवड करून त्यांना लाखो रुपये खर्च करून प्रशिक्षणही देण्यात आले होते. यासाठी आसामस्थित 'एनजीओ'ची मदत घेण्यात आली होती. मात्र, नंतर हा प्रकल्प गुंडाळला गेला. नाशिक मनपानेही पाणवेलींच्या समस्येशी लढण्यासाठी यंत्रसामग्रीत पैसे घालवूनही समस्या कायम राहिली. गोदेत मिसळणारे सांडपाणी महापालिका रोखू न शकल्याने याचा भुर्दंड जिल्ह्यातील ग्रामपंचायतींनाही बसू लागला आहे.

# गिरीश महाजन यांना ध्वजवंदनाचा मान

**म. टा. विशेष प्रतिनिधी,** नाशिक

७७ व्या प्रजासत्ताक दिनी नाशिकमध्ये शासकीय ध्वजवंदनाचा मान कुंभमेळामंत्री गिरीश महाजन यांना देण्यात आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यासंदर्भात यादी जाहीर केली. पालकमंत्र्यांच्या हस्ते ध्वजवंदनाचा प्रघात असल्याने महाजन हेच नाशिकचे पालकमंत्री होण्याचे संकेत मिळाले आहेत. शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांना अमरावतीत शासकीय ध्वजवंदनाचा मान मिळाला आहे.

गेल्या वर्षी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जानेवारीत दावोस दौऱ्यावर रवाना होण्यापूर्वी राज्यातील ३६ जिल्ह्यांचे पालकमंत्री घोषित केले होते. त्यात नाशिकच्या पालकमंत्रिपदी जलसंपदामंत्री गिरीश महाजन, तर रायगडच्या पालकमंत्रिपदी महिला व बालकल्याण विकासमंत्री अदिती तटकरे यांची नियुक्ती केली होती. याला शिवसेनेने विरोध केला होता.

# बनावट पदवीच्या आधारे नोकरी

## 'आयएसपी'मधील कर्मचाऱ्याविरोधात गुन्हा

म. टा. वृत्तसेवा, नाशिकरोड

गुजरातमधील एका विश्वविद्यालयातून मिळविलेल्या बनावट पदवीच्या आधारे उत्तर प्रदेशमधील एका कर्मचाऱ्याने नाशिकरोड येथील भारत प्रतिभूती मुद्रणालयात कनिष्ठ कार्यालय सहाय्यक पदावर नोकरी मिळविल्याचा धक्कादायक प्रकार शैक्षणिक कागदपत्रांच्या पडताळणीतून उघडकीस आला आहे. विशेष म्हणजे संशयिताने गेल्या आठ वर्षांपूर्वीच भारत प्रतिभूती मुद्रणालयात (आयएसपी) नोकरी मिळवलेली आहे.

दीपककुमार रामपाल सिंग (रा. चौधरान, सिसौली, जि. मुज्जफरनगर, उत्तर प्रदेश) असे या फसवणुकीच्या प्रकरणातील संशयिताचे नाव आहे. भारत प्रतिभूती मुद्रणालयाच्या विधी विभागाच्या उपप्रबंधक शिवांगी चंद्रा यांच्या फिर्यादीनुसार संशयित दीपककुमार सिंग याच्याविरोधात आयएसपी प्रशासनाची फसवणूक केल्याप्रकरणी नाशिकरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मार्च २०१८ मध्ये संशयित दीपककुमार हा कनिष्ठ कार्यालय सहायक या पदावर आयएसपीमध्ये रुजू झाला होता. ही नोकरी मिळविताना संशयिताने साबरमती विद्यापीठ, अहमदाबाद, गुजरात शिक्षण विश्वविद्यालय येथून प्राप्त केलेले कला शाखेच्या पदवीचे गुणपत्रक हे शैक्षणिक कागदपत्रे सादर केली होती. या कागदपत्रांची पडताळणी करण्यासाठी आयएसपी प्रशासनाने गुजरातला पाठविली असता, दीपककुमार याचे शैक्षणिक पदवी गुणपत्रक बनावट असल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली. या बनावट कागदपत्रांच्या आधारे संशयित दीपककुमार याने भारत प्रतिभूती मुद्रणालय प्रशासनाची फसवणूक करून नोकरी मिळविल्याची बाब निष्पन्न झाली. संशयित दीपककुमार पसार असून, नाशिकरोड पोलिस त्याचा शोध घेत आहेत. पोलिस उपनिरीक्षक अहिरे या गुन्ह्याचा पुढील तपास करीत आहेत.




- आठ वर्षांपासून भारत प्रतिभूती मुद्रणालयात कनिष्ठ कार्यालय सहायक पदावर कार्यरत
- साबरमती विद्यापीठ, अहमदाबाद, गुजरात शिक्षण विश्वविद्यालय येथील पदवीचे बनवले बनावट प्रमाणपत्र
- कागदपत्रे पडताळणीत पदवी बनावट असल्याचे उघडकीस

# ‘वाइन पार्क’मध्ये ‘एमडी’

## विंचूरला ५० लाखांचे ड्रग्ज जप्त; संशयितात फार्मासिस्टचा समावेश

**म. टा. वृत्तसेवा, निफाड**

वाइन पार्क अशी ओळख असलेल्या विंचूर एमआयडीसी परिसरात ग्रामीण पोलिस अधीक्षकांचे विशेष पथक व स्थानिक गुन्हे शाखा (नाशिक ग्रामीण) यांच्या संयुक्त कारवाईत विंचूर एमआयडीसी परिसरात सुमारे ५० लाखांचे एमडी (मेफेड्रॉन) पोलिसांनी जप्त केले. संशयित म्हणून ताब्यात घेतलेले दोघे वैद्यकीय क्षेत्राशी संबंधित आहेत.

नाशिक ग्रामीण पोलिस अधीक्षकांच्या विशेष पथकाला गुप्त माहिती मिळाल्यानंतर त्यांनी लासलगाव ठाण्याचे पोलिस निरीक्षक भास्कर शिंदे यांना कळविले. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली सापळा रचण्यात आला. विंचूर एमआयडीसीजवळ याकूब खालिद मोमीन (वय ४६, रा. इस्लामपुरा, विंचूर) याला पोलिसांनी ताब्यात घेतले असता त्याच्याकडे ३१५ ग्रॅम ९ मिली वजनाची एमडी पावडर मिळाली. अधिक चौकशी केली असता त्याने ते संदेश अंबादास फापाळे (वय ३५, रा. मरळगोई) याच्याकडून खरेदी केल्याची कबुली दिली. खालिद याच्या घराची झडती घेतली असता तेथे ३८६ ग्रॅम ४१ मिली एमडी पावडर मिळून आली. एकूण ७०१ ग्रॅम १ मिली एमडी पावडर, मोपेड, मोबाइल असा एकूण ५० लाख १५ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल दोघा संशयितांकडून जप्त करण्यात आला. त्यांच्यावर लासलगाव पोलिस स्टेशनमध्ये एनपीडीएस कायद्यान्वये गुन्हा नोंदवून त्यांना ताब्यात घेण्यात आले. उपविभागीय पोलिस अधिकारी हरिश खेडकर, पोलिस निरीक्षक रवींद्र मगर, उपनिरीक्षक हर्षल भोळे, अरुण भिसे, शैलेश पाटील, सहायक पोलिस निरीक्षक भास्कर शिंदे, उपनिरीक्षक मोहन पाटील, मलदार सुशांत मरकड, प्रमोद मंडलिक आदींच्या पथकाने ही कारवाई केली.



### संशयितांची पार्श्वभूमी वैद्यकीय क्षेत्रातील

संशयित संदेश अंबादास फापाळे याचे विंचूर येथील एका हॉस्पिटलमध्ये मेडिकल स्टोअर असल्याची माहिती आहे, तर मोमीन खालिद हा याच हॉस्पिटलमध्ये शासनाच्या योजनांतून आर्थिक गरजू रुग्णांना देण्यासाठीच्या फाइल तयार करण्याचे काम करतो, असे समजते.

### विंचूरला चाललेय काय?

१६ जानेवारी रोजी विंचूर येथील कॉलनीत एका बंगल्यात अवैध मद्य बनवण्याचा कारखाना उत्पादन शुल्क विभागाने उद्ध्वस्त केला. ही घटना ताजी असतानाच विंचूरमध्ये चक्क एमडी ड्रग विकले जात असल्याची धक्कादायक माहिती समोर आली. उत्पादन शुल्क आणि स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाला या अवैध गोष्टी माहिती होतात, पण स्थानिक पोलिसांना त्या कशा कळत नाहीत, असा सवाल उपस्थित होत आहे.

# कुंभमेळ्यापूर्वी दोन थर्मल युनिट सुरू करण्याचा प्रयत्न

**महाजेनको-एनटीपीसीत भागधारक करार**



> वीजनिर्मितीसाठी आवश्यक असलेला कोळसा उपलब्ध व्हावा, यासाठी महाजेनकोचे अधिकारी ऑल इंडिया स्तरावरील कोळसा पुरवठा करणाऱ्या कंपन्यांशी चर्चा करत आहेत
>
> -अतुल सोनजे, मुख्य अभियंता, महाजेनको

म. टा. वृत्तसेवा, सिन्नर

कुंभमेळ्यापूर्वी सिन्नर थर्मल पॉवर प्रकल्पातील २७० मेगावॅट क्षमतेची दोन युनिट सुरू करण्याचे उद्दिष्ट महाजेनकोने ठेवले असून, त्या दृष्टीने महत्त्वाचा टप्पा पूर्ण झाला आहे. सिन्नर थर्मल पॉवर लिमिटेडच्या अधिग्रहणासाठी महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लिमिटेड तथा महाजेनको आणि एनटीपीसी लिमिटेड यांच्यात नवी दिल्ली येथे भागधारक करारावर स्वाक्षरी करण्यात आली. २२ फेब्रुवारी २०२६ नंतर या प्रकल्पाचे अधिकृत हस्तांतरण होणार आहे.

राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरणाने (एनसीएलटी) मंजूर केलेल्या ठराव योजनेनुसार २२ फेब्रुवारी २०२६ पर्यंत ३८०० कोटी रुपये महाजेनको आणि एनटीपीसीने भरावयाचे असून, त्यानंतर सिन्नर थर्मल पॉवर प्रकल्पाचे अधिकृत हस्तांतरण या दोन्ही कंपन्यांकडे करण्यात येणार आहे. ही अधिग्रहण प्रक्रिया कॉर्पोरेट दिवाळखोरी निवारण प्रक्रिया (आयबीसी) २०१६ अंतर्गत राबविण्यात येत आहे.

नवी दिल्ली येथील एनटीपीसीच्या स्कोप कार्यालयात झालेल्या करारावर महाजेनकोकडून अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक राधाकृष्णन बी., प्रकल्प संचालक अभय हरणे, प्रकल्प व नियोजनचे मुख्य अभियंता अतुल सोनजे, तर एनटीपीसीकडून अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक गुरदीप सिंग, संचालक (वित्त) जयकुमार श्रीनिवासन, संचालक (संचलन) रविंदर सिंग यांच्यासह वरिष्ठ अधिकाऱ्यांनी स्वाक्षरी केली.

## रोजगार निर्मितीला चालना

सिन्नर थर्मल प्रकल्प पुनरुज्जीवित झाल्यास सिन्नर व परिसरात स्थानिक रोजगारनिर्मिती, पायाभूत सुविधा विकासाला चालना मिळणार असून, महाराष्ट्राच्या वाढत्या औद्योगिक व घरगुती वीज गरजांची पूर्तता करण्यास हा प्रकल्प महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. राज्य व केंद्र शासनाच्या सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांमधील समन्वयामुळे हा महत्त्वाकांक्षी ऊर्जा प्रकल्प प्रत्यक्षात साकार होत असल्याचे चित्र आहे.

# नाशिकचे रस्ते होणार भक्कम

## महापालिकेचा आयआयटी मुंबईशी सामंजस्य करार

म. टा. विशेष प्रतिनिधी, नाशिक

आगामी सिंहस्थ मेळ्याच्या पार्श्वभूमीवर शहरातील रस्ते आणि पायाभूत सुविधांची कामे गुणवत्तापूर्वक होण्यासाठी महापालिकेतील अभियंत्यांना मुंबईस्थित भारतीय तंत्रज्ञान संस्थान अर्थात आयआयटीकडून धडे देण्यात आले आहेत. रस्ते बांधकामातील गुणवत्तापूर्ण पद्धती, अद्ययावत तंत्रज्ञान, ऑन-साइट, तसेच प्रयोगशाळेत वापरल्या जाणाऱ्या चाचणी यंत्रणा याबाबतची माहिती या वेळी अभियंत्यांनी जाणून घेतली. रस्ते बांधकामात मार्गदर्शन करण्यासाठी महापालिका आणि आयआयटी मुंबई यांच्यात सामंजस्य करार केला जाणार आहे.

आगामी सिंहस्थात होणाऱ्या विकासकामांच्या पार्श्वभूमीवर महापालिकेच्या सार्वजनिक बांधकाम (सिव्हिल) विभागाच्या संपूर्ण अभियांत्रिकी पथकाने मुंबई येथील भारतीय तंत्रज्ञान संस्थेच्या विशेष कार्यशाळेत सहभाग घेतला. कार्यशाळेत महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप चौधरी, मुख्य अभियंता संजय अग्रवाल यांच्या उपस्थितीत कार्यकारी अभियंते संदेश शिंदे, रवींद्र बागूल, रवींद्र पाटील, प्रशांत पगार आणि नवनीत भामरे सहभागी झाले होते. याशिवाय उपअभियंते, तसेच कनिष्ठ अभियंत्यांचीही मोठ्या संख्येने उपस्थिती होती. मुंबई येथील आयआयटीचे तज्ज्ञ प्राध्यापक धर्मवीरसिंग यांच्या मार्गदर्शनाखाली रस्ते बांधकामातील गुणवत्तापूर्ण पद्धती, अद्ययावत तंत्रज्ञान, ऑन-साइट, तसेच प्रयोगशाळेत वापरल्या जाणाऱ्या चाचणी यंत्रणा याबाबत माहिती देण्यात आली. काँक्रीट रस्ते व डांबरी रस्त्यांच्या बांधकामासाठी आवश्यक मोजमाप, दर्जा नियंत्रणाचे निकष, योग्य बांधकाम पद्धती, तसेच प्रत्यक्ष चाचणी प्रात्यक्षिके या कार्यशाळेचे मुख्य भाग होते. या उपक्रमामुळे सिंहस्थ मेळ्याच्या पार्श्वभूमीवर शहरात दर्जेदार व टिकाऊ रस्ते विकसित करण्यास मदत होणार असून, त्याचबरोबर नाशिक महापालिकेच्या प्रयोगशाळा, पायाभूत सुविधाही अधिक सक्षम करण्याचा उद्देश आहे.

### तांत्रिक अडचणींवर मार्गदर्शन

महापालिका आयुक्त मनीषा खत्री यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमाअंतर्गत महापालिका व आयआयटी यांच्यात दीर्घकालीन सहकार्य प्रस्थापित करण्याचा मानस आहे. याअंतर्गत आयआयटी मुंबईचे तज्ज्ञ वेळोवेळी महापालिकेच्या कामकाजस्थळांना भेट देऊन रस्ते बांधकामादरम्यान उद्भवणाऱ्या गुणवत्तेशी संबंधित अडचणींवर तांत्रिक मार्गदर्शन करतील. या सहकार्याला औपचारिक स्वरूप देण्यासाठी दोन्ही संस्थांमध्ये सामंजस्य करार करण्यात येणार आहे.

# 'रामकाल पथ'चे काम मार्गी

म. टा. प्रतिनिधी, नाशिक

सिंहस्थानिमित्त पंचवटी परिसरात साकारण्यात येणाऱ्या 'रामकाल पथ' प्रकल्पाअंतर्गत रस्त्यांचे कॉंक्रिटीकरण आणि सुशोभीकरणाचे काम सुरू झाले आहे. हे काम सुमारे अडीच महिने सुरू राहणार असल्याने वाहतूक पोलिसांनी पंचवटीतील गल्लीबोळांतील वाहतूक मार्गांत बदल केले आहेत.

पंचवटी विभागातील काळाराम मंदिर, कपालेश्वर, गोदाघाट परिसरात या कामामुळे पुढील काही दिवस वाहतूक कोंडीची समस्या उद्भवण्याची शक्यता आहे. सिंहस्थाच्या पार्श्वभूमीवर 'रामकाल पथ' साकारण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने सीतागुंफा, काळाराम मंदिर परिसरातील रस्त्यांचे कॉंक्रिटीकरण, पेव्हर ब्लॉक बसविण्यासह विविध स्वरूपाचे काम सुरू झाले आहे. त्यासाठी सुमारे ७० दिवसांचा कालावधी निर्धारित करण्यात आला आहे. त्याकरिता वाहतूक पोलिस उपायुक्त (अतिरिक्त कार्यभार) संदीप मिटके यांनी वाहतूक मार्गांत बदल केल्याची अधिसूचना जारी केली आहे. दरम्यान, सध्या शहरातील टिळकवाडी सिग्नल ते जलतरण तलाव सिग्नल, जुना गंगापूर नाका ते शरणपूर पोलिस चौकी, त्र्यंबकरोड, इंदिरानगर व राणेनगर बोगदा येथील दुरुस्तीची कामे सुरू असल्याने वाहतूक वळविण्यात आली आहे. त्यातच आता रामकुंड व पंचवटी परिसरातील कामकाजामुळे तेथील गल्लीबोळांतील वाहतुकीतही बदल करण्यात आला आहे.

### वाहनतळ सुविधा

- गौरी पटांगण येथेच भाविकांना आपली वाहने उभी करून पुढे सीतागुंफा व काळाराम मंदिराकडे जाता येईल

### बॅरिकेडिंगची ठिकाणे

- हॉटिल रामा पॅलेस आणि सीतागुंफासमोर, ढिकले बंगल्यासमोरील पार्किंगसमोर
- काळाराम मंदिर उत्तर दरवाजासमोर, काळाराम मंदिर दक्षिण दरवाजासमोर



### ..या भागात प्रवेश बंद

- काळाराम मंदिराकडून सीतागुंफा या मार्गावर सर्वप्रकारांच्या वाहनांना प्रवेश बंद राहील
- काळाराम मंदिर उत्तर, पूर्व व दक्षिण दरवाजासमोरच्या रस्त्यावर दुतर्फा वाहनांना प्रवेश बंद

### पर्यायी मार्ग असे..

- श्री काळाराम मंदिरापासून नाग चौक, काट्या मारुती चौक, गणेशवाडीतून गौरी पटांगणामार्गे इतरत्र
- श्री काळाराम मंदिरापासून नाग चौक, सीतागुंफा, सप्तशृंगी देवी मंदिरापासून इतरत्र

# ‘रामकाल पथ’चे काम मार्गी

म. टा. प्रतिनिधी, नाशिक

सिंहस्थानिमित्त पंचवटी परिसरात साकारण्यात येणाऱ्या 'रामकाल पथ' प्रकल्पाअंतर्गत रस्त्यांचे काँक्रिटीकरण आणि सुशोभीकरणाचे काम सुरू झाले आहे. हे काम सुमारे अडीच महिने सुरू राहणार असल्याने वाहतूक पोलिसांनी पंचवटीतील गल्लीबोळांतील वाहतूक मार्गांत बदल केले आहेत.

पंचवटी विभागातील काळाराम मंदिर, कपालेश्वर, गोदाघाट परिसरात या कामामुळे पुढील काही दिवस वाहतूक कोंडीची समस्या उद्भवण्याची शक्यता आहे. सिंहस्थाच्या पार्श्वभूमीवर 'रामकाल पथ' साकारण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने सीतागुंफा, काळाराम मंदिर परिसरातील रस्त्यांचे काँक्रिटीकरण, पेव्हर ब्लॉक बसविण्यासह विविध स्वरूपाचे काम सुरू झाले आहे. त्यासाठी सुमारे ७० दिवसांचा कालावधी निर्धारित करण्यात आला आहे. त्याकरिता वाहतूक पोलिस उपायुक्त (अतिरिक्त कार्यभार) संदीप मिटके यांनी वाहतूक मार्गांत बदल केल्याची अधिसूचना जारी केली आहे. दरम्यान, सध्या शहरातील टिळकवाडी सिग्नल ते जलतरण तलाव सिग्नल, जुना गंगापूर नाका ते शरणपूर पोलिस चौकी, त्र्यंबकरोड, इंदिरानगर व राणेनगर बोगदा येथील दुरुस्तीची कामे सुरू असल्याने वाहतूक वळविण्यात आली आहे. त्यातच आता रामकुंड व पंचवटी परिसरातील कामकाजामुळे तेथील गल्लीबोळांतील वाहतुकीतही बदल करण्यात आला आहे.

### वाहनतळ सुविधा

- गौरी पटांगण येथेच भाविकांना आपली वाहने उभी करून पुढे सीतागुंफा व काळाराम मंदिराकडे जाता येईल

### बॅरिकेडिंगची ठिकाणे

- हॉटेल रामा पॅलेस आणि सीतागुंफासमोर, ढिकले बंगल्यासमोरील पार्किंगसमोर
- काळाराम मंदिर उत्तर दरवाजासमोर, काळाराम मंदिर दक्षिण दरवाजासमोर



### ..या भागात प्रवेश बंद

- काळाराम मंदिराकडून सीतागुंफा या मार्गावर सर्वप्रकारांच्या वाहनांना प्रवेश बंद राहील
- काळाराम मंदिर उत्तर, पूर्व व दक्षिण दरवाजासमोरच्या रस्त्यावर दुतर्फा वाहनांना प्रवेश बंद

### पर्यायी मार्ग असे..

- श्री काळाराम मंदिरापासून नाग चौक, काट्या मारुती चौक, गणेशवाडीतून गौरी पटांगणामार्गे इतरत्र
- श्री काळाराम मंदिरापासून नाग चौक, सीतागुंफा, सप्तशृंगी देवी मंदिरापासून इतरत्र

# सुशोभीकरणासाठी तांत्रिक सल्लागार समिती

## कुंभमेळा प्राधिकरणाकडून स्थापना

**म. टा. खास प्रतिनिधी**, नाशिक

सिंहस्थाच्या पार्श्वभूमीवर शहर सौंदर्यीकरण, सुशोभीकरणासह नागरी रचनाविषयक कामे देखणी आणि दर्जेदार व्हावीत, याकरिता कुंभमेळा प्राधिकरणाने तांत्रिक सल्लागार समिती स्थापन केली आहे. सिंहस्थात नाशिक व त्र्यंबकेश्वर शहराचे सौंदर्य, पर्यावरणीय संतुलन व सांस्कृतिक ओळख जपत विकास करण्याकरिता हा निर्णय घेण्यात आला आहे.

तांत्रिक सल्लागार समितीच्या अध्यक्षपदी पर्यावरणीय लँडस्केप तज्ज्ञ व लँडस्केप आर्किटेक्ट डॉ. प्राजक्ता बस्ते यांची निवड करण्यात आली आहे. समितीत सांस्कृतिक वारसा अभ्यासक, अमूर्त वारसा क्षेत्रातील तज्ज्ञ व संवर्धन वास्तुविशारद, दिनेश वैद्य, समृद्ध मोगल, प्रफुल सावंत आदींचा समावेश आहे. तज्ज्ञांच्या सहभागामुळे शहर सुशोभीकरणाच्या कामांत पर्यावरण, वारसा संवर्धन, कार्यक्षम शहरी रचना व सौंदर्यदृष्टीचा समतोल राखला जाणार आहे.

ही समिती कुंभमेळा प्राधिकरणाने नेमलेल्या सल्लागार संस्थांच्या संकल्पना मांडणी, आराखडा तयार करणे, नियोजन, निविदा प्रक्रिया व अंमलबजावणीच्या टप्प्यांवर तांत्रिक मार्गदर्शनासह परीक्षण करणार आहे.

**“ तांत्रिक सल्लागार समितीच्या माध्यमातून शहर सुशोभीकरणाची कामे स्थानिक संदर्भ, पर्यावरणीय शाश्वत आणि दीर्घकालीन उपयोग लक्षात घेऊन राबविली जातील. यामुळे भाविकांना सुरक्षित, सुसज्ज आणि संस्मरणीय अनुभव मिळेल.**

– शेखर सिंह, आयुक्त, कुंभमेळा प्राधिकरण

गोदावरी नदीकाठावरील घाटांचे सुशोभीकरण व मजबुतीकरण, प्रमुख प्रवेश मार्ग व रस्त्यांचे सौंदर्यीकरण, महत्त्वाच्या चौकांचे शहरी लँडमार्क म्हणून विकास, उड्डाणपूल व पुलांची सौंदर्यात्मक सुधारणा या गोष्टी समितीच्या कार्यकक्षेत असतील.

दिशादर्शक फलक व बहुभाषिक सूचना प्रणाली, घाट, सार्वजनिक जागा व वारसास्थळांचे प्रकाशयोजन, साधुग्राम परिसराचे सौंदर्यीकरण, 'पेंट माय सिटी'सारख्या उपक्रमांतर्गत, भित्तिचित्रे, दर्शनी भागांचे रंगकाम व सार्वजनिक कला प्रकल्प, उद्याने, हरित पट्ट्यांचे व विश्रांतिस्थळांचे नियोजन, कुंभमेळा मुख्य परिसरासह ५० किलोमीटर परिसरातील वारसास्थळांच्या संवर्धनाबाबत समिती मार्गदर्शन करेल. कुंभमेळ्याशी संबंधित परंपरा, लोककला, संगीत व मौखिक परंपरांचे दस्तऐवजीकरण समिती करेल.

साईमत

# नाशिकच्या आकाशात सूर्यकिरण विमाने साकारणार तिरंगा

## गंगापूर धरण परिसरात आजपासून दोन दिवस विमानांचा थरार

नाशिक। प्रतिनिधी।

**भारतीय वायू दल आणि जिल्हा प्रशासनाच्या माध्यमातून गंगापूर धरण परिसरात २२ व २३ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १० ते दुपारी १२ या कालावधीत होणाऱ्या एरोबॅटिक शोमध्ये सूर्यकिरण लढाऊ विमाने तिरंगा साकारणार आहेत. या शोची अव्यत तयारी पूर्णत्वास आली असून नाशिकची सून असलेल्या फ्लाईट लेफ्टनंट आणि सूर्यकिरण टीमच्या जनसंपर्क अधिकारी कवल संधू या शोचे धावते वर्णन करणार आहेत.**

**सूर्यकिरण एरोबॅटिक शोची माहिती देण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयातील मध्यवर्ती सभागृहात आज सायंकाळी पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी वरील माहिती देण्यात आली.**

यावेळी जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, भारतीय वायू दलाचे स्क्वॉड्रन लिडर गौरव पटेल, संदीप दयाळ, फ्लाईट लेफ्ट. कवल संधू, निवासी उपजिल्हाधिकारी रोहितकुमार राजपूत, संरक्षण दलाच्या सदर्न कमांडचे जनसंपर्क अधिकारी अंकुश चव्हाण आदी उपस्थित होते.

सूर्यकिरण टीम १९९६ मध्ये स्थापन झाली आहे. या टीमने देश-विदेशात झालेल्या ७५० पेक्षा एरोबॅटिक शोमध्ये सहभाग नोंदविला आहे. आशिया खंडातील ही सर्वोत्तम टीम मानली जाते. या टीममध्ये लढाऊ वैमानिक, अभियंता, कुशल तंत्रज्ञ यांच्यासह दीडशे जणांचा समावेश आहे.

सूर्यकिरण शोच्या प्रात्यक्षिकांसाठी हॉक एमके १३२ या स्वदेशी प्रशिक्षणार्थी विमानांचा वापर केला जाणार आहे. या विमानांचा २०१५ मध्ये समावेश करण्यात आला आहे. ही विमाने वेगवेगळी प्रात्यक्षिके दाखवीत असताना त्यातून केशरी, पांढरा आणि हिरवा रंग म्हणजे तिरंगा रंग



सोडला जातो. त्यासाठी या विमानात केलेल्या तांत्रिक सुधारणाही नाशिक येथेच करण्यात आल्या आहेत.

सूर्यकिरण टीममध्ये स्क्वॉड्रन लीडर गौरव पटेल यांच्यासह ग्रुप कॅप्टन अजय दशरथी, डेप्युटी लीडर ग्रुप कॅप्टन सिद्धेश कार्तिक, स्क्वॉड्रन लीडर जसदीप सिंह, संजेश सिंह, राहुल सिंह, अंकित वसिष्ठ, दिवाकर शर्मा, एडवर्ड प्रिन्स, ललित वर्मा, विंग कमांडर राजेश काजला, विंग कमांडर तेजेश्वर सिंह यांचा, तर तांत्रिक टीममध्ये विंग कमांडर अभिमन्यू त्याग, स्क्वॉड्रन लीडर संदीप दयाळ, फ्लाइट लेफ्ट. मनीष शर्मा यांचा समावेश आहे.

सूर्यकिरण विमाने प्रात्यक्षिक सादर करताना त्यांच्यात किमान पाच मीटर अंतर राहील. ते गंगापूर धरणावर वेगवेगळी प्रात्यक्षिक सादर करतील. त्यासाठी सुरक्षिततेची खबरदारी घेण्यात आली आहे. सूर्यकिरण टीममधील विमाने बुधवारी (दि. २१) रोजी सकाळी ९ वाजेदरम्यान

नाशिक शहरात दाखल होतील. फ्लाइट लेफ्ट. असलेल्या कवल संधू यांचे सासर नाशिक असून ते या एरोबॅटिक शोचे संपूर्ण धावते वर्णन करणार आहेत. नाशिककर

> 'सदैव सर्वोत्तम' हे सूर्यकिरण टीमचे बोधवाक्य आहे. त्यानुसार २२ व २३ जानेवारी २०२६ रोजी गंगापूर धरण परिसरात सर्वोत्तम एरोबॅटिक शोचे प्रदर्शन करण्यात येईल.
>
> **-कवल संधू,** फ्लाईट लेफ्टनंट तथा जनसंपर्क अधिकारी, सूर्यकिरण टीम.

नागरिकांनी एरोबॅटिक शोचा आनंद घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी श्री. प्रसाद यांच्यासह स्क्वॉड्रन लीडर गौरव पटेल, संदीप दयाळ यांच्यासह जिल्हा प्रशासनाने केले आहे.

एरोबॅटिक शोमुळे नाशिक शहर आणि जिल्ह्यातील तरुणांना देशभक्तीची प्रेरणा मिळणार आहे. या बरोबरच नाशिकचे पर्यटन वाढणार आहे. नागरिकांनी या शोचा निश्चित लाभ घेऊन भारतीय हवाई दलाच्या थरारक कसरती प्रत्यक्ष पाहाव्यात, असे जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी सांगितले.

लोकमत

# त्र्यंबकेश्वर सिंहस्थ विकासकामांची प्रतीक्षा संपण्याची संकेत

## नगराध्यक्ष नगरसेवकांसह प्रशासकीय अधिकाऱ्यांकडून शहराची प्रत्यक्ष पाहणी

त्र्यंबकेश्वर। प्रतिनिधी ।

**सिंहस्थ कुंभमेळा अगदी उंबरठ्यावर येऊन ठेपला असतांनाही विकासकामांना अद्याप गती नव्हे तर सुरुवातच झाली नसल्याने स्थानिक नागरिक आणि भाविकांमध्ये नाराजीचे वातावरण पसरले होते. या पार्श्वभूमीवर त्र्यंबक नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा, सर्व नगरसेवक आणि महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी शहरात संयुक्त पाहणी दौरा केला. या पाहणीमुळे रखडलेल्या कामांना आता लवकरच मुहूर्त लाभणार असल्याची आशा शहरवासियांना वाटत आहे.**



सिंहस्थ कामांच्या संदर्भात सुरुवातीला नगरपरिषद सभागृहात एक महत्त्वाची बैठक पार पडली. यावेळी नगरसेवकांनी दर्शनपथ, मेन रोडवरील गंगा स्लॅब आणि रस्त्यांच्या कामांबाबत अनेक प्रश्न उपस्थित केले. महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळाचे अधिकारी व वास्तुविशारदांनी या प्रश्नांना उत्तरे देऊन कामांचा आराखडाच स्पष्ट केला.

स्थळ पाहणी आणि नियोजित बदल बैठकीनंतर प्रत्यक्ष स्थळ पाहणी करण्यात आली. यामध्ये प्रामुख्याने पुढील बाबींवर चर्चा झाली. त्र्यंबकेश्वर मंदिराच्या पश्चिम दरवाजाजवळ आणि ऋणमुक्तेश्वर मंदिरासमोर 'प्रसाद योजने'तून बसवण्यात आलेले दगड निघाल्याने भाविकांना मोठा त्रास होत आहे. कारण दर्शन घेतांना मंदिरात जाते समयी व दर्शन घेऊन बाहेर अनवाणी पायाने जावे यावे लागते. त्यामुळेच निघालेल्या दगडांनी भाविक ठेचकाळत चालावे लागते. या ठिकाणी पूर्वीप्रमाणेच प्राचीन दगडी रस्ता तयार करण्याबाबत गांभीर्याने विचार करण्यात आला. शहरातील अंतर्गत रस्ते तयार करताना दीड फूट खोल खोदकाम केले जाणार आहे. यामुळे पावसाळ्यात रस्त्यावरील पाणी थेट घरात शिरण्याची समस्या कायमची दूर होण्यास मदत होईल.

या पाहणी दौऱ्यात नगराध्यक्षा त्रिवेणी तुंगार, उपनगराध्यक्षा मंजू वारुणसे, नगरसेवक पूजा खाटीकडे, संध्या देवरे, कल्पना लहांगे, अमोल कडलग, रंगनाथ जाधव, पल्लवी शिरसाट, लीला कोरडे, कुणाल उगले, रत्नप्रभा कदम, सूरज पाटील, नितीन रामायणे, माजी प्र.नगराध्यक्ष रवींद्र सोनवणे, अशोक लहांगे, सागर उजे, नामदेव कोरडे, सागर आडके, नगरपरिषद शहर अभियंता स्वप्नील काकड, आदींसह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

Nashik Edition
Jan 22, 2026 Page No. 2
Powered by: erelego.com

सार्वमत

# सिंहस्थ कुंभमेळा २०२७ च्या पार्श्वभूमीवर देवळाली कॅम्प परिसरातील रस्ते, पूल व वाहतूक नियोजनाची पाहणी

**नाशिक । प्रतिनिधी ।**



आगामी सिंहस्थ कुंभमेळा २०२७ च्या पार्श्वभूमीवर महापालिका आयुक्तांनी गांधी नगर रोडवरील आर्टिलरी सेंटर अंतर्गत देवळाली गाव व देवळाली कॅम्प परिसराला भेट देऊन नियोजित पूल, मुख्य रस्ते, अंतर्गत रस्ते तसेच बाह्य संपर्क रस्त्यांच्या विकासकामांची सविस्तर पाहणी केली.

देवळाली कॅन्टोन्मेंट बोर्ड अंतर्गत असलेल्या रस्त्यांची प्रत्यक्ष पाहणी करून हे रस्ते पुढे जाऊन नाशिक महानगरपालिकेच्या रस्त्यांशी नेमके कुठे व कशा पद्धतीने जोडले जातात, त्या ठिकाणी कुठे वाहतुकीचा अडथळा निर्माण होतो, तसेच कुठे अजून रस्तेविकास, सुधारणा किंवा रुंदीकरणाची आवश्यकता आहे, याचा सविस्तर आढावा घेण्यात आला. या पाहणीदरम्यान ब्रिगेडियर एन. आर. पांडे, व्हीएसएम (कमांडंट, आर्टिलरी सेंटर, नाशिक) व कर्नल डी. के. सिंग (देवळाली कॅन्टोन्मेंट) यांच्यासोबत मनपा आयुक्तांची सविस्तर चर्चा झाली.

यावेळी देवळाली रेल्वे स्टेशनच्या भूमिकेवर विशेष भर देण्यात आला. कुंभमेळ्याच्या काळात मुंबई तसेच दक्षिण भारताकडून येणाऱ्या मोठ्या प्रमाणातील रेल्वे गाड्या देवळाली स्टेशन येथे थांबणार असल्याने, तेथून उतरणाऱ्या भाविकांना घाट परिसराकडे सुरक्षित, सुकर व नियोजित मार्गाने कसे वळवायचे, याबाबत वाहतूक नियोजनाच्या दृष्टीने सर्व बाबी तपासण्यात आल्या. भाविकांच्या वाढीव गर्दीचा विचार करून पर्यायी मार्ग, स्वतंत्र वाहतूक प्रवाह व आवश्यक तेथे रस्ते रुंदीकरण यासंदर्भातही प्राथमिक नियोजन करण्यात आले.

चर्चेनुसार, देवळाली कॅम्प परिसरातील अंतर्गत रस्त्यांचा विकास आर्मी कॅम्प प्रशासनामार्फत करण्यात येणार असून, कॅम्पच्या बाह्य रस्त्यांचा तसेच महानगरपालिकेच्या हद्दीतील संपर्क रस्त्यांचा विकास नाशिक महानगरपालिकेमार्फत करण्यात येणार आहे. या पाहणीवेळी नाशिक महानगरपालिकेचे शहर अभियंता संजय अग्रवाल व कार्यकारी अभियंता नवनीत भामरे त्याचप्रमाणे इतर अधिकारी देखील उपस्थित होते. त्यांनी रस्त्यांची सद्यस्थिती, भविष्यातील वाहतूक भार, आवश्यक तांत्रिक सुधारणा व नियोजित कामांबाबत माहिती सादर केली.

यावेळी आर्मी प्रशासनाकडून आवश्यक असलेल्या नाहरकत प्रमाणपत्रे व परवानग्या जलदगतीने देण्यासाठी सहकार्य करण्याची सकारात्मक भूमिका स्पष्ट करण्यात आली. यामुळे महानगरपालिकेच्या विविध विकासकामांना गती मिळणार आहे. तसेच नाशिक महानगरपालिकेच्या प्रलंबित नाहरकत प्रमाणपत्रे व परवानगी विषयक बाबींचा तातडीने निपटारा करण्यासाठी आयुक्त व संबंधित अधिकारी स्वतः विविध कार्यालयांना भेट देऊन समन्वय साधणार आहेत. जेणेकरून कुंभमेळ्याच्या दृष्टीने अत्यावश्यक असलेली कामे वेगाने पूर्ण करता येतील.

सिंहस्थ कुंभमेळा २०२७ दरम्यान भाविक, नागरिक व पर्यटकांसाठी सुरक्षित, सुकर व दर्जेदार पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आर्मी प्रशासन व नाशिक महानगरपालिका यांच्यात समन्वयाने नियोजनबद्ध पद्धतीने कामे राबवली जातील.

Nashik Edition
Jan 22, 2026 Page No. 7
Powered by: erelego.com

लोकमत

# वीजबिल भरा, नाहीतर अंधारात रहा! महावितरणचा थकबाकीदारांना इशारा

## चार हजार ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित

**जळगाव । प्रतिनिधी**

जळगाव, धुळे व नंदुरबार जिल्ह्यात महावितरणने वीजबिल थकबाकीदारांविरुद्ध धडक मोहीम सुरू आहे. वारंवार आवाहन करूनही बिल भरण्यास प्रतिसाद न देणाऱ्या जवळपास चार हजार ग्राहकांचा वीजपुरवठा चालू महिन्यात खंडित करण्यात आला आहे. थकबाकीदारांनी बिल न भरल्यास त्यांना अंधारात राहण्याची वेळ येणार आहे.

जळगाव परिमंडलात वीजबिलांच्या प्रचंड थकबाकीमुळे महावितरणसमोर अडचणी निर्माण झाल्या आहेत. जळगाव, धुळे व नंदुरबार या तिन्ही जिल्ह्यात कृषी वर्गवारी वगळता महावितरणची ११२९ कोटी २९ लाख रुपयांची थकबाकी आहे. यात जळगाव जिल्ह्यात ५६८ कोटी ६६ लाख, धुळे जिल्ह्यात ३३० कोटी १० लाख व नंदुरबार जिल्ह्यात २३०कोटी ५३लाख रुपयांची थकबाकी आहे. वारंवार आवाहन करूनही अनेक ग्राहकांनी वीजबिल न भरल्याने महावितरणच्या थकबाकीचा आकडा दिवसेंदिवस वाढत आहे.

महावितरणने आता थकबाकीदारांची वीजजोडणी खंडित करण्याची धडक मोहीम सुरू केली आहे. या महिन्यात जळगाव जिल्ह्यातील २११०, धुळे जिल्ह्यातील १०८४ व नंदुरबार जिल्ह्यातील ५३६ ग्राहकांचा वीजपुरवठा तात्पुरता खंडित करण्यात आला आहे.




महावितरणने ऑनलाइन वीजबिल भरण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. यूपीआय नेट बँकिंग, वॉलेट्स, मोबाईल ॲप्सवरील फोन पे, गुगल पे आणि महावितरणच्या वेबसाइटद्वारे घरबसल्या वीजबिल भरण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. विशेष म्हणजे ऑनलाईन व वेळेत पेमेंट करणाऱ्यांना महावितरणकडून भरघोस सूट दिली जाते.

**कारवाईत अडथळे आणल्यास गुन्हे दाखल होणार**

थकबाकी वसुलीसाठी महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची विशेष स्वतंत्र पथके तैनात करण्यात आली आहेत. काही संवेदनशील भागांत कर्मचाऱ्यांना विरोध होण्याची शक्यता लक्षात घेता, ही कारवाई पोलिस बंदोबस्तात केली जाणार आहे. कोणत्याही प्रकारची गुंडगिरी किंवा राजकीय दबावाला बळी न पडता ही मोहीम अधिक गतिमान केली जाणार असल्याचे सांगण्यात आले. मोहिमेत अडथळा आणणाऱ्यांवर पोलिसांत गुन्हे दाखल करण्याचा इशारा महावितरणने दिला आहे.

**डिस्कनेक्शनचा मन:स्ताप व रिकनेक्शनचा भुर्दंड टाळा**

महावितरणने आपले वीज कनेक्शन तोडण्याची वाट न पाहता ग्राहकांनी चालू महिन्याच्या वीजबिलासह थकबाकीची रक्कम विनाविलंब भरून सहकार्य करावे. थकबाकीसाठी कनेक्शन तोडल्यास बिलाच्या रकमेसह पुनर्जोडणी शुल्क भरावे लागते. सिंगल फेज जोडणीसाठी 310 रुपये तर थ्री फेजजोडणीसाठी 520 रुपये पुनर्जोडणी शुल्क आकारले जाते. हा भुर्दंड टाळण्यासाठी वेळेत वीजबिल भरणे आवश्यक असल्याचे महावितरणने म्हटले आहे.

महावितरणतर्फे सर्व वर्गवारीतील ग्राहकांनी तातडीने थकीत वीजबिल भरणे नियमाने गरजेचे आहे. अन्यथा महावितरणचे कर्मचारी कधीही त्यांच्या घरी जाऊन वीजपुरवठा खंडित करू शकतात. त्यामुळे होणारी गैरसोय टाळण्यासाठी थकित वीजबिल भरून महावितरणला सहकार्य करावे.

आय.ए. मुलाणी, मुख्य अभियंता, महावितरण, जळगाव परिमंडल

Jalgaon Edition
Jan 22, 2026 Page No. 5
Powered by: erelego.com

शब्दांना सत्याची धार
प्रहार

# ज्ञान, तंत्रज्ञान, विदेशी गुंतवणूक मिळविण्यासाठी दावोस दौरा

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा दावा

### तिसऱ्या मुंबईतील रायगड-पेण ग्रोथ सेंटरची घोषणा, एक लाख कोटींची गुंतवणूक येणार

◆ दावोस (वृत्तसंस्था) :

स्वित्झर्लंडमध्ये वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या वार्षिक बैठकीच्या निमित्ताने करण्यात येणारा दावोस दौरा हा भारतात आणि पर्यायाने महाराष्ट्रात ज्ञान, तंत्रज्ञान आणि विदेशी गुंतवणूक मिळविण्यासाठीचा महत्त्वाचा प्रयत्न असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी येथे सांगितले. दुसऱ्या दिवशी तिसऱ्या मुंबईतील पहिले शहर म्हणून रायगड-पेण ग्रोथ सेंटरची घोषणा करण्यात आली.

बुधवारी प्रामुख्याने धोरणात्मक असे सामंजस्य करार करण्यात आले. ज्यामध्ये युनिव्हर्सिटी ऑफ कॅलिफोर्निया, युनिव्हर्सिटी ऑफ बर्कले, टेक्निकल युनिव्हर्सिटी ऑफ म्युनिक, अर्बन फ्युचर्स कलेक्टिव्ह-लंडन, आयसीसीआय-इटली, अंलॉग ट्युनिंग इन्स्टिट्यूट, नॉर्वेजियन जीओ टेक्निकल इन्स्टिट्यूट, अर्बन प्लॅनिंगमधील सुबाना जुरोंग – सिंगापूर यांच्यासोबत टेक्निकल सामंजस्य करार केले आहेत. यातून एक प्रकारे आम्ही केवळ गुंतवणूक नाही, तर ज्ञान आणि तंत्रज्ञान आणतो. यातून मोठ्या प्रमाणात उद्योग आणता येतील, वेगवेगळ्या क्षेत्रात चांगल्यारितीने काम करता येईल. अर्बन प्लॅनिंग, ट्रान्सपोर्टशी संबंधित करारांमुळे प्रत्येक शहरातील वाहतूक सुविधांची संरचना चांगल्या रितीने करता येणार आहे. दावोस दौऱ्यातून नॉलेज–ज्ञान, टेक्नॉलॉजी – तंत्रज्ञान आणि एफडीआय – विदेशी गुंतवणूक मिळविता येते. त्याचा देशाला आणि पर्यायाने राज्याला मोठा फायदा होतो.



### जागतिक बँकेचे अध्यक्ष बंगा यांच्याशी चर्चा

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जागतिक बँकेचे अध्यक्ष अजय बंगा यांच्याशी चर्चा केली. यामध्ये महाराष्ट्रात हरित औद्योगिक पट्टा (ग्रीन इंडस्ट्रीयल कॉरिडॉर) विकसित करण्याच्या आनुषंगाने चर्चा झाली. यामुळे महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात विदेशी गुंतवणूक येऊ शकते. यातून एमएसएमई क्षेत्रातील स्पर्धात्मक वातावरण तसेच निर्यात क्षमतेला मोठा वाव मिळणार आहे. शासन आणि बँकेच्या सहकार्यातून महाराष्ट्रातील धोरणात्मक आणि प्रभावी औद्योगिक विकासाला चालना देता येणार आहे.

### रायगड-पेण ग्रोथ सेंटरची घोषणा, नवीन बिझनेस डिस्ट्रिक्टची निर्मिती

■ नवी मुंबई विमानतळापासून पंधरा ते वीस किलोमीटरवर हे ग्रोथ सेंटर निर्माण करण्यात येणार आहे. त्याबाबत दावोसमध्ये घोषणा करण्यात आली. गेल्या तीन-चार वर्षांपासून यासाठीच्या परवानग्या मिळविण्यात येत होत्या. त्या मिळाल्यानंतर बुधवारी या तिसऱ्या मुंबईतील पहिल्या शहराची घोषणा करण्यात येत असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

■ याठिकाणी प्लग अँड प्ले या धर्तीवर रेडी टू स्टार्ट पद्धतीने संबंधित घटक लगेच कामकाज सुरू करणार आहेत. ही देशातील पहिली कंपनी, यामध्ये खासगी – सार्वजनिक भागीदारी (पीपीपी) प्रकल्प असणार आहे. यात शासन, एमएमआरडीए आणि खासगी घटक एकत्र येऊन काम करतील. याठिकाणी नवीन बिझनेस डिस्ट्रिक्ट तयार करत आहोत. याठिकाणी चांगल्या पगाराच्या नोकऱ्या तसेच ग्लोबल कॅपिसीटी सेंटर्स, फिनटेकची इकोसिस्टम तयार होईल. बीकेसीच्या धर्तीवर याठिकाणी बिझनेस डिस्ट्रिक्ट स्थापन होईल. या शहराच्या घोषणेनंतर सुमारे एक लाख कोटींच्या गुंतवणुकीचे सामंजस्य करार देखील झाले आहेत. यासाठी जगातील दिग्गज अशा कंपन्यांनी उत्तम प्रतिसाद दिला आहे. त्यामध्ये रिपब्लिक ऑफ कोरियाचा हवाना ग्रुप, स्वित्झर्लंडमधून एसएसबी ग्रुप, एन्सार, फेडेक्स हे अमेरिकेतील समूह, फिनलंडचा रिव्हर रिसायकल समूह, दुबईचा एमजीएसए समूह, सिंगापूरचा स्पेसेस होल्डिंग मेपल ट्री, जीनव्ही आणि इंडोस्पेस पार्क समूह, अमेरिकेतून ट्रिबेका डेव्हलपर्स. या विदेशी गुंतवणुकीतून एक खूप चांगले शहर तयार होईल. याठिकाणी वॉक टू वर्क अशा पद्धतीने सुविधा निर्माण होतील.

### दावोसमध्ये महाराष्ट्र पॅव्हेलियनच 'मॅग्नेटिक'; उद्योग, गुंतवणूकदारांच्या आवर्जून भेटी

दरम्यान, दावोसमध्ये साकारण्यात आलेले मॅग्नेटिक महाराष्ट्राचे पॅव्हेलियन आकर्षणाचे केंद्र राहिल्याचे चित्र होते. या पॅव्हेलियनला विविध क्षेत्रांतील उद्योजक, गुंतवणूकदारांसह, भारतातील मान्यवरांनी आवर्जून भेट दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उद्योग मंत्री उदय सामंत यांच्यासह महाराष्ट्राच्या प्रतिनिधी मंडळाने या सर्व मान्यवरांचे स्वागत केले. दावोस दौऱ्यावर आलेल्या भारताचे रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची इंडिया पॅव्हेलियनमध्ये मुख्यमंत्री फडणवीस यांनी सदिच्छा भेट घेऊन, त्यांना शुभेच्छा दिल्या.

शब्दांना सत्याची धार
प्रहार

# रेल्वे अर्थसंकल्पाकडे त्र्यंबकवासीयांचे लक्ष

## लोकप्रतिनिधींच्या दुर्लक्षामुळे नाराजी

◆ त्र्यंबकेश्वर (प्रतिनिधी):

यंदाच्या केंद्रीय रेल्वे अर्थसंकल्पाकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागले असताना, त्र्यंबकेश्वरमधील भाविक आणि नागरिकांच्या अपेक्षा उंचावल्या आहेत. आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर त्र्यंबकेश्वरला रेल्वेने जोडले जाणार का? याकडे सर्वांचे डोळे लागले आहेत. मात्र, या महत्त्वाच्या विषयाकडे स्थानिक खासदार आणि आमदारांचे दुर्लक्ष होत असल्याची भावना जनतेत निर्माण झाली आहे.

कुंभमेळ्यासाठी रेल्वे कनेक्टिव्हिटी महत्त्वाची नाशिक येथे होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी परराज्यातून लाखो भाविक येत असतात. त्यांच्या सोयीसाठी नाशिकमध्ये नवीन रेल्वे गाड्यांची घोषणा होण्याची शक्यता आहे. मात्र, त्र्यंबकेश्वर हे महत्त्वाचे ज्योतिर्लिंग असूनही अद्याप रेल्वेने जोडले गेलेले नाही. जर त्र्यंबकेश्वरला रेल्वेने जोडले, तर भाविक थेट या तीर्थक्षेत्री पोहोचू शकतील, ज्यामुळे तालुक्याचा विकास अधिक वेगाने होईल.



**कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर त्र्यंबकेश्वर रेल्वेने जोडण्याची जुनी मागणी कायम**

प्रमुख प्रलंबित मागण्या: १. त्र्यंबक - डहाणू रेल्वे मार्ग: कोकण आणि पश्चिम महाराष्ट्राला जोडणारा दुवा. २. त्र्यंबक - कसारा जोडणी: मुंबईशी थेट संपर्क वाढवण्यासाठी उपयुक्त. ३. नाशिक रोड ते त्र्यंबकेश्वर मेट्रो: स्थानिक वाहतूक कोंडी फोडण्यासाठी महत्त्वाचा प्रकल्प. ४. दोन ज्योतिर्लिंग जोडणी: त्र्यंबकेश्वर ते सौराष्ट्र (सोमनाथ) अशा थेट रेल्वेची मागणी.

लोकप्रतिनिधींच्या भूमिकेकडे जनतेचे लक्ष देशातील सर्व प्रमुख तीर्थक्षेत्रे आणि कुंभमेळा शहरे रेल्वेने जोडलेली असताना, त्र्यंबकेश्वरच्या बाबतीत मात्र उदासीनता दिसत आहे. त्र्यंबकचे आमदार आणि खासदारांनी या प्रश्नाकडे ताकदीने लक्ष द्यावे आणि केंद्र सरकारकडे पाठपुरावा करावा, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे. रेल्वे सुविधेमुळे केवळ भाविकांची सोय होणार नाही, तर स्थानिकांसाठी रोजगाराच्या नवीन संधीही उपलब्ध होतील. यंदाच्या बजेटमध्ये केंद्र सरकार त्र्यंबकेश्वरसाठी रेल्वेची 'शिट्टी' वाजवणार की पुन्हा एकदा पदरी निराशाच पडणार, हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल.

Nashik Edition
Jan, 22 2026 Page No, 8
https://epaper.prahaar.in

दै.नवराष्ट्र

दि.२२ जानेवारी,२०२६

नवराष्ट्र Jalgaon | 22 January 2026 | Page 2

**प्रयत्न ● समृद्धी महामार्ग प्रकल्पात पद्मालयाच्या समावेशाची मागणी**

# पर्यटन विकासाचे नवे दालन उघडणार

▸ एरंडोल, (वा.) मुंबई ते नागपूर या समृद्धी महामार्गाला जळगाव शहर जोडण्याच्या नियोजित प्रकल्पात आता 'श्रीक्षेत्र पद्मालय' या तीर्थक्षेत्राचा समावेश करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. नेरी येथून पद्मालय या मार्गाचे अंतर कमी असल्याने हा जोडप्रकल्प साकारल्यास खान्देशातील या जागृत देवस्थानाचा कायापालट होऊन पर्यटनाचे नवे पर्व सुरू होईल असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

पद्मालय हे केवळ श्रद्धास्थान नसून ते जगातील एक अनन्यसाधारण तीर्थक्षेत्र आहे. येथे एकाच पीठावर उजव्या आणि डाव्या सोंडेची गणेश मूर्ती विराजमान आहे. असे दर्शन संपूर्ण जगात अन्य कोठेही उपलब्ध नाही. समृद्धी महामार्गाच्या कनेक्टिव्हिटीमुळे या वैशिष्ट्याचा प्रचार व प्रसार होऊन विदर्भ, मराठवाडा आणि थेट मुंबईपर्यंत होऊन भाविकांच्या संख्येत विक्रमी वाढ होऊन पर्यटन विकासाला चालना मिळेल.



## पर्यटकांसाठी पर्याय...

विशेष म्हणजे शहरी गजबजाटातून बाहेर पडून निसर्गाच्या सानिध्यात वेळ घालवू इच्छिणाऱ्या 'हाय-प्रोफाईल' पर्यटकांसाठी पद्मालय हा उत्तम पर्याय ठरू शकतो. डोंगरमाथ्यावर वसलेले हे स्थळ सृष्टी सौंदर्याने नटलेले आहे.अजिंठा-वेरूळ लेणी पाहण्यासाठी येणाऱ्या परदेशी पर्यटकांनाही हा मार्ग जवळ असल्याने, पद्मालय त्यांच्यासाठी एक प्रमुख आकर्षण ठरू शकते.

## स्थानिक बेरोजगारांना मिळणार रोजगार

परिणामी हॉटेल व्यवसाय, वाहतूक आणि गाईडस अशा विविध माध्यमातून स्थानिक बेरोजगारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. तसेच स्वयंरोजगार, उद्योग व व्यवसाय यांची भरभराट होईल. जळगाव जिल्ह्यातील केंद्रीय मंत्री, राज्यातील मंत्री आणि स्थानिक आमदार अमोल पाटील यांनी शासन स्तरावर पाठपुरावा करून या जोडप्रकल्पात पद्मालयाचा समावेश करावा, अशी आग्रही मागणी भाविक, स्थानिक नागरिक आणि पर्यटकांकडून केली जात आहे. यासाठी लोकप्रतिनिधींनी यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. राजकारण बाजुला सारून हे काम शक्य होईल.

दुरूस्ती ● पर्यायी मार्गांचा वापर करण्याचे प्रशासनाकडून नागरिकांना आवाहन

# रामकाल पथसाठी वाहतूक मार्गात बदल

▶ नाशिक (प्र.) पंचवटीतील अत्यंत अरूंद आणि घनदाट वस्ती असलेल्या भागातून होणाऱ्या रामकाल पथ प्रकल्पातंर्गत क्रॉंक्रीटीकरण व सुशोभीकरणाचे काम हाती घेण्यात येणार आहे. यामुळे येथील वाहतूक मार्गात बदल करण्यात आला. जवळपास अडीच महिने हे काम सुरू राहणार आहे. सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर सिता गुंफा, काळाराम मंदिर परिसरातील विविध ठिकाणी सिमेंट कॉंकिटचे रस्ते बनवण्यासह पेव्हर ब्लॉक टाकणे, तसेच मालेगाव स्टॅंटकडून रामकुंडाकडे येणाऱ्या रस्त्यावर कमान टाकण्याचे काम हाती घेण्यात येणार आहे. या कामासाठी प्रशासनाने ७० दिवसांचा कालावधी निर्धारित केला आहे. यामुळे वाहतूक विभागाचे पोलिस उपायुक्त संदीप मिटके यांनी वाहतूक मार्गात बदल करण्यासाठीची अधिसूचना प्रसिद्ध केली. तसेच संबंधित ठेकेदारांना सर्व सूचना फलक लावण्यासह येथे २० ट्रॅफिक वार्डन नियुक्त करण्याचे आदेशीत करण्यात आले आहे.



## एकाचवेळी तीन ठिकाणी वाहतूक मार्गांमध्ये बदल

शहरात सध्या टिळकवाडी सिग्नल ते जलतरण तलाव सिग्नल जुना गंगापूर नाका ते शरणपूररोड पोलिस चौकी आणि आता रामकाल पथ या कामांसाठी वाहतूक मार्गात बदल करण्यात आला आहे. प्रत्यक्षात तिन्ही मार्गावर कामे सुरू झालेली नसून, वाहनचालकांना यापुढे तारेवरची कसरत करावी लागणार आहे.

- प्रवेश बंद मार्ग : काळाराम मंदिराकडून सिता गुंफा या मार्गावर सर्व प्रकारांच्या वाहनांना प्रवेश बंद, काळाराम मंदिर उत्तर, पूर्व व दक्षिण दरवाजा समोरील रोडवरून येणाऱ्या व जाणाऱ्या वाहनांसाठी प्रवेश बंद
- या पर्यायी मार्गाचा करा वापर : श्रीराम मंदिर, नागचौक, काट्या मारूती चौक, गणेशवाडी आणि पुढे गौरी पटांगण, श्रीराम मंदिर, नागचौक, सितागुंफा, सप्तश्रृंगी मंदिर

## या ठिकाणी उभी करता येतील वाहने

- गौरी पटांगण- येथेच भाविकांना आपली वाहने पार्क करून पुढे सिता गुंफा व काळाराम मंदिराकडे जात येईल.
- बॅरकेटींग पॉईंट- हॉटेल रामा पॅलेस व सिता गुंफासमोर, ढिकले बंगल्यासमोरील पार्किंग समोर, काळाराम मंदिर उत्तर दरवाजासमोर, काळाराम मंदिर दक्षिण दरवाजासमोर

### पाहणी ● नगराध्यक्षांनी केली पाहणी; दर्शन पथ, मेनरोड वरील कामांचा घेतला आढावा

# त्र्यंबकच्या विकासकामांचा प्रश्न लागणार मार्गी

▶ त्र्यंबकेश्वर (वा.) सिंहस्थ कुंभमेळा उंबरठ्यावर आला असतांना अद्यापपर्यंत कामांना प्रारंभ होत नसल्याने आणि दर्शनपथ, मेनरोड गंगास्लॅब यांच्या बाबत नागरिकांमध्ये दिवसेंदिवस वाढत असलेली संभ्रमावस्था या पार्श्वभूमीवर त्र्यंबक नगर परिषद सभागृहात महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ संस्थेचे अधिकारी व वास्तुविशारद यांची संयुक्त बैठक झाली. या बैठकीत दर्शनपथ आणि इतर विकासकामांच्या बाबत माहिती दिली. यावेळी नगरसेवकांनी शंका उपस्थित केल्या व नेमके कोणते काम होणार हे समजावून घेतले. त्यानंतर सर्वांनी मिळून स्थळ पाहणी केली. यामध्ये दर्शन पथाच्या जागेला भेट दिली. तसेच शहरातील प्रमुख रस्ते, मेनरोड गंगास्लॅब परिसराची पाहणी केली. यावेळी नगराध्यक्षा त्रिवेणी तुंगार व सर्व नगरसेवक



आणि नगर परिषद अभियंता स्वप्नील काकड उपस्थित होते. त्र्यंबकेश्वर मंदिराच्या पश्चिम दरवाजाच्या बाजूला असलेल्या ऋणमुक्तेश्वर मंदिराच्या समोरच्या रस्त्यावर प्रसाद योजनेतून दगड बसवण्यात आले आहेत. अल्पावधीत दगड वर आले आहेत. येथून पूजक, पुजारी आणि स्थानिक भाविक अनवाणी पावलांनी दर्शनाला जातात तेव्हा ते ठेच लागून पडतात.

याबाबत माहिती घेत असतांना येथे पूर्वी असलेला प्राचीन दगडी रस्ता बुजवण्यात आल्याचे व त्यावर वेळोवेळी कॉंकीट, पेव्हर ब्लॉक व नव्याने अनुकुचीदार दगड बसवले आहेत हे तेथे उपस्थित असलेले मंदिराचे विश्वस्त व मुख्य पूजक डॉ. सत्यप्रिय शुक्ल यांनी निदर्शनास आणून दिले.

## दर्शनपथ ६७ कोटींचाच

दर्शन पथाच्या बाबत अद्यापही संभ्रमावस्था कायम राहिली आहे. दिनाक ५ ऑक्टोबर २०२६ रोजी दर्शनपथ म्हणजेच कॉरिडॉर तसेच टॉयलेट ब्लॉक आणि परिसर विकास यासाठी निवीदा प्रसिध्द झाली आहे. त्यास आता ७५ दिवस उलटले मात्र याबाबत अंतीम आराखडापर्यंत तयार नसल्याचे दिसून येत आहे. दर्शनपथाचे काम करण्यासाठी त्र्यंबक नगर परिषदेचे नाहरकत प्रमाणपत्र गरजेचे आहे . मात्र नगर परिषदेला देखील एमएसआयडीसी या संस्थेने अधिकृत स्वाक्षरी असलेला नकाशा आराखडा सादर केलेला नाही.

# देवळालीत मनपा-आर्मी प्रशासनाकडून पाहणी



**नाशिकरोड (प्र.)** आगामी सिंहस्थ कुंभमेळा २०२७ च्या पार्श्वभूमीवर नाशिक महानगरपालिका आणि आर्मी प्रशासनाने कंबर कसली आहे. भाविकांच्या सोयीसाठी आणि वाहतूक कोंडी टाळण्यासाठी महापालिका आयुक्तांनी गांधी नगर रोडवरील आर्टिलरी सेंटरसह देवळाली गाव व देवळाली कॅम्प परिसरातील विकासकामांची सविस्तर पाहणी केली.

**या कामांवर दिला जाणार भर**

मनपा आयुक्तांनी आर्टिलरी सेंटरचे कमांडंट ब्रिगेडियर एन. आर. पांडे आणि कर्नल डी. के. सिंग (देवळाली कॅन्टोन्मेंट) यांच्याशी रस्ते विकास आणि वाहतूक नियोजनाबाबत सविस्तर चर्चा केली. देवळाली कॅन्टोन्मेंट बोर्डाचे रस्ते नाशिक महानगरपालिकेच्या रस्त्यांना जिथे जोडले जातात, त्या ठिकाणचे अडथळे दूर करणे, रस्त्यांचे रुंदीकरण आणि आवश्यक सुधारणांचा आढावा घेण्यात आला. देवळाली रेल्वे स्टेशनवर विशेष भरः कुंभमेळ्याच्या काळात मुंबई आणि दक्षिण भारतातून येणाऱ्या रेल्वे गाड्या देवळाली स्टेशनवर थांबणार आहेत. येथून उतरणाऱ्या भाविकांना सुरक्षितपणे आणि नियोजित मार्गाने घाट परिसराकडे वळवण्यासाठी पर्यायी मार्ग व स्वतंत्र वाहतूक प्रवाहाचे नियोजन केले जात आहे.

## सिंहस्थ कुंभमेळ्याची पूर्वतयारी

## जबाबदाऱ्यांचे वाटप

देवळाली कॅम्पमधील अंतर्गत रस्त्यांचा विकास आर्मी कॅम्प प्रशासन करणार आहे, तर बाह्य संपर्क रस्त्यांचा विकास नाशिक महानगरपालिका करणार आहे. आर्मी प्रशासनाने विकासकामांसाठी आवश्यक असलेली नाहरकत प्रमाणपत्रे आणि परवानग्या जलदगतीने देण्याचे आश्वासन दिले आहे.

प्रलंबित कामांचा तातडीने निपटारा करण्यासाठी आयुक्त स्वतः विविध कार्यालयांना भेटी देऊन समन्वय साधणार आहेत, जेणेकरून कुंभमेळ्यापूर्वी सर्व कामे पूर्ण होतील. या पाहणीवेळी मनपाचे शहर अभियंता संजय अग्रवाल, कार्यकारी अभियंता नवनीत भामरे आणि इतर अधिकारी उपस्थित होते. भाविक आणि पर्यटकांना दर्जेदार पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी दोन्ही प्रशासन आता एकत्रितपणे काम करणार आहे

### उपक्रम ● 'एअर शो'साठी प्रशासन सज्ज; नागरिकांनी सहकार्य करण्याचे आवाहन

# ॲरोबॅटिक पथकाच्या आज हवाई कसरती

▶ **नाशिक (प्र.)** भारतीय हवाई दलाच्या जागतिक कीर्तीच्या सूर्यकिरण ॲरोबॅटिक पथकाच्या (स्कॅट) हवाई कसरती (एअर शो) आज गंगापूर धरणाच्या अवकाशात दिसणार आहेत. ही मनमोहक आणि चित्तथरारक दृश्ये डोळ्यात साठवण्यासाठी नाशिककरांनी मोठ्या प्रमाणात तिकीट खरेदी केली आहेत. यासाठी प्रशासनातर्फेदेखील जय्यत तयारी करण्यात आली असून, चोख पोलिस बंदोबस्त या भागात तैनात करण्यात आला आहे. या ठिकाणी मोठ्या प्रमाणात गर्दी होणार असल्याने वाहतूक कोंडी टाळण्यासाठी आरक्षित तिकीटधारकांना ठरवून दिलेल्या मार्गानेच प्रवास करण्याचे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.



## नाशिकचा ॲरोबॅटिक शो अविस्मरणीय होणार

नाशिकमध्ये होणारा एरोबॅटिक शो अविस्मरणीय होणार आहे. यामुळे सर्व विभागांनी सतर्कता बाळगावी. हा कार्यक्रम सुंदर झाला पाहिजे. आवश्यकतेनुसार परिसरातील ग्रामस्थांची मदत घ्यावी. या शोसाठी शाळकरी मुलांना प्राधान्य द्यावे. गर्दीचे नियोजन करावे. आरोग्य सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. त्याचबरोबर या कार्यक्रमासाठी जास्तीत जास्त विद्यार्थी उपस्थित राहतील यासाठी विशेष प्रयत्न करावेत अशा सूचना त्यांनी दिल्या. नाशिकमध्ये प्रथमच असा शो होत आहे. विविध विभाग सहभागी झाले आहेत. हा शो यशस्वी होण्यासाठी सर्वतोपरी दक्षता घेण्यात आली आहे. गर्दी व्यवस्थापनाचे नियोजन करण्यात आले आहे. याशिवाय वाहनतळ तयार केले आहेत. याचठिकाणी पाणीपुरवठा, स्वच्छता, आरोग्याची काळजी घेण्यात आली आहे. या शोमुळे नाशिक जिल्ह्यातील पर्यटन वाढीसाठी मदत होणार आहे.

## हॉक एम के १३२ या स्वदेशी प्रशिक्षणार्थी विमानांचा होणार वापर

सूर्यकिरण शो च्या प्रात्यक्षिकांसाठी हॉक एमके १३२ या स्वदेशी प्रशिक्षणार्थी विमानांचा वापर केला जाणार आहे. या विमानांचा २०१५ मध्ये समावेश करण्यात आला आहे. ही विमाने वेगवेगळी प्रात्यक्षिके दाखवीत असताना त्यातून केशरी, पांढरा आणि हिरवा रंग म्हणजे तिरंगा रंग सोडला जातो. त्यासाठी या विमानात केलेल्या तांत्रिक सुधारणाही नाशिक येथेच करण्यात आल्या आहेत. सूर्यकिरण टीममध्ये स्क्वॉड्रन लीडर गौरव पटेल यांच्यासह ग्रुप कॅप्टन अजय दशरथी, डेप्युटी लीडर ग्रुप कॅप्टन सिद्धेश कार्तिक, स्क्वॉड्रन लीडर जसदीप सिंह, संजेश सिंह, राहुल सिंह, अंकित वसिष्ठ, दिवाकर शर्मा, एडवर्ड प्रिन्स, ललित वर्मा, विंग कमांडर राजेश काजला, विंग कमांडर तेजेश्वर सिंह यांचा समावेश या टीममध्ये असणार आहे.

# पर्यावरण संतुलन, सांस्कृतिक ओळख जपून विकासासाठी प्रयत्न

## शहर सुशोभीकरणासाठी तांत्रिक सल्ला

▶ नाशिक (प्र.) नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा २०२७ च्या पार्श्वभूमीवर शहर सौंदर्यीकरण, सुशोभीकरण व नागरी रचना विषयक कामे तज्ज्ञ मार्गदर्शनाखाली, नियोजनबद्ध व सांस्कृतिक संवेदनशीलतेने राबविण्यासाठी नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण अंतर्गत, शहर सुशोभीकरणासाठी, तांत्रिक सल्लागार समिती स्थापन करण्यात आली आहे. कुंभमेळ्याच्या काळात लाखो भाविक नाशिक व त्र्यंबकेश्वर येथे दाखल होणार असल्याने, शहराचे सौंदर्य, पर्यावरणीय संतुलन व सांस्कृतिक ओळख जपत, विकास करण्याच्या दृष्टीने हा निर्णय घेण्यात आला आहे. स्थापना करण्यात आलेल्या तांत्रिक



सल्लागार समितीचे अध्यक्षपद, पर्यावरणीय लॅंडस्केप तज्ज्ञ व लॅंडस्केप आर्किटेक्ट, डॉ. प्राजक्ता बस्ते, यांच्याकडे देण्यात आले आहे. समितीमध्ये सांस्कृतिक वारसा अभ्यासक, दिनेश वैद्य, स्पर्शनीय व अमूर्त वारसा क्षेत्रातील तज्ज्ञ व संवर्धन वास्तुविशारद, समृद्ध मोगल, तसेच कलाकार प्रफुल सावंत यांचा समावेश आहे. विविध क्षेत्रातील तज्ज्ञांचा सहभाग असल्यामुळे शहर सुशोभीकरणाच्या कामांमध्ये पर्यावरण, वारसा संवर्धन, कार्यक्षम शहरी रचना व सौंदर्यदृष्टी, यांचा समतोल राखला जाणार आहे.

## कुंभमेळ्यात भाविकांना अनोखा अनुभव येणार

समिती, कुंभमेळा प्राधिकरण व त्यांच्यावतीने नेमण्यात आलेल्या, सल्लागार संस्थांना संकल्पना मांडणी, आराखडा तयार करणे, नियोजन, निविदा प्रक्रिया व अंमलबजावणी या सर्व टप्प्यांवर तांत्रिक मार्गदर्शन व परीक्षण करणार आहे. समितीच्या कार्यकक्षेत गोदावरी नदीकाठावरील घाटांचे सुशोभीकरण व मजबुतीकरण, प्रमुख प्रवेश मार्ग व रस्त्यांचे सौंदर्यीकरण, महत्त्वाच्या चौकांचे शहरी लॅंडमार्क म्हणून विकास, उड्डाणपूल व पुलांचे सौंदर्यात्मक सुधारणा यांचा समावेश आहे. सोबतच दिशादर्शक फलक व बहुभाषिक सूचना प्रणाली, घाट, सार्वजनिक जागा व वारसास्थळांचे प्रकाशयोजन, साधुग्राम परिसराचे सौंदर्यीकरण, 'पेंट माय सिटी' सारख्या उपक्रमांतर्गत, भित्तीचित्रे, दर्शनी भागांचे रंगकाम व सार्वजनिक कला प्रकल्प, शहरातील उद्याने, हरित पट्ट्यांचे व विश्रांतीस्थळांचे नियोजन, तसेच कुंभमेळा मुख्य परिसरासह ५० किलोमीटर परिसरातील महत्त्वाच्या वारसास्थळांचे संवर्धन याबाबत समिती मार्गदर्शन करणार आहे. नाशिकच्या कुंभमेळ्याशी निगडित विधी, परंपरा, लोककला, संगीत व मौखिक परंपरांचे दस्तऐवजीकरण व सादरीकरण यावरही भर दिला जाणार आहे. कुंभमेळा प्राधिकरण आयुक्त आयुक्त शेखर सिंह यांनी सांगितले, "सिंहस्थ कुंभमेळा हा एक जागतीक स्तरावरील धार्मिक सोहळा आहे, यामुळेच सांस्कृतिक, ऐतिहासिक व जागतिक दर्जाची नाशिक व त्र्यंबक शहर घडविण्याची संधी आहे. तांत्रिक सल्लागार समितीच्या माध्यमातून शहर सुशोभीकरणाची कामे स्थानिक संदर्भ, पर्यावरणीय शाश्वत आणि दीर्घकालीन उपयोग लक्षात घेऊन राबविली जातील, जेणेकरून भाविक व नागरिकांना सुरक्षित, सुसज्ज आणि संस्मरणीय अनुभव मिळेल."

# कुंभमेळ्यापूर्वी सिन्नर थर्मलची दोन युनिट सुरू होणार

▶ सिन्नर (वा.) कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर राज्यातील वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी सिन्नर थर्मल पॉवर प्रकल्पातील २७० मेगावॅट क्षमतेची दोन युनिट कुंभमेळ्यापूर्वी सुरू करण्याचे उद्दिष्ट महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी (महाजनको) ने ठेवले आहे. त्या दृष्टीने महत्त्वाचा टप्पा पार करत सिन्नर थर्मल पॉवर लिमिटेडच्या अधिग्रहणासाठी महाजनको आणि एनटीपीसी लिमिटेड यांच्यात नवी दिल्ली येथे भागधारक करारावर अधिकृत स्वाक्षरी केली.

राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरणाने (एनसीएलटी) मंजूर केलेल्या ठराव योजनेनुसार २२ फेब्रुवारी २०२६ पर्यंत ३८०० कोटी रुपये महाजनको व एनटीपीसीकडून एनसीएलटीत भरण्यात येणार आहेत. त्यानंतर सिन्नर थर्मल पॉवर प्रकल्पाचे औपचारिक हस्तांतरण या दोन्ही सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यांकडे होणार आहे. ही अधिग्रहण प्रक्रिया कार्पोरेट दिवाळखोरी निवारण प्रक्रिया (आयबीसी) २०१६ अंतर्गत राबविण्यात येत आहे.

## रोजगार व ऊर्जा सुरक्षेला बळ

सिन्नर थर्मल प्रकल्प पुनरुज्जीवित झाल्यानंतर सिन्नर व परिसरात स्थानिक रोजगारनिर्मितीला चालना मिळणार असून, पायाभूत सुविधा विकासास गती येणार आहे. तसेच महाराष्ट्राच्या वाढत्या औद्योगिक व घरगुती वीज गरजांची पूर्तता करण्यासाठी हा प्रकल्प महत्त्वाची भूमिका बजावणार आहे.

पहिल्या टप्प्यात दोन युनिट कार्यान्वित करण्यासाठी वीज निर्मितीस आवश्यक असलेल्या कोळशाच्या उपलब्धतेसाठी महाजनकोचे अधिकारी ऑल इंडिया स्तरावरील कोळसा पुरवठादार कंपन्यांशी चर्चा करत असल्याची माहिती महाजनकोचे मुख्य अभियंता अतुल सोनजे यांनी दिली. करारावर राधाकृष्णन बी., अभय हरणे, अतुल सोनजे, तर एनटीपीसीकडून अध्यक्ष गुरदीप सिंग, जयकुमार श्रीनिवासन आदींनी स्वाक्षरी केली.

# मुदतीत प्रक्रिया न केल्यास अनुदान बंद!

## हयातीचा दाखला ३० जानेवारीपर्यंत देणे अनिवार्य

▶ एरंडोल (वा.) तालुक्यातील राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्ती वेतन योजना आणि इंदिरा गांधी विधवा वेतन योजनेच्या सर्व पात्र लाभार्थ्यांनी २० ते ३० जानेवारी या कालावधीत आपला 'हयातीचा दाखला' सादर करणे बंधनकारक आहे. विहित मुदतीत ही प्रक्रिया पूर्ण न करणाऱ्या लाभार्थ्यांचे अनुदान बंद करण्यात येईल, असा इशारा तहसीलदार गोपाळ पाटील व नायब तहसीलदार अमोल बन यांनी दिला आहे. शासनाने लाभार्थ्यांची गैरसोय टाळण्यासाठी 'बेनेफिशरी सत्यापन' हे नवीन मोबाईल ॲप्लिकेशन विकसित केले आहे. या ॲपमुळे लाभार्थ्यांना आता घरबसल्या किंवा जवळच्या सेतू केंद्रावर किंवा तहसील कार्यालय संजय गांधी निराधार योजना शाखा एरंडोल येथे जाऊन अत्यंत सुलभरीत्या आपली हयातीची नोंद करता येणार आहे. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या निर्णयानुसार, दरवर्षी ही पडताळणी करणे कायदेशीररीत्या आवश्यक आहे. लाभार्थ्यांनी हयातीचे सत्यापन करण्यासाठी अद्ययावत आधार कार्ड व आधार कार्डशी लिंक असलेला मोबाईल क्रमांक आवश्यक आहे. तहसील प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, तालुक्यातील सर्व सेतू चालक आणि सीएससी सेंटर्सनी लाभार्थ्यांना या ॲपद्वारे पडताळणी करून देण्यास सहकार्य करावे.




### लाभार्थ्यांकडून कोणतेही शुल्क नाही

विशेष म्हणजे या कामासाठी लाभार्थ्यांकडून कोणतेही शुल्क आकारू नये, अशा सूचना प्रशासनाकडून देण्यात आल्या आहेत. शासकीय नियमानुसार दरवर्षी हयातीचा दाखला देणे आवश्यक आहे. लाभार्थ्यांनी शेवटच्या तारखेची वाट न पाहता त्वरित आपली नोंदणी पूर्ण करावी, जेणेकरून त्यांचे निवृत्ती वेतन विनाव्यत्यय सुरू राहील, असे आवाहन प्रशासन, तहसील कार्यालय एरंडोल यांनी केले आहे.

**दै.देशदुत** **दि.२२ जानेवारी,२०२६**

शिल्पकार विकासाचा...
देशदूत
जळगाव आवृत्ती
epaper.deshdoot.com
22 Jan 2026 - Page 3

# पाडळसे मोर नदी पात्रात चार डंपर, एक पोकलँड महसूल विभागाकडून जप्त

यावल । प्रतिनिधी



तालुक्यातील पाडळसे शिवारातील मोर नदीपात्रातून सुरू असलेल्या वाळू उपसा रोखणाऱ्या जागरूक तरुणांनी महसूल विभागाला कळवून रात्रीच्या वेळी होणारी वाहतूक थांबविली व चार डंपर आणि एक पोकलँड यावल तहसीलदार व पथकाने ताब्यात घेतले व त्याच्यावर दंडात्मक कारवाईसाठी यावल तहसील कार्यालयात पाठवण्यात आले आहे यासाठी पोलीस पाटील सुरेश खैरनार यांची महत्त्वाची भूमिका ठरली.

अकलूद ते फैजपूर कारखाना महामार्गाच्या कामासाठी गेल्या महिनाभरापासून मोर नदी पात्रातून वाळूचा उपसा सुरू होता २० तारखेला रात्री दहा वाजेच्या सुमारास पाडळसे येथील तरुणांनी अवैध उपसा करणारे चार डंपर व एक पोकलँड पोलीस पाटील यांच्या स्वाधीन केले आणि पोलीस पाटलांनी तातडीने यावल तहसीलदार यांच्याशी संपर्क साधला व घटनास्थळी सर्कल तलाठी यांचा फौज फाटा या ठिकाणी दाखल झाला व सदरची वाहने महसूल खात्याने ताब्यात घेऊन रात्री उशिरापर्यंत यावल तहसील कार्यालयामध्ये पाठविले या ठिकाणी ग्रामस्थ व अधिकाऱ्यांमध्ये बोला बोली सुद्धा झाली त्यात वातावरण तापले.

सदर कारवाई मध्ये चार डंपर व एक जेसीबी जप्त करण्यात आला असून त्यात डंपर नंबर एम एच १० cy ४१०७ एम एच १९ cy ४१ ०८ एम एच १९ cy ४१ ०५ एम एच १९ cy ३१ ८७ नंबरचे डंपर व विना नंबरची पोकलँड जप्त केले. याकामी तहसीलदार मोहनमाला नाझीरकर निवासी नायब तहसीलदार बी एम पवार सर्कल सचिन जगताप रशीद तडवी दीपक गवई मीना तडवी आणि दहा ते बारा तलाठी व कोतवाल स्टाफनेही कारवाई दि.२० जानेवारी मंगळवार रात्री दहा ते तीन वाजेपर्यंतच्या दरम्यान केली.

यावेळी फैजपूर पोलीस स्टेशनचे पीएसआय सय्यद यांना बोलवून घेण्यात आले होते, या मोठ्या कारवाईमुळे यावल तालुक्यात एकच खळबळ उडाली आहे.

कारवाई संदर्भात तहसीलदार मोहनमाला नाझीरकर यांनी प्रांत अधिकारी फैजपूर विभाग फैजपूर यांच्याकडे सदर वाहनांवर दंडात्मक कारवाईसाठी अवगत केले आहे.

दै.दिव्य मराठी

दि.२२ जानेवारी,२०२६

**आर्थिक परिषद** • ग्लोबल प्रा.लिमिटेड, जनरल पॉलिफिल्मचा समावेश

# दावोस : नाशिक विभागासाठी 30 हजार कोटी रुपयांचे करार

**प्रतिनिधी** | नाशिक/मुंबई

स्वित्झर्लंडच्या दावोस येथे सुरू असलेल्या वर्ल्ड इकोनॉमिक फोरममध्ये दुसऱ्या दिवशी नाशिक



विभागात ३० हजार १०० कोटींच्या गुंतवणुकीचे ७ सामंजस्य करार झाले. यात, ग्लोबल प्रा. लिमिटेड, जनरल पॉलिफिल्मसह संरक्षण उद्योगातील प्रकल्पाचा समावेश आहे. संपूर्ण राज्यासाठी आत्तापर्यंत ३७ लाख २७ हजार ७८७ लाख कोटी रूपयांचे ८१ सामंजस्य करार झाले. यातून ४२ लाख रोजगार निर्माण होणार असल्याची माहिती उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दिली.

गेल्या ५ वर्षांत २२ लाख कोटींचे करार झाले होते. अदानी समूहाने ६६ अब्ज डॉलर्स म्हणजेच सुमारे ६,०५,०२२ कोटींच्या गुंतवणुकीचा 'मास्टर प्लॅन' सादर केला. उर्वरित .स्पोर्ट्स

## अदानी समूह राज्यात ७ वर्षांत ६ लाख कोटी गुंतवणार

| विभाग | करार | गुंतवणूक रक्कम |
|---|---|---|
| • नाशिक | ७ | ३० हजार १०० कोटी |
| • मुंबई महानगर प्रदेश | ३७ | २३,९३,३०० लाख कोटी |
| • इतर विभाग | ७ | ७२,७२० लाख कोटी |
| • कोकण | ११ | ३,१०,८८६ लाख कोटी |
| • नागपूर | ०९ | १,९५,९५० लाख कोटी |
| • छत्रपती संभाजीनगर | ०२ | १७,७०० कोटी |
| • पुणे | ०४ | ३,२५० कोटी |
| • अमरावती | ०१ | १,००० कोटी |

**जामनेरमध्ये कोका-कोलाचा प्रकल्प येणार** : जामनेर एमआयडीसीत (जळगाव) 'कोका-कोला' कंपनी प्रकल्प उभारणार आहे. फडणवीसांनी कोका-कोलाचे वरिष्ठ उपाध्यक्ष मायकल गोल्टझमन यांची भेट घेऊन यावर शिक्कामोर्तब केले. याविषयी महाजन म्हणाले की, या प्रकल्पामुळे तालुक्याच्या विकासाला मोठी गती मिळेल.

**एक्सपर्ट**

**वरूण तलवार, माजी अध्यक्ष, आयमा**

### करारानंतर पाच वर्षात उत्पादन होते सुरु

परकीय गुंतवणूक आम्ही या सामंजस्य करारातुन केली आहे. डेटा सेंटर, ऑटोमोटिव्ह, टेक्नॉलॉजी ट्रान्सपोर्ट, डिफेन्स, शिक्षण आदी क्षेत्रातील हे करार आहेत. करारानंतर कमीत कमी ४ ते ५ वर्षात प्रकल्पातून उत्पादन सुरु होते. पण त्याकरीताची गुंतवणूक राज्यात आणणे महत्वाचे आहे.

### काँग्रेसकडून श्वेतपत्रिकेची मागणी

मुंबई काँग्रेसच्या अध्यक्ष, खा. वर्षा गायकवाड म्हणाल्या की, दावोस दौरा जनतेच्या पैशांची उधळपट्टी आहे. सरकारने श्वेतपत्रिका काढावी.

### सुलभतेने दावोसमध्ये करार : फडणवीस

जागतिक गुंतवणूकदार आणि भारतीय कंपन्यांचे विदेशी संचालक एकाच व्यासपीठावर सहज उपलब्ध होत असल्याने दावोसमध्ये करार होतात.

**अभियान** • इयत्ता दहावी व बारावीच्या परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी लोहोणेर विद्यालयामध्ये उपक्रम

# ११०० विद्यार्थ्यांचा कॉपीमुक्तीचा संकल्प

**प्रतिनिधी** | सटाणा

मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या लोहोणेर येथील जनता विद्यालयात कॉपीमुक्त परीक्षा अभियानांतर्गत इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी कॉपीमुक्त परीक्षेला सामोरे जाण्याचा संकल्प केला. इयत्ता दहावी व बारावीच्या परीक्षांच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या या अभियानांतर्गत कॉपीमुक्त परीक्षा देण्याचा संकल्प करण्यात आला.

विद्यार्थ्यांनी कोणत्याही प्रकारच्या गैरमार्गाचा अवलंब न करता प्रामाणिकपणे, आत्मविश्वासाने व तणावमुक्त वातावरणात परीक्षा द्यावी, या उद्देशाने कॉपीमुक्त परीक्षेची शपथ देण्यात आली. यावेळी मुख्याध्यापिका कल्पना शिंदे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, स्वतःच्या कष्टावर विश्वास ठेवून दिलेली परीक्षा हीच विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी भक्कम पायाभरणी करते. या कार्यक्रमास उपमुख्याध्यापक निंबा ठाकरे, पर्यवेक्षक विलास निकम, तसेच सर्व



लोहोणेर विद्यालयात कॉपीमुक्त अभियानांतर्गत प्रतिज्ञा घेताना दहावी, बारावीचे विद्यार्थी.

शिक्षक, शिक्षकेतर सेवक वृंद आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विद्यालयाच्या सांस्कृतिक समितीचे प्रमुख सुनील एखंडे यांनी विद्यार्थ्यांना कॉपीमुक्त परीक्षेची शपथ दिली. इयत्ता दहावी व बारावीच्या परीक्षांमध्ये कॉपीला आळा बसावा तसेच परीक्षेचे वातावरण अधिक शिस्तबद्ध व पारदर्शक राहावे, या उद्देशाने दि. १९ जानेवारी ते २६ जानेवारी दरम्यान कॉपीमुक्त परीक्षा अभियान सप्ताह राबविण्यात येणार आहे. या अभियानामुळे विद्यार्थ्यांच्या मनातील परीक्षेची भीती कमी होऊन ते अभ्यासाची योग्य तयारी करून आत्मविश्वासाने परीक्षेला सामोरे जातील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

### विद्यार्थ्यांनी अभ्यासावर भर द्यावा

शाळेत कॉपीमुक्त परीक्षेबाबत मुख्याध्यापक व शिक्षकांनी मार्गदर्शन केले. अभ्यासात सातत्य ठेवून कॉपी न करता परीक्षेत मिळवलेले गुण हे खूप महत्त्वाचे असतात. विद्यार्थ्यांनी अभ्यासावर भर देवून परीक्षेला सामोरे जावे, यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला.

## ढकांबे ग्रामसभेत शेतकऱ्यांची अधिकाऱ्यांसमोर हरकतींची नोंद

# रिंग रोडसाठी सुपीक जमीन देण्यास विरोध

**प्रतिनिधी** | दिंडोरी

नाशिक महानगर रिंग रोड प्रकल्पासाठी प्रस्तावित भूसंपादनाच्या पार्श्वभूमीवर दिंडोरी तालुक्यातील ढकांबे ग्रामपंचायतीत भूसंपादन विभागाच्या वतीने अधिकृत ग्रामसभा घेण्यात आली. या सभेत बाधित शेतकऱ्यांनी एकत्र येत रिंग रोडसाठी बागायती जमीन देण्यास नकार देत जोरदार विरोध नोंदवला.

ग्रामसभेला भूसंपादन विभागाचे अभियंता एस. के. गायकवाड व अधिकारी उपस्थित होते. शेतकऱ्यांनी सांगितले की, प्रस्तावित भूसंपादन क्षेत्रातील जमीन पूर्णतः सिंचनयुक्त, सुपीक आहे. या भागात द्राक्ष, डाळिंब, पेरूंच्या फळबागा असून शेकडो कुटुंबांचा उदरनिर्वाह या शेतीवर अवलंबून आहे. रिंग रोडसाठी ही जमीन घेतल्यास शेतकरी कुटुंबांचे जीवनमान धोक्यात येईल, अशी भावना व्यक्त केली. विकासाच्या नावाखाली शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये, तसेच पर्यायी मार्गाचा विचार करावा, अशी मागणी ग्रामस्थांनी केली.

### पर्यायी मार्गाचा विचार करा

नाशिक महानगर रिंग रोडचा मार्ग वरवंडी ते पेठ रोड (जुनी अलाइनमेंट) दरम्यान उपलब्ध ओसाड व पडीत जमिनीतून निश्चित करावा, अशी एकमुखी मागणी करण्यात आली. शासन व प्रशासनाने या हरकतींची दखल न घेतल्यास न्यायालयीन, प्रशासकीय, लोकशाही व घटनात्मक मार्गाने लढा अधिक तीव्र केला जाईल, असा इशारा शेतकऱ्यांनी दिला.

**आव्हान** • जमीनधारकांचा वाढला रोष; आराखडा पक्षपाती, स्थानिकांचा आरोप

# रिंगरोड नेत्यांसह बिल्डरांच्या सोयीचा, सात ग्रामपंचायतींचा विरोधात ठराव

**प्रतिनिधी** | नाशिक

सिंहस्थाच्या निमित्ताने उभारण्यात येणाऱ्या रिंगरोडची नवीन मार्गिका (अलाइन्मेंट) हा शासकीय अधिकारी, राजकारण्यांसह बांधकाम व्यावसायिक, बड्या गुंतवणुकदारांच्या हिताचा आहे. यात अनेक जमीनधारकांची जमीन, घरे जात असतानाही शासनाकडून त्याचा विचार केला जात नसल्याने व मोबदल्याबाबत स्पष्टता नसल्याने या रिंगरोडला तीव्र विरोध होऊ लागला आहे. आतापर्यंत १० पैकी ७ ग्रामपंचायतींनी त्यास विरोध करताना जुनाच आराखडा कायम ठेवण्याची भूमिका घेतल्याने प्रशासनासमोर आव्हान उभे ठाकले आहे.

शहरालगत ६५ किमीचा रिंगरोड उभारण्यात येत आहे. त्याला ७,७०० कोटी रुपयांची केंद्र आणि राज्य शासनाने मंजुरीही दिली आहे. 'एमएसआरडीसी' द्वारे हे काम होणार असून त्याची मार्गिका (अलाइन्मेंट) अंतिम करण्यात आली आहे. परंतु, ही मार्गिका अंतिम करताना पक्षपातीपणा करण्यात आल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे. दरी आणि मातोरी या दोन्ही गावांतील ग्रामस्थांनी जुनी अलाइन्मेंट ही पडित जागेतून कमी नुकसान करत होती. परंतु, बड्या व्यावसायिक आणि संबंधित शासकीय विभागाच्या अधिकाऱ्यांच्या जमिनींना लागून ही अलाइन्मेंट घेण्याच्या नादात जमीनधारकांचे मोठे नुकसान केले जात असल्याचा आरोप केला आहे.

## मोबदल्याची स्पष्टता नसल्याची बेळगाव ढग्यातील तक्रार



रिंगरोडसंदर्भात विरोध दर्शवण्यासाठी बेळगाव ढगा येथे जमलेले जमीनमालक.

### यासाठी होत आहे विरोध

- मोबदल्याबाबत स्पष्टता नाही
- रोड कसा होणार, हे अद्याप अस्पष्ट
- उंची किती असेल, शेतातून रस्ता जाणार की जमिनीलगत किंवा समृद्धीप्रमाणे याबाबत माहिती नाही
- एकाच शेतकऱ्याला पलिकडच्या त्याच्या क्षेत्रात क्रॉसिंगसाठी पर्याय काय देणार, हेही स्पष्ट केलेले नाही
- ६० मीटरचा रस्ता असेल तर एन.ए.ची परवानगी किती अंतरावर मिळतील?
- शेतकरी भूमिहीन होत आहे. मिळणारा मोबदला कमी होत असल्याने तेवढ्याच पैशात गावात, शेजारील गावांत जमीन मिळत नसल्याने जमीनमालकांचा विरोध

**या गावांनी दर्शवला विरोध** : **चांदशी, मुंगसारे, मातोरी, सारुळ, जलालपूर, बेळगाव ढगा आणि गोवर्धन गाव.**

**दिव्य मराठी पडताळणी**

### शाळा रस्त्यावर येत असल्याने 'मातोरी'चा विरोध

- मातोरीची स्मशानभूमी बाधित होत आहे. दुसरी शासकीय जागा नाही. कुणीही स्वत:ची खासगी जागा स्मशानभूमीसाठी देणार नाही
- नव्या आराखड्यानुसार, शाळा रस्त्यावर. विद्यार्थ्यांना त्याचा त्रास होईल.
- १ ते २ एकर शेतजमीन असलेले अनेक शेतकरी भूमिहिन होत असल्याचा धोका
- गावाला पाणी देणारी बोअरवेलही बाधित
- मुंगसरे-जलालपूर शीव आणि मातोरी-मखमलाबाद शीव या ३ किमीच अंतरात १७ घरे बाधित; जुन्या आराखड्यात एकच घर बाधित होत होते. पडित-खडकाळ जमिनीतून रिंगरोड जाणार होता

**गोवर्धनमध्येही रस्त्याला विरोध**

गोवर्धन गाव हे अनुसूचित क्षेत्रात येते. त्यांच्या गावाच्या संदर्भातील विकासकामांबाबत संपूर्ण अधिकार ग्रामपंचायत, ग्रामसभेला आहे. त्यांनी या नव्या आराखड्याला विरोध केला आहे. कारण २३ हून अधिक जमीनधारकांचे शेत व घरांनाही अडचण येत असल्याने विरोध वाढला आहे.

### मोबदला व अन्य गोष्टींबाबत स्पष्टता गरजेची



*हा रिंगरोड करताना ३ सर्व्हे केले. त्यातून कमी नुकसान होणारा आराखडा निवडण्याऐवजी अधिकारी आणि राजकीय नेते, व्यावसायिकांना फायदा मिळेल असा आराखडा निवडला. मोबदला व अन्य स्पष्टता गरजेची आहे.* – **दत्तू ढगे**, *माजी सरपंच, बेळगाव ढगा*

### कुणीही भूमिहिन होणार नाही, यासाठी प्रयत्न



*रिंगरोड हे नाशिकच्या विकासाचे महत्वाचे साधन आहे. यात सर्वांना विश्वासात घेऊनच रस्ते उभारणी केली जाणार आहे. कुणीही भूमिहिन होणार नाही आणि जमीनमालकांना अधिकाधिक मोबदला देण्याचा प्रयत्न असेल.* – **आयुष प्रसाद**, *जिल्हाधिकारी*

**डी. बी. स्टार पडताळणी** प्रशासन सुस्त; प्रवाशांच्या बॅग वा साहित्य तपासले जात नसल्याने सुरक्षेचा प्रश्न गंभीर

# रेल्वेस्थानकात प्रवासी सामान तपासणी यंत्रणा बंद

## कोट्यवधी रुपये खर्च करून महिनाभरापासून रेल्वे पोलिसांसह यंत्रणेचे दुर्लक्ष, मशीन कार्यान्वितची मागणी

प्रतिनिधी | नाशिक

नाशिकरोड रेल्वे स्थानकावरील सामान तपासणीसाठी बसवण्यात आलेले मशीन गेल्या महिनाभरापासून बंद अवस्थेत धूळखात पडून आहे. स्थानकावर येणाऱ्या-जाणाऱ्या प्रवाशांच्या सामानाची कुठलीही तपासणी होत नसल्याने सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. रेल्वे प्रशासनाच्या या दुर्लक्षामुळे भविष्यात मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता वर्तवली जात असून, प्रवाशांमध्ये संताप व्यक्त होत आहे. नाशिकरोड रेल्वेस्थानक हे प्रवाशांच्या वाहतुकीसाठी अत्यंत महत्त्वाचे आणि संवेदनशील मानले जाते. येथून रोज हजारो प्रवासी ये-जा करतात. गर्दीचा फायदा घेऊन कोणत्याही विघातक वस्तू किंवा प्रतिबंधित पदार्थ स्थानकात नेले जाऊ नयेत, यासाठी रेल्वे प्रशासनाने कोट्यवधी रुपये खर्च करून स्कॅनर मशीन बसवले होते. प्रवाशांचे सामान तपासल्यानंतरच त्यांना प्लॅटफॉर्मवर प्रवेश दिला जात असे. मात्र, सध्या तांत्रिक बिघाडामुळे हे मशीन बंद असल्याने प्रवासी थेट ये-जा करत आहेत.

### सुरक्षिततेत त्रुटी राहिल्यास घातपाताची शक्यता तरी प्रशासनाकडून कानाडोळा

स्थानकावरील ही सुरक्षा त्रुटी देशविरोधी शक्तींसाठी किंवा समाजकंटकांसाठी संधी ठरू शकते. एखादी मोठी दुर्घटना घडल्यानंतरच प्रशासनाला जाग येईल का? असा सवाल आता उपस्थित केला जात आहे. सुरक्षेसाठी अत्यंत आवश्यक असलेले हे मशीन केवळ तांत्रिक कारण पुढे करून बंद ठेवणे प्रवाशांच्या जीवाशी खेळण्यासारखे आहे.

### आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याचे आव्हान

येत्या दीड वर्षात नाशिक व त्र्यंबकेश्वर येथे सिंहस्थ कुंभमेळा संपन्न होत आहे. या काळात देशभरातून कोट्यवधी भाविक रेल्वेने नाशिकला येतील. कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिकरोड रेल्वे स्थानकावर अभूतपूर्व गर्दी असेल. अशा वेळी सध्याचे स्कॅनर मशीन तातडीने दुरुस्त करणे तर गरजेचे आहेच, शिवाय वाढती गर्दी लक्षात घेता या मशिन्सची संख्याही वाढवणे अनिवार्य आहे.

### मशीन तातडीने कार्यान्वित करा

रेल्वे प्रशासनाने या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून बंद पडलेले स्कॅनर मशीन तातडीने कार्यान्वित करावे आणि प्रवाशांच्या सुरक्षिततेची खात्री करावी, अशी मागणी प्रवाशांकडून केली जात आहे.



नाशिकरोड रेल्वे स्थानकावर बंद पडून असलेले सामान तपासणी यंत्र.

### थेट सवाल

नवीन प्रतापसिंग, इन्स्पेक्टर, रेल्वेस्थानक नाशिकरोड



**Q : रेल्वे स्थानकातील स्कॅनर मशीन बंद आहे?**
- मशीन जुनी व खराब झाल्याने नवीन मशीन खरेदी केले जाणार आहे.

### नवीन मशीन बसवले जाणार, प्रक्रियेला सुरुवात

**Q : स्कॅनर मशीन बंद असल्याने सुरक्षेला धोका आहे त्याचे काय ?**
-हो, लवकरच नवीन मशीन बसवले जाईल. त्यासाठी प्रक्रिया सुरु आहे. मानवी पद्धतीने अर्थात रेल्वे फोर्समधील जवान प्रवाशांची काटेकोर तपासणी करत आहे.

### प्रशासनाने प्रवाशांच्या सुरक्षिततेला द्यावे प्राधान्य



▪ नाशिकरोड रेल्वेस्थानक हे प्रवाशांच्या वाहतुकीसाठी अत्यंत महत्त्वाचे स्थान असल्याने प्रशासनाने प्रवाशांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य द्यावे, बंद पडलेली सामान तपासणी यंत्रणा तातडीने दुरुस्त करावी.
**- राजीव निगळे, प्रवासी**

### सुरक्षेसाठी स्कॅनर मशीन यंत्रणा तत्काळ सुरू करा



▪ रेल्वेस्थानकातील स्कॅनर मशीन अनेक दिवसांपासून बंद पडून आहे. सुरक्षेच्या दृष्टीकोनातून हा मोठा धोका आहे. वर्दळीच्या स्थानकावर सामान तपासणी यंत्र तातडीने सुरू करायला हवे.
**- प्रशांत निकाळे, प्रवासी**

दै.आपलं महानगर

दि.२२ जानेवारी,२०२६

आपल्या बातम्या, आतल्या बातम्या...
आपलं महानगर | My महानगर.com
www.mymahanagar.com

# प्लास्टिक ड्रमच्या आडून मद्याची तस्करी

## महामार्गावर २० लाखांचा मद्यसाठा जप्त, राजस्थानमधील एकाला अटक

**नाशिक** । ट्रकमधील प्लास्टिकच्या ड्रम आडून मुंबई - आग्रा महामार्गावरून अवैध मद्याची तस्करी करणाऱ्या राजस्थानमधील एका तस्कराच्या नाशिक ग्रामीण पोलिसांनी मुसक्या आवळल्या आहेत. पोलिसांनी महामार्गावर कोकणगाव फाटा उड्डाणपुलाजवळ ट्रकचालकास ताब्यात घेतले. त्याच्या ताब्यातून मद्यसाठा, ट्रक (एमएच ०४ - एफडी ६६५५) व मोबाईल असा एकूण २६ लाख ६६ हजार २४० रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.



ललित हरीराम सोनी (वय ४०, रा. राहीवाली वास, सिवाना, जि. बाडमेर, राजस्थान) असे अटक केलेल्या संशयिताचे नाव आहे.

पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांनी जिल्ह्यातील राज्य व राष्ट्रीय महामार्गावरून होणारी अवैध मद्याची तस्करी रोखण्याचे आदेश पोलिसांना दिले आहेत. त्यानुसार पोलीस ठाणे व स्थानिक गुन्हे शाखेकडून छापासत्र सुरू आहे. गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक रवींद्र मगर यांना मुंबई- आग्रा महामार्गावरून नाशिक ते धुळे एका ट्रकमधून अवैध मद्याची तस्करी होत असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार गुन्हे शाखेने सापळा रचला. पथकाने पिंपळगाव पोलीस ठाणे हद्दीतील कोकणगाव फाटा उड्डाणपुलाजवळ संशयित ट्रकची तपासणी केली असता ट्रकमध्ये अवैध मद्यसाठा आढळून आला. ट्रकमागील बाजूस प्लास्टिकच्या रिकाम्या ड्रमच्या आडोशाला अवैध मद्यसाठा ठेवल्याचा आढळून आला. याप्रकरणी पिंपळगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दै.हमारा महानगर

दि.२२ जानेवारी,२०२६

हमारा महानगर

epaper.hamaramahanagar.net
22 Jan 2026 - Page 5

# नई रिंग रोड पर आज से आपत्तियों को दर्ज कराने की शुरुआत होगी

महानगर नेटवर्क

नाशिक

60 मीटर चौड़ी रिंग रोड बनाई जा रही है। इसके लिए देवलीगांव समेत 10 गांवों में प्रोजेक्ट से प्रभावित लोगों को नोटिस दिए जाएंगे और फाइनल मैप आज, 22 जनवरी को तैयार हो जाएगा, आपत्तियां दर्ज करवाने के लिए 60 दिन का समय है। इस बीच, इस बारे में हुई मीटिंग में जमीन मालिकों ने आरोप लगाया कि इस रिंग रोड के लिए बिल्डरों के प्लॉट बचाते हुए जमीन मालिकों के प्लॉट और मकानों को टारगेट किया गया। इसलिए जमीन मालिकों के साथ अन्याय नहीं होने दिया जाएगा। विधायक सरोज अहिरे ने कहा, भले ही यह रूलिंग पार्टी का हो, लेकिन



एडमिनिस्ट्रेशन को पहले मुझसे निपटना होगा। नाशिक में होने वाले सिंहस्थ कुंभ मेले के लिए, रिंग रोड देवलीगांव विधानसभा क्षेत्र में सबसे ज्यादा जमीन और मकानों को प्रभावित कर रहा है। विधायक अहिरे ने इस बारे में नागरिकों की समस्याएं सुनने के लिए विहितगांव में एक जॉइंट मीटिंग रखी थी इसमें अहिरे ने कहा कि रिंग रोड में आने वाले पब्लिक कुओं पर विचार किया जान चाहिए। मीटिंग में डिप्टी कलेक्टर अभिजीत नाइक, प्रांत अर्पिता थुबे के साथ-साथ निवृत्ति अरिंगले, विक्रम कोथुले, गणेश खारजुल, प्रकाश कोर्डे, संजय हंडोरे आदि मौजूद थे इस मौके पर जानकारी देते हुए एडमिनिस्ट्रेटिव अधिकारियों ने बताया कि 60 मीटर की रोड में 12 मीटर जगह छोड़ी जाएगी। ग्राउंड वॉटर को रोड में जाने से रोकने के लिए इसे ऊंच किया जाएगा। जिन गांवों के पास से रिंग रोड गुजरेगी, दोनों तरफ सर्विस रोड दी जाएंगी। इससे भारी ट्रैफिक और गांव क ट्रैफिक अलग हो जाएगा।

हमारा महानगर

epaper.hamaramahanagar.net
22 Jan 2026 - Page 5

# 28 जनवरी 2026 तक संभागीय आयुक्त कार्यालय द्वारा पुस्तक प्रदर्शनी का आयोजन

महानगर नेटवर्क

**नाशिक**

नाशिक में मराठी भाषा संरक्षण पखवाड़ा 14 जनवरी से 28 जनवरी 2026 तक मनाया जा रहा है, जिसका उद्देश्य मराठी भाषा को बढ़ावा देना, उसका प्रसार करना, उसके उपयोग को अधिकतम करना और उसे संरक्षित करना है।

इस अवसर पर, संभागीय आयुक्त कार्यालय, नासिक और महाराष्ट्र साहित्य परिषद, नासिक रोड शाखा ने संयुक्त रूप से नासिक रोड क्षेत्र के अंतर्गत आने वाले विद्यालयों में कक्षा 5 से 9 तक के विद्यार्थियों के लिए मराठी भाषा ज्ञान प्रतियोगिता, वर्तनी और सुंदर हस्तलेख प्रतियोगिता का आयोजन किया है। संभागीय आयुक्त कार्यालय के अतिरिक्त आयुक्त, अरविंद लोखंडे ने अधिक से अधिक विद्यालयों के विद्यार्थियों से इन प्रतियोगिताओं में भाग लेने की अपील की है। यह प्रतियोगिता का कार्यक्रम है।

मराठी भाषा ज्ञान प्रतियोगिता का आयोजन 22 जनवरी, 2026 को दोपहर 3 से 4 बजे तक कोठारी गर्ल्स स्कूल, नासिक रोड में किया जाएगा। वर्तनी और सुंदर लिखावट प्रतियोगिता 24 जनवरी, 2026 को सुबह 11 बजे से दोपहर 12.30 बजे तक पुरुषोत्तम इंग्लिश स्कूल और आरंभ कॉलेज, नासिक रोड में आयोजित की जाएगी।

नासिक रोड सीमा के अंतर्गत प्रतियोगिता में भाग लेने वाले स्कूलों को 21 जनवरी, 2026 को शाम 6 बजे तक कोठारी गर्ल्स स्कूल की प्रिंसिपल सुनीता कासर (व्हाट्सएप नंबर 9604032214) के पास कम से कम 10 छात्राओं के नाम दर्ज कराने होंगे।

अतिरिक्त आयुक्त श्री लोखंडे ने यह भी सूचित किया है कि प्रतियोगिता के संबंध में प्रथम, द्वितीय और तृतीय स्थान प्राप्त करने वाले विजेताओं को पुरस्कार दिए जाएंगे और सभी भाग लेने वाली छात्राओं को 26 जनवरी, 2026 को गणतंत्र दिवस कार्यक्रम में संभागीय आयुक्त के हाथों प्रमाण पत्र प्रदान किए जाएंगे।

हमारा महानगर
epaper.hamaramahanagar.net
22 Jan 2026 - Page 3

# सौर ऊर्जा में महाराष्ट्र की ऐतिहासिक छलांग

## एशिया का सबसे बड़ा विकेन्द्रित सौर कार्यक्रम सफल

महानगर संवाददाता

मुंबई

दावोस में मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ने कहा कि महाराष्ट्र ने एशिया का सबसे बड़ा विकेन्द्रित सौर ऊर्जा कार्यक्रम सफलतापूर्वक लागू कर एक ऐतिहासिक उपलब्धि हासिल की है। वर्ष के अंत तक राज्य में सौर ऊर्जा के माध्यम से 16 गीगावॉट बिजली उत्पादन किया जाएगा। वे विश्व आर्थिक मंच की वार्षिक बैठक के अवसर पर इंडिया पैवेलियन में अंतरराष्ट्रीय सौर गठबंधन की तरफ से आयोजित "स्केलिंग सोलर एनर्जी व्हेयर इट मैटर्स" सत्र में बोल रहे थे।

उन्होंने बताया कि महाराष्ट्र ने एक दशक से भी कम समय में अपने ऊर्जा क्षेत्र का पूरी तरह कायाकल्प कर दिया है। राज्य में बिजली उपभोक्ताओं में केवल 10% कृषि पंप उपभोक्ता हैं, लेकिन वे पहले कुल बिजली का 30% उपभोग करते थे। उन्हें बिजली आपूर्ति की वास्तविक लागत 8 रुपए प्रति यूनिट थी, जबकि उनसे केवल 1 रुपए प्रति यूनिट वसूला जाता था। शेष राशि राज्य सरकार या क्रॉस-सब्सिडी के माध्यम से वहन की जाती थी, जिससे औद्योगिक और घरेलू उपभोक्ताओं पर बोझ पड़ता था। प्रधानमंत्री नरेंद्र मोदी के नेतृत्व में महाराष्ट्र ने कृषि क्षेत्र का संपूर्ण बिजली भार सौर ऊर्जा पर स्थानांतरित करने का निर्णय लिया और एशिया की सबसे बड़ी विकेन्द्रित सौर ऊर्जा योजना शुरू की। इसके अंतर्गत प्रत्येक कृषि फीडर को स्वतंत्र रूप से सौर ऊर्जा से जोड़ा गया तथा किसानों को बिजली आपूर्ति के लिए एक अलग कंपनी की स्थापना की गई।



- दावोस में सीएम देवेंद्र फडणवीस का ऐलानः वर्ष के अंत तक 16 गीगावॉट सौर बिजली उत्पादन
- किसानों को दी जानी वाली बिजली लागत 8 रुपए से घट कर 3 रुपए तक होगी

इस प्रणाली के माध्यम से लगभग 16 गीगावॉट बिजली उत्पादन किया जाएगा और यह परियोजना वर्ष के अंत तक पूरी हो जाएगी। वर्तमान में हर महीने 500 मेगावॉट क्षमता जोड़ी जा रही है और शीघ्र ही 1 गीगावॉट मासिक उत्पादन तक पहुंच जाएगा। इससे किसानों को बिजली आपूर्ति की लागत 8 रुपए से घटकर 3 रुपए से भी कम हो गई है, जिससे उद्योग और घरेलू उपभोक्ताओं पर पड़ने वाला बोझ कम हुआ है। मुख्यमंत्री ने कहा कि अगले 5 वर्षों में राज्य की बिजली खरीद लागत में 10 अरब डॉलर की बचत होने का अनुमान है। भारत के कुल सौर पंपों का 60% हिस्सा अकेले महाराष्ट्र में है, जिसकी संख्या जल्द ही 10 लाख पार कर जाएगी।

यह सौर कार्यक्रम 300 करोड़ पेड़ लगाने के बराबर कार्बन उत्सर्जन कम करेगा। उन्होंने कहा कि 2030 तक राज्य की कुल ऊर्जा में नवीकरणीय ऊर्जा की हिस्सेदारी 52% तक पहुंचाने का लक्ष्य है।

**दै.लोकमंथन** **दि.२२ जानेवारी,२०२६**

लोकमंथन

# 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' उपक्रमांतर्गत कौशल्य विकास व करियर मार्गदर्शन कार्यशाळा संपन्न

**लोकमंथन । प्रतिनिधी**

**नाशिक ।** जिल्ह्यातील पेठ, सिन्नर, मालेगाव व इगतपुरी तालुक्यांमधे 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' या उपक्रमांतर्गत कौशल्य विकास व करियर मार्गदर्शन या विषयांवर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्याशाळेत चारही तालुक्यांतून एकूण ३१४ विद्यार्थींनींनी सहभाग नोंदविला. अशी माहिती जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र नाशिक चे सहायक आयुक्त वि.रा.रिसे यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये दिली आहे. या कार्यशाळेसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र नाशिक चे मार्गदर्शन अधिकारी सागर मोहिते, मिलिंद देशपांडे, सिद्धार्थ पवार, करियर मार्गदर्शन तज्ज्ञ आसिफ शेख व गोरक्षनाथ सांगळे, एमजेएम आर्ट, कॉमर्स अण्ड सायन्स कॉलेज, करंजाळी चे प्राचार्य श्री. दुधेकर, शेट बी.एन. सारडा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय सिन्नर चे प्राचार्य गोरक्षनाथ बागुल, रेणूकाबाई भाऊसाहेब हिरे कन्या महाविद्यालयाच्या प्राचार्य श्रीमती देसले, महात्मा गांधी माध्यमिक व उच्च माध्यमिक हायस्कूल, इगतपुरी चे प्राचार्य श्री. शिंदे उपस्थित होते. एमजेएम आर्ट, कॉमर्स अण्ड सायन्स कॉलेज, करंजाळी येथे आयोजित मेळाव्यात ५० विद्यार्थीनी, सिन्नर येथील शेट बी.एन. सारडा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात ६२ विद्यार्थीनी, मालेगाव तालुक्यातील रेणूकाबाई भाऊसाहेब हिरे कन्या महाविद्यालयाच्या १६३ विद्यार्थीनी आणि इगतपुरी येथील महात्मा गांधी माध्यमिक व उच्च माध्यमिक हायस्कूल येथील १९ विद्यार्थींनीं कार्यशाळेत उपस्थित होत्या. कार्यशाळेत कौशल्य विकास च्या विविध योजना, पारंपरिक शिक्षणाला कौशल्याची जोड देवून स्वयंरोजगार व उद्योजकता क्षेत्रातील संधी, सध्याच्या स्पर्धात्मक युगात केवळ पदवी शिक्षण न घेता कौशल्य आधारित शिक्षण घेवून स्वावलंबी कसे बनावे इयत्ता दहावी व बारावी नंतर करियरच्या विविध संधी, तंत्रस्नेही कोर्सेस व त्याद्वारे उपलब्ध होणाऱ्या रोजगाराच्या आणि उद्योजकता क्षेत्रातील विविध संधी याबाबत तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. आपले करियर निवडण्याची योग्य दिशी या उपक्रमातून मिळणार असल्याचे मत मान्यवरांनी व्यक्त केले. येवला तालुक्यातील एमजीव्हीएस आर्टस् एड कॉमर्स महाविद्यालयातील ६० विद्यार्थीनी, कळवण तालुक्यातील आरकेएम विद्यालयातील १७३ विद्यार्थीनी, देवळा तालुक्यातील कर्मवीर रामरावजी आहेर आर्टस्, कॉमर्स व सायन्स महाविद्यालयातील १४५ विद्यार्थीनी आणि दिंडोरी तालुक्यातील केआरटी विद्यालयातील १३४ विद्यार्थीनींनी सहभाग नोंदविला. सर्व कार्यशाळांमध्ये कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागाचे अधिकारी तसेच करियर मार्गदर्शक तज्ज्ञांनी सध्याच्या स्पर्धात्मक युगात केवळ पदवी शिक्षण न घेता कौशल्य आधारित शिक्षण घेवून स्वावलंबी होण्यासाठी रोजगाराच्या आणि उद्योजकता क्षेत्रातील विविध संधी बाबत उपस्थित विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले.

Nashik Edition
Jan 22, 2026 Page No. 5
Powered by: erelego.com

जळगाव तरुण भारत

22 Jan 2026 - Page 8

epaper.tarunbharatlive.com

# शेतकऱ्यांनो सावधान! 'ई-पीक पाहणी'साठी उरले फक्त ३ दिवस

## तहसीलदार डॉ. उल्हास देवरे यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**पारोळा, २१ जानेवारी**

रब्बी हंगाम २०२५ ची 'ई-पीक पाहणी' करण्याची अंतिम मुदत आता संपत आली आहे. राज्यात १ डिसेंबर २०२५ पासून रब्बी पीक पाहणीची प्रक्रिया सुरू झाली होती. या प्रक्रियेची अंतिम तारीख २४ जानेवारी २०२६ ही निश्चित करण्यात आली आहे. म्हणजेच शेतकऱ्यांच्या हातात आता केवळ ३ दिवस शिल्लक आहेत.

ज्या शेतकरी बांधवांनी अद्याप आपल्या पिकांची ई-पीक पाहणी केलेली नाही, त्यांनी कोणत्याही तांत्रिक अडचणीची वाट न पाहता आजच ही प्रक्रिया पूर्ण करावी. आपला हक्क सुरक्षित करण्यासाठी ही



शेवटची संधी असल्याचे तहसीलदार डॉ. उल्हास देवरे यांनी प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.

**पीक कर्ज**

बँकेकडून कर्ज घेताना पीक पाहणीचा अहवाल आवश्यक असतो. नैसर्गिक आपत्ती: मदत पिकांचे नुकसान झाल्यास शासकीय मदत मिळवण्यासाठी याची नोंद अनिवार्य आहे. धान्य विक्री : सरकारी खरेदी केंद्रावर धान्य विकण्यासाठी सातबाऱ्यावर पिकाची नोंद असणे आवश्यक आहे.

### पीक पाहणी का महत्त्वाची आहे?

शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी ई-पीक पाहणी हा सर्वात महत्त्वाचा पुरावा मानला जातो. जर शेतकऱ्यांनी वेळेत पीक पाहणी पूर्ण केली नाही, तर त्यांना अडचणींना सामोरे जावे लागू शकते. पीक विम्याचे संरक्षण मिळवण्यासाठी अडचण येऊ शकते.

नवभारत Nashik | 22 January 2026 | Page 2

# 'रामकाल पथ' पर रामायण का एहसास

## पंचवटी का बदलाव! डेढ़ किलोमीटर क्षेत्र में आध्यात्मिक दृष्टिकोण से किया जा रहा विकास

■ **नाशिक, (सं.)** राज्य सरकार और नाशिक मनपा ने मिलकर सीतागुफा से रामतीर्थ तक 1.5 किलोमीटर लंबे रामकाल पथ का काम कर रहे हैं, जिसके लिए कुछ मंदिरों और घरों को दूसरी जगह शिफ्ट करना होगा. हालांकि, इस जगह पर नए मंदिर भी बनाए जाएंगे. इस काम से जुड़े सूत्रों ने बताया कि मनपा ने सौंदर्यीकरण के काम का प्लान तैयार कर लिया है. इस रास्ते पर कई खास जगहें बनाई जाएंगी. यह दुनिया भर से आने वाले भक्तों और टूरिस्ट के लिए आकर्षक होंगी. कुंभ मेले को देखते हुए रामकाल पथ का काम जोरों पर है. चूंकि कुंभ मेले का झंडा अक्टूबर के आखिर तक फहराया जाएगा, इसलिए पंचवटी इलाके में काम युद्धस्तर पर शुरू कर दिया गया है.



### प्रशासन रखे हुए है काम पर पैनी नजर

- प्रशासन इस काम पर कड़ी नजर रखे हुए है, और घाट पर बने सभी मंदिरों के साथ-साथ रामकाल पथ का काम भी चल रहा है. यह काम करते समय, इसके लिए सभी कानूनी प्रक्रियाएं पूरी करने के बाद ही ये काम किए जा रहे हैं.
- इसके तहत, संबंधित दुकानदारों, व्यापारियों के साथ-साथ मंदिर मालिकों, पुजारियों या संबंधित पक्षों से नो-ऑब्जेक्शन सर्टिफिकेट लेकर काम शुरू कर दिया गया है. इन सूत्रों ने बताया कि आने वाले महीनों में ये पूरे हो जाएंगे.

" रामकाल पथ प्रोजेक्ट एक कल्चरल प्रोजेक्ट है, जब यह पूरा हो जाएगा, तो इसका पॉजिटिव असर पड़ेगा. काम के दौरान कुछ मंदिरों को तोड़ना पड़ेगा. हालांकि, हम यह काम उनके मालिकों और पुजारियों से परमिशन लेने के बाद ही कर रहे हैं. हमने दक्षिणमुखी हनुमान मंदिर, सत्यनारायण मंदिर के लिए परमिशन ले ली है. हम पूरे रीति-रिवाज, पूजा, मूर्ति प्रतिष्ठा प्रोग्राम करने के बाद इसे स्थापित करेंगे.



– **मनीषा खत्री**, आयुक्त नाशिक मनपा

### पर्यटन को मिलेगा बढ़ावा

रामकाल पथ एक सुंदर, ऐतिहासिक और सांस्कृतिक रास्ता है जो रामकुंड, कालाराम मंदिर, सीता गुफा और पंचवटी इलाके के दूसरे धार्मिक स्थलों को जोड़ता है. सूत्रों ने बताया कि इससे टूरिज्म को बढ़ावा मिलेगा और रामायण का अनुभव भी मिलेगा, साथ ही उन्होंने यह भी बताया कि इस प्रोजेक्ट के तहत सड़क चौड़ीकरण, घाट डेवलपमेंट, स्ट्रीट लाइट, पेड़ लगाना और पुनर्वास जैसे काम शामिल है. अहिल्यादेवी होलकर ब्रिज से तालकुटेश्वर ब्रिज और रामकुंड से कालाराम मंदिर तक के रास्तों का डेवलपमेंट, गांधी झील और रामकुंड के आस-पास धनुर्धर भगवान श्री राम की एक बड़ी रेप्लिका, घाट, एंट्रेंस, सड़कें, स्ट्रीट लाइट, पेड़ और दीवारों पर पेंटिंग, रिहैबिलिटेशन, प्रभावित परिवारों को घर देना भी इसी का एक हिस्सा है. और सरस्वती प्रशासन ने पहले ही भरोसा दिलाया है कि रामकाल पथ के बनने से किसी पर असर नहीं पड़ेगा. यह भी दावा किया कि प्रभावित लोगों को राहत भी मिली है.

# जिल्हा अहिल्यानगर

लोकमत

# गर्भगिरी परिक्रमा मार्गाची झाली दुरवस्था

लोकमत न्यूज नेटवर्क

**तिसगाव :** अतिवृष्टीने रस्ता वाहून गेला, साईडपट्ट्यांचे भराव खचले. रस्त्यांवर खड्ड्यांचे साम्राज्य निर्माण झाले. पूल वाहून गेले. काही ठिकाणी पुलांचे कठडे निखळले. अशा विविध समस्यांचा गर्भगिरी परिक्रमा मार्गाला विळखा पडला आहे.

श्रीक्षेत्र मढी, मायंबा व वृद्धेश्वर सावरगाव घाट रस्त्याला धोकेदायक ठिकाणी नसलेले संरक्षक कठडे मृत्यूला आमंत्रण देणारी ठरत आहेत. या दोन्ही डांबरी घाट रस्त्यांच्या कडा व डोंगर उतारामुळे वाहून गेलेल्या भरावाने १५ ठिकाणी गर्भगिरी परिक्रमा मार्ग चक्क एकेरी उरला आहे. श्रीक्षेत्र वृद्धेश्वर, मढी महसुलीदृष्ट्या पाथर्डीत, तर मायंबा स्थान आष्टीत येते. वनजमीन, हद्दी खुणा सीमा रेषांच्या तांत्रिक निकषाने दोष-दुरुस्तीसह रुंदीकरण, संरक्षक कठड्यांची कामे लाल फितीत अडकली आहेत. धामणगाव देवीचे, मढी, मायंबा, वृद्धेश्वर, हनुमान टाकळी, मोहटादेवी ही देवस्थाने आर्थिक स्त्रोतांसह उद्योगांना बळकटी देणारी आहेत. श्रीक्षेत्र मढी ते घाटशिरस जोडरस्त्याला अखेरची घरघर लागली आहे. करडवाडी जवळील ओढा, पुलाचे कठडे व रस्त्याचा काही भाग वाहून गेल्याने अपघाताची टांगती तलवार कायम आहे. धोंडाई मंदिराजवळ घाट रस्त्याच्या उतारावर एखादे चारचाकी वाहन आल्यास दुसऱ्या बाजूने चढणारी वाहने बाजूने घेताना कायम वाद होतात. परिक्रमा मार्ग दुरुस्तीसह उपरस्ते मजबुतीकरण व डांबरीकरण करण्याची मागणी होत आहे. सावरगाव ते गोशाळा असा जुना कोठी मार्ग दुरुस्ती करून वापरात आणावा. एकेरी वाहतूक केली जावी. तसेच मायंबा सावरगावला जोडणाऱ्या चारही रस्त्याचे रुंदीकरण करण्याची मागणी होत आहे.



गर्भगिरी परिक्रमा मार्गावरील वाहून गेलेल्या पुलाची दुरुस्ती अजून झालेली नाही.

लोकमत

# वीज जोडअभावी तीन वर्षांपासून पाणी योजना ठप्प

## सर्व कामे पूर्ण, तरी विजेअभावी मिळेना पाणी

लोकमत न्यूज नेटवर्क

**सुपा :** पारनेर तालुक्यातील सुपा गावासाठी महत्त्वाकांक्षी पाणी योजना तीन वर्षांपूर्वी झाली, परंतु वीज जोड अभावी अद्याप ही योजना कार्यान्वित झालेली नाही. त्यामुळे गावकऱ्यांची अवस्था 'विहीर उशाला व कोरड घशाला..' अशी झाली आहे.

सुपा गावासाठी विसापूर जलाशयातून १४६१.१० लाख रुपये किमतीच्या पाणी योजनेला प्रशासकीय मंजुरी मिळाली होती. १८ एप्रिल २०१८ रोजी योजनेचा कार्यारंभ आदेश निघाला. विहिर, विद्युत पंप, जलवाहिनी, टाक्या, जलशुद्धीकरण प्लॅन्ट, वितरिकांची कामे तीन वर्षांपूर्वीच पूर्ण झाली. योजनेची यशस्वी चाचणीही झाली, परंतु शेवटच्या टप्प्यात फक्त पोल ते पंप हा वीजजोड राहिला. केवळ या एकाच कारणाने ही योजना कार्यान्वित होऊ शकली नाही. त्यामुळे ग्रामस्थांत मोठी नाराजी आहे.

२३.७८ किमीची पाइपलाइन, साठवण टाक्या, जलशुद्धीकरण प्लॅन्ट, वितरिकांची कामे झाली. आतापर्यंत या योजनेवर ११६९ लाख रुपये खर्च झाल्याची माहिती शाखा अभियंता राजेंद्र चौधरी यांनी दिली. मंजूर निधीपैकी ३ कोटी ४७ लाख रुपये मिळाले असते, तर वीजजोड घेऊन योजना कार्यान्वित झाली असती, परंतु नंतर राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजना बंद झाली व जलजीवन मिशन आले. आता निधीसाठी संबंधित कार्यालयाकडे पत्रव्यवहार सुरू आहे. आता वीज वितरणने १ कोटी ११ लाखांचे कोटेशन दिल्याचे अभियंता चौधरी यांनी सांगितले. फेब्रुवारीनंतर सुप्यात पाणी टंचाई जाणवते. टँकर मुक्तीचे गावकऱ्यांचे स्वप्न तसेच राहिले.

## निवडणुकीत पाणी प्रश्न पेटणार

जनमताचा रेटा, राजकारणविरहित गावकारभारी एकत्र आल्यास पाणी मिळू शकेल, परंतु आगामी निवडणुका, राजकारणात समाज हित दुर्लक्षित होते. जिल्हा परिषद, पंचायत समिती व सुपा ग्रामपंचायत निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पाणी प्रश्न पेटण्याची चिन्हे आहेत.

“

सुपा पाणी योजनेसाठी ३ कोटी ७ लाख रुपये निधीची मागणी केली आहे. हा प्रस्ताव प्रशासकीय मंजुरीसाठी राज्य तांत्रिक परिषदेकडे देण्यात आला आहे. परिषदेची प्रशासकीय मंजुरी मिळताच, हे काम सुरू करण्यात येईल.

**- राजेंद्र चौधरी,** शाखा अभियंता, जलजीवन मिशन

लोकमत

# जिल्ह्यात वीज मीटरचा मोठा तुटवडा

## फॉल्टी मीटर बदलण्यासाठी महिन्याची वेटिंग : ग्राहकांनाच सांगितले जातेय विकत मीटर आणा

लोकमत फॉलोअप

लोकमत न्यूज नेटवर्क

**अहिल्यानगर :** एकीकडे स्मार्ट वीज मीटर बसविण्यासाठी शासनाने पुढाकार घेतलेला असताना दुसरीकडे महावितरणकडे वीज मीटरचा प्रचंड तुटवडा असून फॉल्टी मीटर बदलण्यासाठी महिनाभराची वेटिंग पहायला मिळत आहे. काही कर्मचारी तर थेट ग्राहकांनाच वीज मीटर विकत आणण्याचा अजब सल्ला देत आहेत. त्यामुळे स्मार्ट मीटर बसविण्याची मोहीम पूर्णतः बारगळली असल्याचे चित्र आहे.

जिल्ह्यात शहर, ग्रामीण, कर्जत, श्रीरामपूर व संगमनेर असे पाच महावितरणचे विभाग आहेत. या पाचही विभागांत ७ लाख ५५ हजार घरगुती ग्राहक आहेत. या सर्व ग्राहकांना स्मार्ट मीटर बसवले जाणार आहेत. परंतु महावितरणकडे यासाठी मीटरचा मोठा तुटवडा आहे.

अनेक भागात ग्राहक हे मीटर बसविण्यासाठी तयार आहेत, परंतु



महावितरण, तसेच संबंधित ठेकेदाराच्या ढिसाळपणामुळे मीटर उपलब्ध होत नाहीत. नवीन मीटर बसवणे दूरच फॉल्टी मीटरच्या जागी नवीन मीटर बसवून देण्यासही महावितरणकडे मीटर नसल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. यासाठी ग्राहकांना महिनाभराची प्रतीक्षा करावी लागत आहे. तरीही नवीन मीटर बदलून दिले जात नाही.

### जिल्ह्यात साडेसात लाख घरगुती ग्राहक

१ जिल्ह्यात ७ लाख ५५ हजार घरगुती वीज ग्राहक आहेत. या सर्वांना टीओडी स्मार्ट मीटर बसवण्याचे उद्दिष्ट आहे. मात्र आतापर्यंत केवळ १ लाख १२ हजार मीटर बसवले आहेत. म्हणजे हे प्रमाण केवळ १५ टक्के आहे.

२ अजून ८५ टक्के मीटर बसवण्याचे आव्हान महावितरणपुढे आहे. परंतु मीटरचा तुटवडा असल्याने हे उद्दिष्ट गाठणे अशक्य दिसत आहे.

### महिन्याला शेकडो मीटरमध्ये बिघाड

जिल्ह्यात महिन्याला शेकडो वीज मीटरमध्ये बिघाड होत आहे. अनेक जुने मीटर अचानक जंम्प होत असल्याने ग्राहकांना भरमसाठ बिल येत आहे.

**हे बिल कमी करून मीटर बदलून देण्याच्या मागणीसाठी दररोज महावितरणाच्या कार्यालयात गर्दी होते. परंतु तेथेही ग्राहकांना केवळ चकरा माराव्या लागत आहेत.**

### तुटवड्याची अधिकाऱ्यांची खासगीत कबुली

मीटरचा तुटवडा असल्याचे महावितरणचे अधिकारी खासगीत मान्य करतात. जिल्ह्यात एकाच ठेकेदार कंपनीकडे मीटर बदलून देण्याचे काम दिले असून त्यांचीही मीटर बदलण्यात दमछाक होत असल्याची माहिती आहे.

**२३०**

**रू. मीटर तपासणी शुल्क**

**मुळात मीटरमध्ये बिघाड असेल तर महावितरणने मीटर मोफत बदलून देणे गरजेचे आहे. मात्र मीटर तपासणीचे शुल्क म्हणून महावितरण ग्राहकांकडून २३० रूपये शुल्क आकारते. हे पैसे भरूनही महिनो महिने नवीन मीटर बसवून दिले जात नाही.**

सकाळ

# शहरातील रस्ता कामात दिरंगाई

## खोदलेले रस्ते ठरताहेत डोकेदुखी

**श्रीगोंदे, ता. २१ : श्रीगोंदे शहराचे व तालुक्याचे श्रद्धास्थान आराध्य दैवत आणि राज्यात प्रसिद्ध संत शेख महंमद महाराज यांचा वार्षिक यात्रोत्सव २७ व २८ फेब्रुवारी रोजी आहे. मात्र, कल्याण टोल इन्फ्रास्ट्रक्चर या ठेकेदार कंपनीच्या ढिसाळ नियोजनामुळे यावर्षीची यात्रा धुळीत आणि खडतर रस्त्यांवरून साजरी करावी लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे.**

ठेकेदार कंपनीने आंदोलकांना आणि तहसीलदारांना दिलेल्या पत्रात म्हटले की, श्रीगोंदे नगरपरिषद हद्दीतील रस्त्यासाठी आवश्यक असणारे डीएलसी आणि कॉंक्रिटीकरण करण्यासाठी 'आरएमसी प्लांट' उभारण्याचे काम वेगाने सुरू आहे. हा प्लांट कार्यान्वित होताच २० फेब्रुवारीपासून रस्त्याचे काम सुरू करण्यात येईल. परंतु, यात्रेला केवळ सात दिवस शिल्लक असताना काम सुरू करून ते पूर्ण करणे अशक्य आहे. सध्या रस्त्याच्या एका बाजूचे खोदकाम करून त्यावर केवळ खडीचा लेअर टाकला आहे. अशा परिस्थितीत यात्रेसाठी येणाऱ्या लाखो भाविकांना चालणेही मुश्कील होणार आहे. यात्रा काळात शहरातील व्यावसायिकांची मोठी आर्थिक उलाढाल होत असते. मात्र, रस्ते खोदून ठेवल्यामुळे आणि कामाच्या नियोजनाअभावी दुकानांसमोर ग्राहकांना येणे कठीण झाले आहे. यात्रेपूर्वी रस्ता तयार झाला नाही, तर व्यावसायिकांचे आर्थिक नुकसान होणार आहे.



श्रीगोंदे : शहरातील शनिचौक ते बगाडे कॉर्नर खोदून ठेवलेला रस्ता.

### यात्रेकरूंची हाल होण्याची भीती

**संत शेख महंमद महाराजांच्या दर्शनासाठी राज्याच्या कानाकोपऱ्यातून भाविक येतात. सध्याच्या धुळीच्या साम्राज्यामुळे आणि अर्धवट रस्ते कामामुळे भाविकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. कंपनीने आता केवळ आश्वासन न देता शहरातील मार्ग सुखकर करावा, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते सतीश बोरुडे यांनी केली.**

### व्यवसाय बेमुदत बंद आंदोलन

आठ दिवसांच्या आत काम सुरू नाही झाले, तर रस्त्यालगत व्यवसाय व दुकाने असणारे सर्व व्यापारी आपले व्यवसाय बेमुदत बंद ठेवून आंदोलन करणार असल्याची माहिती व्यावसायिक योगेश मांडे यांनी दिली.

सकाळ

# जप्त ड्रग्जवर पोलिसाचाच डल्ला

## एलसीबीच्या कर्मचाऱ्यास अटक : शिरूरमधील कारवाईचे धागेदोरे अहिल्यानगरमध्ये

■ सकाळ वृत्तसेवा

**अहिल्यानगर, ता. २१ : शिरूर (जि. पुणे) जप्त केलेल्या दोन कोटी रुपयांच्या एमडी ड्रग्ज प्रकरणाचे धागेदोरे अहिल्यानगर पोलिस दलापर्यंत येऊन पोहोचले आहेत. पुणे ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखा पोलिसांनी अहिल्यानगर स्थानिक गुन्हे शाखेतील पोलिस कर्मचारी श्यामसुंदर विश्वनाथ गुजर (वय ३९, रा. नेप्ती, ता. नगर) याला अटक केली आहे.**

पुणे ग्रामीणचे पोलिस अधीक्षक संदीपसिंह गिल्ल, अपर पोलिस अधीक्षक रमेश चोपडे, शिरूर उपविभागीय पोलिस अधिकारी प्रशांत ढोले यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक अविनाश शिळीमकर यांच्या नेतृत्वाखालील पथकाने शिरूर शहरातील बाबूरावनगर भागात ड्रग्ज विकणाऱ्यांना पकडण्यासाठी आले होते. शादाब रियाज शेख (वय ४१) हा शनिवारी (ता. १७) मध्यरात्री संशयास्पद फिरत असताना पोलिसांनी ताब्यात घेतले. त्याच्या बॅगची पंचासमक्ष झडती घेतली असता सुमारे २ कोटी १० लाख रुपयांचे १ किलो ५२ ग्रॅम वजनाचे 'एमडी' ड्रग्ज सापडले. अहिल्यानगर पोलिस दलाच्या स्थानिक गुन्हे शाखेतील पोलिस कर्मचारी श्यामसुंदर गुजर हा एमडी ड्रग्ज पुरवत असल्याची त्याने कबुली दिली. पुणे ग्रामीण पोलिसांनी मंगळवारी (ता.२०) सायंकाळी अहिल्यानगर पोलिस अधीक्षक कार्यालयातील स्थानिक गुन्हे शाखेतून गुजर याला ताब्यात घेतले. त्याची चौकशी केली असता, तो समाधानकारक उत्तरे देऊ शकला नाही. त्याच्याविरोधात महत्त्वाचे पुरावे आढळून आल्याने त्याला अटक करण्यात आली.

पोलिस कर्मचारी श्यामसुंदर गुजर स्थानिक गुन्हे शाखेत नार्को टेस्टसाठी काम करायचा. अहिल्यानगर जिल्ह्यात जप्त झालेले ड्रग्ज, अंमली पदार्थांचा मुद्देमाल कक्ष त्याच्या ताब्यात होता. जिल्हा पोलिस अधीक्षक कार्यालयात या मुद्देमालासाठी स्वतंत्र कक्ष आहे. या कक्षाची चावी मुख्यालयात जमा असते. ही चावी त्याच्याकडेच असायची, तसेच या विभागाचा सर्व पत्रव्यवहार देखील तोच सांभाळत होता. पोलिसांच्या चौकशीत श्यामसुंदर गुजर पोलिसांनी जप्त केलेल्या ड्रग्जमधून मुद्देमाल काढून बाहेर विकत असल्याचे समोर आले आहे.

### एमडी ड्रग्ज म्हणजे काय ?

■ मेफेड्रोन (एम.डी.) ड्रग्ज हे पकडण्यात आले आहे. नशेसाठी या ड्रग्जचा जास्त वापर केला जात आहे. जागतिक पातळीवर या ड्रग्जला मोठी मागणी आहे. या ड्रग्जचे बाजारमूल्य जास्त आहे. तस्कर हेच ड्रग्जची तस्करी करत आहेत.




### कारकीर्द वादग्रस्त

■ श्यामसुंदर गुजर हा यापूर्वी पारनेर पोलिस ठाण्यात कार्यरत होता. त्यावेळेस ही त्याची कारकीर्द वादग्रस्त ठरली होती. त्याविरोधात काही सामाजिक संघटनांनी निवेदने दिली होती. त्याच वेळेस त्याचा अंमली पदार्थांची तस्करी करणाऱ्यांशी संबंध आला असण्याची शक्यता आहे.

### श्रीरामपूरमधील ड्रग्ज प्रकरण पुन्हा चर्चेत

■ अहिल्यानगरमधील श्रीरामपूर आणि संगमनेरमध्ये मध्यंतरी ड्रग्जचे प्रकरण चांगलेच गाजत होते. श्रीरामपूरमधील एमआयडीसीतील एका गोदामातून पोलिसांनी १४ कोटी रुपयांचे ड्रग्ज जप्त केले होते. या ड्रग्ज प्रकरणाचे पुढे धागेदोरे तेलंगणापर्यंत निघाले. हे जप्त केलेले ड्रग्ज देखील स्थानिक गुन्हे शाखेच्या ताब्यात होते.

### अंमली पदार्थाऐवजी मैदा

■ पोलिसांनी जप्त केलेल्या मुद्देमालातून अंमली पदार्थ तो परस्पर काढत होता. त्याची विक्री करत होता. हे करताना तो तितक्याच वजनाचा मैदा त्या अंमलीपदार्थांमध्ये टाकत होता. त्यामुळे त्याच्यावर कोणाचा संशय येत नव्हता.

सकाळ

# सात्रळ आरोग्यकेंद्रास पदस्थापनेची प्रतीक्षा

## नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न : पर्यायी व्यवस्था गरजेची

■ सुहास वैद्य : सकाळ वृत्तसेवा

कोल्हार, ता. २१ : सुमारे पावणेसात कोटी रुपये खर्चून बांधलेले सात्रळ (ता. राहुरी) येथील सुसज्ज प्राथमिक आरोग्य केंद्र अत्यवस्थेत आहे. केंद्राला पदनिर्मिती व पदस्थापनेची प्रतीक्षा आहे. त्यामुळे सात्रळ परिसरातील आधुनिक वैद्यकीय सेवेचे टॉनिक कधी मिळणार? असा प्रश्न गावकऱ्यांना पडला आहे.



**सात्रळ (ता. राहुरी)** : प्राथमिक आरोग्य केंद्राची वापराविना धुळखात पडलेली सुसज्ज इमारत.

केंद्रात वैद्यकीय अधिकाऱ्यांसह इतरही पर्यायी कर्मचाऱ्यांची व्यवस्था करणे गरजेचे आहे. परिसराच्या आरोग्यसेवेत २१ हजार चौरस फूट क्षेत्रफळाचे अद्ययावत बांधकाम असलेले सर्व आरोग्य सुविधांनी परिपूर्ण हे प्राथमिक आरोग्य केंद्र बांधले आहे. त्याचे कामही पूर्ण झाले. सात्रळ-तांभेरे रस्त्यास लागून हे आरोग्य केंद्र आहे. शालिनी विखे यांच्या जिल्हा परिषद अध्यक्षपदाच्या काळात आरोग्य केंद्राच्या बांधकामाला मंजुरी मिळाली होती. केंद्राच्या इमारतीसाठी आवश्यक भूसंपादन करण्यापासून त्यांचे प्रयत्न व पाठपुरावा महत्त्वाचा आहे. सात्रळमध्ये आरोग्यवर्धिनी उपकेंद्र असून, ते गुहा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत आहे. त्याला सात्रळ व माळेवाडी ही गावे जोडलं आहेत. सात्रळला स्वतंत्र प्राथमिक आरोग्य केंद्र व्हावे, अशी गावकऱ्यांची मागणी होती. नवीन ठिकाणी आरोग्य केंद्राची सुसज्ज मुख्य इमारत, कर्मचारी निवासस्थाने, अंतर्गत गटार व रस्ते, केंद्राच्या आवारात पेव्हर ब्लॉक, झाडांचे सुशोभीकरण, संरक्षक भिंत अशी केंद्राची रचना आहे. इमारती पूर्ण झाली आहे; परंतु मनुष्यबळाची शासकीय स्तरावरून अद्याप नेमणूक झालेली नाही. दोन वैद्यकीय अधिकाऱ्यांसह १४ कर्मचाऱ्यांची नेमणूक प्रस्तावित आहेत. त्यापैकी सुपरवायझर, आरोग्य सहायक व सहायिका, आरोग्यसेवक महिला व पुरुष, बाह्य रुग्णसेविका, औषधनिर्माण अधिकारी, शिपाई व सफाई कामगार आहेत. पदनिर्मितीचा प्रस्ताव मंत्रालय स्तरावर पाठवला असून, तो मंजुरीच्या प्रतीक्षेत असल्याचे सांगण्यात आले.

### लोकार्पणाला आजच दोन वर्षे पूर्ण

■ राष्ट्रीय आरोग्य अभियान आरोग्य विभागाअंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्राची मुख्य इमारत व कर्मचारी निवासस्थानाचा लोकार्पण समारंभ गेल्या दोन वर्षांपूर्वी २१ जानेवारी २०२४ रोजी झाला होता. त्याला दोन वर्षे पूर्ण झाली आहेत.

दै. दिव्यमराठी

दि.२२ जानेवारी,२०२६

सिटी ॲक्टिव्हिटी

घडामोड • प्रहार जनशक्ती पक्षाने दिला आंदोलनाचा इशारा, ग्रामस्थांचीही नाराजी नाराजी

# एरंडोलीतील पाझरतलाव मेंटेनन्समध्ये निकृष्ट कामाचा आरोप; चौकशीची मागणी

प्रतिनिधी | श्रीगोंदे

एरंडोली येथील पाझरतलाव मेंटेनन्स कामाबाबत सध्या तालुक्यात नाराजी व्यक्त होत आहे. शेतकऱ्यांच्या पाण्याचा प्रमुख स्रोत असलेल्या या पाझरतलावाच्या देखभाल व दुरुस्तीच्या कामात निकृष्ट दर्जा, तांत्रिक नियमांचे उल्लंघन तसेच पारदर्शकतेचा अभाव असल्याचे गंभीर आरोप ग्रामस्थ व प्रहार जनशक्ती पक्षाकडून करण्यात आले आहेत. या संदर्भात उपविभागीय अभियंता, जलसंपदा विभाग, श्रीगोंदे तालुका यांना निवेदन देत तात्काळ चौकशी व कारवाईची मागणी करण्यात आली आहे.

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, सध्या सुरू असलेले पाझरतलाव मेंटेनन्सचे काम मंजूर टेंडर अटी, तांत्रिक अंदाजपत्रक आणि निर्धारित कार्यपद्धतीच्या पूर्णपणे विरोधात सुरू आहे. कामात वापरण्यात येणारे साहित्य, कामाची खोली, बंधाऱ्यांची मजबूती तसेच एकूण रचना या सर्व बाबी संशयास्पद असल्याचा आरोप करण्यात येत आहे. विशेष म्हणजे, याबाबत ग्रामस्थांनी वारंवार तोंडी तक्रारी करूनही संबंधित यंत्रणेकडून कोणतीही ठोस दखल घेण्यात आलेली नसल्याने संताप वाढत आहे.

दरम्यान, या प्रकरणी उपविभागीय जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण उपविभाग श्रीगोंदे जायभाय यांनी लेखी निवेदन देत खुलासा केला आहे. कामासंदर्भातील सर्व कागदपत्रे कार्यारंभ आदेश, निविदा, तांत्रिक मान्यता, प्रशासकीय मान्यता, अंदाजपत्रक आदी मागणीप्रमाणे उपलब्ध करून देण्यात येतील, असे त्यांनी स्पष्ट केले आहे. तसेच ग्रामस्थांनी सुचविलेल्या समितीची स्थापना वरिष्ठ कार्यालयाशी चर्चा करून करण्यात येईल. या समितीच्या बैठकीत कामाचा दर्जा, काम पूर्ण करण्याचा कालावधी, आतापर्यंत अदा करण्यात आलेली देयके तसेच पाझरतलावाची मोजणी यांबाबत सविस्तर चर्चा करण्यात येईल, असेही सांगितले आहे.

## आंदोलन छेडण्याचाही दिला इशारा

प्रहार जनशक्ती पक्ष व ग्रामस्थांनी संयुक्त पाहणी, मोजमाप पुस्तिका व बिले सार्वजनिक करणे, निकृष्ट काम आढळल्यास तात्काळ काम बंद करून दोषी ठेकेदारावर कारवाई करणे तसेच दर्जेदार पद्धतीने नव्याने काम करण्याचे आदेश देण्याच्या ठोस मागण्या केल्या आहेत. या मागण्यांची तात्काळ पूर्तता न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.

आता प्रशासनाने केवळ कागदोपत्री आश्वासनांपुरते न थांबता प्रत्यक्ष कृतीतून पारदर्शकता व जबाबदारी सिद्ध करणे आवश्यक आहे. पाझर तलाव वाचवायचा असेल तर वेळेत आणि दर्जेदार निर्णय हाच एकमेव मार्ग असल्याचे मत ग्रामस्थांनी व्यक्त केले आहे.

यावेळी प्रहार जनशक्ती पक्षाचे जिल्हाध्यक्ष विनोद परदेशी, तालुकाध्यक्ष सुरेश सुपेकर, विजय भंडारे, सागर जाधव, वामन भदे, विलास शेळके, सुरज सुपेकर, सागर जठार, संजय शेळके, राहुल इथापे, संदीप इथापे, सुधाकर भंडारे, सुनील मोरे, नारायण भंडारे आदींसह एरंडोली गावातील ग्रामस्थ व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रोपवाटिकांसाठी पारदर्शक व्यवस्थेची गरज

▶ वसंत सानप । नवराष्ट्र

जामखेड. राज्यातील शासनमान्य रोपवाटिकांमध्ये सुरू असलेल्या गैरप्रकारांवर आधारित पाच भागांची मालिका केवळ त्रुटी उघड करणारी नव्हे, तर राज्याच्या फलोत्पादन व्यवस्थेच्या मुळावर बोट ठेवणारी ठरली आहे. आता या मालिकेचा समारोप करताना दोषारोपांपलीकडे जाऊन धोरणात्मक निर्णय, कडक नियमावली आणि उत्तरदायित्व निश्चित करण्याचा काळ आला आहे. ही मालिका एखाद्या रोपवाटिकेविरुद्ध नाही, तर पारदर्शक, प्रामाणिक आणि शेतकरी-केंद्रित रोपवाटिका व्यवस्थेसाठीची मागणी आहे. आता निर्णय शासनाच्या हाती आहे. गोरखधंद्याला मूकसंमती देणार की, धोरणात्मक बदलातून फलोत्पादनाला सुरक्षित भविष्य देणार, याकरिता थेट शेतकऱ्यांच्या बांधावर निर्माण झालेली स्थिती दैनिक 'नवराष्ट्र'ने मांडलेली आहे. फलोत्पादन राज्याच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचे कणा आहे. हा कणा कमकुवत करणाऱ्या रोपवाटिकांच्या गैरप्रकारांकडे डोळेझाक करणे म्हणजे भविष्यातील कृषी अर्थव्यवस्थेला धोक्यात घालणे होय. शेतकरी न्यायालयाच्या उंबरठ्यावर ढकलला जाण्याऐवजी, प्रशासनानेच त्याला न्याय देण्याची जबाबदारी स्वीकारली पाहिजे.

## उत्तरदायित्व निश्चितीचा निर्णायक क्षण; न्याय देणे सरकारच्या हाती



### रोपाच्या मातृवृक्षाबाबत माहिती मिळावी

राज्यातील बहुतांश रोपवाटिकांमध्ये आजही एक मूलभूत प्रश्न अनुत्तरित आहे. तो म्हणजे शेतकऱ्यांना पुरवली जाणारे रोप नेमके कोणत्या मातृवृक्षापासून तयार झाले आहे, याचा ठोस व पडताळणीयोग्य पुरावा कुठे आहे हा. हीच पोकळी गैरप्रकारांची जननी ठरत आहे. मातृवृक्ष नोंदणी, वाण शुद्धतेचे दस्तऐवजीकरण आणि रोपांची ट्रेसिबिलिटी नसल्याने रोपवाटिकाचालकांना बाहेरून रोपे आणून विक्री करण्याची मोकळीक मिळते. परिणामी शेतकरी वर्षानुवर्षे मेहनत घेऊन उभ्या केलेल्या बागांमध्ये वाण भिसळती, उत्पादन घट आणि आर्थिक नुकसान सहन करतो.

### राज्यपातळीवर हस्तक्षेपाची गरज

याच पार्श्वभूमीवर आता राज्य पातळीवर ठोस हस्तक्षेपाची गरज आहे. मुख्यमंत्री, कृषी मंत्री, कृषी आयुक्तालय, राज्यस्तरीय फलोत्पादन धोरण ठरवणारी यंत्रणा, कृषी अधिकारी आणि तालुका पातळीवरील यंत्रणा या सर्वांनी मिळून रोपवाटिका व्यवस्थेचा नव्याने आराखडा तयार करणे अपरिहार्य झाले आहे. प्रत्येक शासनमान्य रोपवाटिकेत नोंदणीकृत मातृवृक्ष बागेची सक्ती, मातृवृक्ष, कलम, रोपनिर्मिती व विक्रीपर्यंत डिजिटल ट्रॅकिंग यंत्रणा आणि रोपविक्रीच्या वेळी वाणशुद्धतेचा प्रमाणित दस्तऐवज देणे बंधनकारक हवे.

### रोपवाटिकांवर कारवाई व्हावी

याबरोबरच तपासणी अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करणाऱ्या स्पष्ट कार्यपद्धतीची अंमलबजावणी करणे बंधनकारक करण्यात यायला हवे. नियमभंग करणाऱ्या रोपवाटिकांवर परवाना रद्द करण्यापर्यंतची कारवाई आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, शेतकरी फसवणुकीच्या प्रकरणांमध्ये त्वरित नुकसानभरपाईचा निर्णय होण्याचीही आवश्यकता आहे.

**दै. प्रभात** **दि.२२ जानेवारी,२०२६**

प्रभात

# आरटीओ कार्यालयातील फिटनेस बंद

## दळणवळण व्यवस्था ठप्प होण्याच्या मार्गावर । वाहनधारक त्रस्त

**अहिल्यानगर, दि. २१ (प्रतिनिधी)** - अहिल्यानगर येथील एमएच.१६ प्रादेशिक परिवहन कार्यालयात लक्झरी बस, स्कूल बस व इतर व्यावसायिक वाहनांचे फिटनेस प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया ३ जानेवारीपासून बंद असल्याने संपूर्ण जिल्ह्यातील दळणवळण व्यवस्था धोक्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर अहमदनगर बस ओनर्स अँड ट्रॅव्हल्स असोसिएशनच्या वतीने प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांना निवेदन देऊन फिटनेस प्रक्रिया तातडीने सुरू करण्याची जोरदार मागणी करण्यात आली आहे.

अहिल्यानगर आरटीओ कार्यालयात १० लाख ८५ हजार ५६३ वाहनांची नोंदणी असून त्यापैकी ९ लाख ३० हजार २३७ खासगी वाहने आहेत. खासगी वाहनांना १५ वर्षांसाठी फिटनेस दिला जातो. मात्र १ लाख ५५ हजार ३२६ व्यावसायिक वाहने- लक्झरी बस, स्कूल बस, एसटी, रिक्षा, ट्रक, टँकर व इतर मालवाहतूक वाहनांना मोटार वाहन कायदा १९८८ कलम ६२(१) नुसार दरवर्षी फिटनेस घेणे बंधनकारक आहे. फिटनेस नसलेल्या वाहनांना रस्त्यावर चालवण्यास कायद्याने मनाई आहे.आरटीओ कार्यालयाकडून देण्यात आलेल्या माहितीनुसार नवीन एटीएस मशीन सुरू झाल्यानंतरच फिटनेस प्रक्रिया सुरू होणार असून त्यासाठी अंदाजे सहा महिन्यांचा कालावधी लागणार आहे. सध्या दररोज सरासरी ६४ वाहने, तर महिन्याला सुमारे १ हजार ५०० वाहनांचे फिटनेस केले जातात. सहा महिन्यांत अंदाजे ९ हजारांहून अधिक वाहने एकतर उभी राहतील किंवा नाईलाजाने विना फिटनेस रस्त्यावर धावतील, अशी गंभीर परिस्थिती निर्माण होणार आहे.अहिल्यानगर आरटीओ हद्दीत सध्या ८१२ स्कूल बसेस, १ हजार २१६ लक्झरी बसेस, १५० एमआयडीसी कामगार वाहतूक बसेस, तसेच ८ हजार ३६६ ऑटोरिक्षा प्रवासी वाहतूक करतात. याशिवाय दररोज ५०० भाजीपाला वाहने, ३५० दूध टँकर, ७६० पेट्रोलियम टँकर आणि ४०० घरगुती गॅस वाहने जिल्ह्यातून राज्यातील विविध भागांत जातात. फिटनेस बंद राहिल्यास शाळा, प्रवासी वाहतूक, औद्योगिक कामगार व अत्यावश्यक मालवाहतूक पूर्णतः विस्कळीत होण्याची शक्यता आहे.

वाहन मालकांनी वाहने खरेदीसाठी बँक व फायनान्स कंपन्यांकडून कर्ज घेतले असून दरमहा मोठे हप्ते भरावे लागतात. फिटनेसअभावी वाहने उभी राहिल्यास चालक, मालक, फिटर, वायरमन यांचा उदरनिर्वाह धोक्यात येणार असून अनेक कुटुंबांवर उपासमारीची वेळ येईल.शालेय विद्यार्थ्यांची, प्रवाशांची व कामगारांची गैरसोय टळावी तसेच अत्यावश्यक मालवाहतूक सुरळीत सुरू राहावी, यासाठी कार्यालयातील फिटनेस प्रक्रिया तातडीने सुरू करावी, अशी ठाम मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.यावेळी अध्यक्ष नावेद शेख, सचिव रमेश बोसले, रवी जोशी, जयकुमार बोगावत उपस्थित होते.

Ahilyanagar Edition
Jan 22, 2026 Page No. 3
Powered by: erelego.com

प्रभात

# ‘कल्याण टोल’ चा ढिसाळ कारभार उघड

## शेख महंमद महाराज यात्रेला फटका बसणार? । धुळीने वाहनचालक हैराण

**श्रीगोंदा, दि.२१ (प्रतिनिधी)** - श्रीगोंदा शहराचे आराध्य दैवत आणि राज्यात प्रसिद्ध असलेल्या संत शेख महंमद महाराज यांचा यात्रा उत्सव २७ फेब्रुवारी रोजी संपन्न होत आहे. मात्र, ‘कल्याण टोल इन्फ्रास्ट्रक्चर’ या ठेकेदार कंपनीच्या ढिसाळ नियोजनामुळे यावर्षीची यात्रा धुळीत आणि खडतर रस्त्यांवरून साजरी करावी लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे. ठेकेदार कंपनीने आंदोलकांना आणि तहसीलदारांना दिलेल्या पत्रात असे म्हटले आहे की, श्रीगोंदा नगरपरिषद हद्दीतील रस्त्यासाठी आवश्यक असणारे डएिशसी आणि कॉंक्रिटीकरण करण्यासाठी आरएमसी प्लांट उभारण्याचे काम वेगाने सुरू आहे.



हा प्लांट कार्यान्वित होताच २० फेब्रुवारी २०२६ पासून सुरू करण्यात येईल. परंतु, यात्रेला केवळ सात दिवस शिल्लक असताना काम सुरु करून ते पूर्ण करणे अशक्य आहे. सध्या रस्त्याच्या एका बाजूचे खोदकाम करून त्यावर केवळ खडीचा लेअर टाकलेला आहे. अशा परिस्थितीत यात्रेसाठी येणाऱ्या लाखो भाविकांना चालणे देखील मुश्कील होणार आहे.यात्रेच्या काळात शहरातील व्यावसायिकांची मोठी आर्थिक उलाढाल होत असते. मात्र, रस्ते खोदून ठेवल्यामुळे आणि कामाच्या नियोजनाअभावी दुकानांसमोर ग्राहकांना येणे कठीण झाले आहे. जर यात्रेपूर्वी रस्ता नीट झाला नाही, तर व्यावसायिकांचे मोठे आर्थिक नुकसान होणार आहे.

### काम सुरू न झाल्यास आंदोलन करणार

आठ दिवसाच्या आत काम सुरू नाही झाले तर रस्त्यालगतच्या सर्व व्यापारी बंधू हे आपले व्यवसाय बेमुदत बंद ठेवत आंदोलन करणार असल्याची माहिती व्यावसायिक योगेश मांडे यांनी दिली.

संत शेख महंमद महाराजांच्या दर्शनासाठी राज्याच्या कानाकोपऱ्यातून भाविक येतात. ठेकेदार कंपनीने शहरातील रस्ता उकरून ठेवल्याने स्थानिक व्यावसायिकांसोबतच यात्रा काळात येणाऱ्या व्यावसायिकांचे हाल होणार आहेत. सध्याच्या धुळीच्या साम्राज्यामुळे आणि अर्धवट रस्ते कामामुळे भाविकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. कंपनीने शहरातील मार्ग सुखकर करावा.
**सतीश बोरुडे**, सामाजिक कार्यकर्ते

प्रभात

# पात्र असूनही अपात्र ठरल्या लाडक्या बहिणी!

## केवायसीचा गोंधळ उघड; आर्थिक लाभांपासून वंचित

**अहिल्यानगर, दि. २१ (प्रतिनिधी)** - मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ मिळविण्यासाठी शासनाने अनिवार्य केलेली 'केवायसी' प्रक्रिया अनेक महिलांसाठी डोकेदुखी ठरली आहे. केवायसी प्रक्रियेत विचारलेल्या प्रश्नांच्या क्लिष्ट स्वरूपामुळे अनेक महिलांनी चुकीचे पर्याय निवडले. ज्याचा थेट परिणाम योजनेतून मिळणाऱ्या लाभावर झाला आहे. डिसेंबरपासूनचा हप्ता न मिळाल्याने पात्र असूनही हजारो महिला लाभापासून वंचित राहिल्या आहेत.




योजनेची व्याप्ती वाढवताना शासनाने केवळ खऱ्या लाभार्थ्यांपर्यंत पैसे पोहोचावेत, यासाठी केवायसी करताना दोन महत्त्वाचे प्रश्न विचारले होते. लाडक्या बहिणींचे पैसे आले; किती हप्ते जमा? हे प्रश्न हो' किंवा नाही' अशा स्वरूपात द्यायचे होते. मात्र, प्रश्नांची रचना नकारात्मक आणि लांबलचक असल्याने ग्रामीण व निमशहरी भागातील महिलांचा गोंधळ उडाला. पहिल्या प्रश्नात कुटुंबात सरकारी कर्मचारी नसल्याची खात्री विचारली होती. अनेकांनी घाईगडबडीत किंवा प्रश्न न समजल्याने तिथे होय' वर क्लिक केले, ज्याचा अर्थ आमच्याकडे सरकारी कर्मचारी आहे' असा झाला आणि त्या अपात्र ठरल्या. कुटुंबातील केवळ एक विवाहित व एक अविवाहित महिला लाभ घेत असल्याबाबतच्या दुसऱ्या प्रश्नातही तांत्रिक चुका झाल्या.

### डिसेंबरपासूनचा हप्ता रखडला

ज्या महिलांची केवायसी यशस्वी झाली नाही किंवा ज्यांनी चुकीची उत्तरे नोंदवली, त्यांचे नाव सिस्टीममधून तात्पुरते बाजूला केले आहे. परिणामी, डिसेंबरचा हप्ता आणि त्यानंतरचे लाभ मिळणे बंद झाले आहे. हजारो महिला सध्या सेतू केंद्र आणि सरकारी कार्यालयांच्या फेऱ्या मारत आहेत.

लाडकी बहीण योजनेचे पैसे मिळत नसल्याने अनेक महिला तालुका व जिल्हास्तरीय महिला व बाल कल्याण विभागाकडे तक्रारी घेऊन येत आहेत. तिथे तपासणी केल्यानंतर केवायसी करताना पर्याय चुकल्याचे लक्षात आले आहे. ही चूक सुधारण्याची संधी शासनाने द्यावी, अशी मागणी लाडक्या बहिणी करीत आहेत.

Ahilyanagar Edition
Jan 22, 2026 Page No. 3
Powered by: erelego.com

दै. सार्वमत

दि.२२ जानेवारी,२०२६

नवी आशा नवी दिशा
सार्वमत
epaper.deshdoot.com
22 Jan 2026 - Page 05

# नगर-मनमाड रस्त्याचे काम जोमात मात्र वाहतुकीचा बोजवारा

बाभळेश्वर (वार्ताहर)- अखेर २०२५ साल हे नगर मनमाड रस्त्यासाठी काहीसे वरदान ठरले. केंद्रीय दळणवळण मंत्री नितीन गडकरी यांच्या सहकार्याने नाशिक येथे २०२७ मध्ये होणाऱ्या कुंभमेळ्यामुळे ५०० कोटींच्या आसपास नवीन टेंडर पास झाले व या महामार्गाच्या कामाला सुरुवात झाली. पावसाळ्यापूर्वी सुरू झालेले काम कमी अधिक प्रमाणात सुरू झाले. आता या कामाने मोठ्या प्रमाणात गती घेतली आहे. या रस्त्याचे काम जोमात जरी चालू असले तरी मात्र वाहतुकीचा पुरता बोजवारा उडाला आहे.

महाराष्ट्रात नव्हे तर भारतात ज्या रोडची चर्चा होते. तो सर्वात महत्त्वाचा राष्ट्रीय महामार्ग म्हणजे नगर-मनमाड हा राष्ट्रीय महामार्ग होय. गेल्या पंधरा ते वीस वर्षापासून या रस्त्याचे काम सुरू आहे. परंतु आजपर्यंत हा रस्ता कधीच पूर्ण झाला नाही. दोन कॉन्ट्रॅक्टर अक्षरशः हे काम स्थानिक राजकारणामुळे काम सोडून गेले. परंतु हा महामार्ग मात्र कधीच पूर्ण झाला नाही. राष्ट्रीय महामार्गावर शिर्डी तसेच शनिशिंगणापूर यासारखे जगविख्यात देवस्थान असल्यामुळे साहजिक प्रवासी वाहतूक मोठ्या प्रमाणावर सुरू असते. जड वाहतूक सुद्धा मोठ्या प्रमाणात असते. दक्षिण भारत व उत्तर भारत यांना जोडणारा हा प्रमुख मार्ग आहे.

त्यामुळे वाहतुकीच्या दृष्टीने या महामार्गास अनन्यसाधारण महत्व आहे.



परंतु गेली १५ ते २० वर्षांपासून खड्ड्यात रस्ते की रस्त्यात खड्डा अशी अवस्था आहे. या रस्त्याची मात्र साडेसाती संपता संपेना. अखेर २०२५ साल हे नगर-मनमाड रस्त्यासाठी काहीसे वरदान ठरले. केंद्रीय दळणवळण मंत्री नितीन गडकरी यांच्या सहकार्याने नाशिक येथे २०२७ मध्ये होणाऱ्या कुंभमेळ्यामुळे ५०० कोटींच्या आसपास नवीन टेंडर पास झाले व या महामार्गाच्या कामाला सुरुवात झाली. पावसाळ्यापूर्वी सुरू झालेले काम कमी अधिक प्रमाणात सुरू झाले. आता या कामाने मोठ्या प्रमाणात गती घेतली आहे. या रस्त्याचे काम जोमात जरी चालू असले तरी मात्र वाहतुकीचा पुरता बोजवारा उडाला आहे.

वाहतुकीची कोंडी सोडवण्यासाठी माजी खा. डॉ. सुजय विखे तसेच कार्यकर्त्यांना पुढाकार घ्यावा लागला. सध्या नगर-मनमाड रोड बऱ्याच ठिकाणी एकेरी वाहतूक सुरू असल्यामुळे चालक मात्र हैराण झालेले आहेत. दोन तासाचा प्रवास करायला चार तास लागत आहेत. रस्त्याचे काम, वाहतूक कोंडी, रस्त्याचा उडणारा धुराळा या रोजच्या समस्या झाल्या आहेत. राष्ट्रीय महामार्गावर रोडवरील पाणी वाहून जाण्यासाठी नाल्या बनविण्यात येत आहेत. यामुळे व्यावसायिक मात्र पूर्ण बुडाले आहेत, तो जणू कोमात गेला आहे की काय अशीच अवस्था त्याची आहे. कारण रोडचे काम आणि बांधण्यात येणाऱ्या नाल्या यामुळे व्यावसायिक शून्य झाले आहेत. या नाल्यामुळे आता रोडवर कोणती पार्किंग सुविधा उपलब्ध नसणार आहे. शिवाय डिव्हायडर पासून ते नाल्यापर्यंत अंतर २५ ते ३० फुटांचे असणार आहे. त्यामुळे व्यावसायिकांना ग्राहक मिळणे अवघड झाले आहे. यामुळे नवीन वर्षाची संक्रांत व्यवसायिकांवर आजही आहे. बऱ्याच व्यावसायिकांनी महामार्ग लगत असलेला आपला व्यवसाय बंद केल्याचे निदर्शनास येत आहे. नाल्यामुळे नागरी वस्त्यांमध्ये जाण्यासाठी सुद्धा महत्त्वाच्या गावांमध्ये सर्विस रोड असण्याची शक्यता आहे. नगर बायपास ते सावळीविहीर असे या महामार्गाचे काम असणार आहे.

सध्या बऱ्याच ठिकाणी या महामार्गाचे काम सुरू आहे. परंतु होणारे अपघात, वाहतूक कोंडी, रस्त्यावरील धुराळा यामुळे सध्या तरी नगरकर जाम आहेत. या रस्त्याचे काम कधी पूर्ण होईल व रस्त्याला अच्छे दिन येतील याचीच वाट पाहत आहेत.

नवी आशा नवी दिशा
सार्वमत
epaper.deshdoot.com
22 Jan 2026 - Page 07

# दोन किलोमीटरच्या प्रवासासाठी ४० मिनिटे!

## शेवगावच्या वाहतूक कोंडीचा प्रश्न 'जैसे थे'; जीवघेणी ऊस वाहतूक

**शेवगाव (तालुका प्रतिनिधी)** – शेवगाव शहरातील सततची वाहतूक कोंडी गेल्या अनेक वर्षांपासून नागरिकांसाठी मोठी डोकेदुखी ठरत आहे. या काळात लोकप्रतिनिधी, प्रशासकीय अधिकारी बदलले; मात्र वाहतूक कोंडीचा प्रश्न जैसे थे रहिला आहे. कायद्याची प्रभावी अंमलबजावणी, ठोस निर्णयक्षमता, कृतीशीलता आणि प्रशासनाची आत्मीय भूमिका नसल्यामुळे आजवर या समस्येवर शाश्वत उपाय निघू शकलेला नाही.

शहरातील क्रांती चौकातून अहिल्यानगर, पाथर्डी, नेवासा, पैठण, गेवराईकडे जाणारे प्रमुख रस्ते जातात. या मार्गांवरून दिवसरात्र प्रवासी व मालवाहतूक करणाऱ्या वाहनांची वर्दळ असते. विशेषतः उस वाहतूक करणारे डबल ट्रॉली ट्रॅक्टर वाहतुकीचा अक्षरशः बोजवारा उडवत आहेत. जवळच बसस्थानक आणि शहरात प्रवेश करणारा मुख्य रस्ता असल्याने परिस्थिती आणखी गंभीर बनली आहे.

शहरात वाहनांनी प्रवेश केल्यानंतर अवघे दीड ते दोन किलोमीटर अंतर पार करण्यासाठी ४० ते ५० मिनिटे लागत असल्याचे चित्र वारंवार दिसून येत आहे. उस वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरची जीवघेणी कसरत गेवराई रस्त्यावरील चढावर व डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक परिसरात पाहिली की अंगावर काटा उभा राहतो. अनेक वेळा ट्रॅक्टरची पुढील चाके हवेत उचलली जातात. एखाद्या क्षणी हे ट्रॅक्टर मागे सरकल्यास मागील लांबलचक वाहनांच्या रांगा आणि संभाव्य अपघाताची जबाबदारी नेमकी कोण घेणार, असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.



▶ या प्रश्नावर वंचित बहुजन आघाडीचे राज्य उपाध्यक्ष प्रा. किसन चव्हाण, प्यारेलाल शेख व कार्यकर्त्यांनी आवाज उठवून परिवहन अधिकाऱ्यांकडे परिस्थिती मांडली. क्षमतेपेक्षा जास्त वजनाची उस वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कारवाईचे संकेत मिळाल्याचे सांगितले जात असले, तरी प्रत्यक्षात काय बदल झाला, हा प्रश्न अद्याप अनुत्तरितच आहे. शहरातील रस्त्यांची दुरवस्था, वाहतूक कोंडी, पंधरा दिवसांतून एकदा येणारे पाणी, मोकाट जनावरे, बंद पथदिवे अशा समस्यांच्या चक्रव्यूहात अडकलेले शेवगावकर या प्रश्नांतून कधी मुक्त होणार? याकडेच आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

काही ट्रॉलींवर वाहन नोंदणी क्रमांकही नसल्याचे दिसून येते. ही वाहने रस्त्याच्या मधोमध चालवली जात असून मागील वाहतुकीकडे जणू त्यांचे कोणतेही देणेघेणे नाही. या वाहतूक कोंडीचा फटका केवळ वाहनचालकांपुरता मर्यादित नसून दुचाकीस्वार, पादचारी तसेच रस्त्यालगत असलेले हॉटेल, वस्त्रालये, दवाखाने व अन्य व्यावसायिकांना धूळ आणि वाहनांच्या धुरामुळे मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

शहरातून जाणाऱ्या मुख्य रस्त्यावरील अतिक्रमणे प्रशासनाने हटवली असली, तरी त्याचा वाहतूक सुरळीत होण्यावर कोणताही ठोस परिणाम झालेला नाही. सार्वजनिक बांधकाम विभाग, नगरपरिषद, पोलीस दल, महसूल विभागातील अधिकारी, अभियंते, मुख्याधिकारी, तहसीलदार, प्रांताधिकारी बदलून गेले; लोकप्रतिनिधीही बदलले, मात्र प्रश्न आजही तसाच आहे.

या संदर्भात काही अधिकाऱ्यांनी कडक कारवाईची भूमिका घेतली होती; मात्र राजकीय मध्यस्थीमुळे ती डळमळीत झाल्याची चर्चा शहरात सुरू आहे. सर्व संबंधित विभागांतील स्थानिक अधिकाऱ्यांमध्ये सुसंवाद, एकवाक्यता, काही चौकांमध्ये वाहतूक सिग्नल यंत्रणा, जड वाहनांना ठराविक वेळेत प्रवेश, तसेच याला लोकप्रतिनिधींचा एकमुखी पाठिंबा मिळाल्यासच परिस्थितीत बदल होऊ शकतो, असे जाणकारांचे मत आहे. त्याचबरोबर वाहनचालकांनीही वाहतूक नियमांचे पालन करणे तितकेच आवश्यक आहे.

प्रभात

# पात्र असूनही अपात्र ठरल्या लाडक्या बहिणी!

## केवायसीचा गोंधळ उघड; आर्थिक लाभांपासून वंचित

**अहिल्यानगर, दि. २१ (प्रतिनिधी)** - मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ मिळविण्यासाठी शासनाने अनिवार्य केलेली 'केवायसी' प्रक्रिया अनेक महिलांसाठी डोकेदुखी ठरली आहे. केवायसी प्रक्रियेत विचारलेल्या प्रश्नांच्या क्लिष्ट स्वरूपामुळे अनेक महिलांनी चुकीचे पर्याय निवडले. ज्याचा थेट परिणाम योजनेतून मिळणाऱ्या लाभावर झाला आहे. डिसेंबरपासूनचा हप्ता न मिळाल्याने पात्र असूनही हजारो महिला लाभापासून वंचित राहिल्या आहेत.




योजनेची व्याप्ती वाढवताना शासनाने केवळ खऱ्या लाभार्थ्यांपर्यंत पैसे पोहोचावेत, यासाठी केवायसी करताना दोन महत्त्वाचे प्रश्न विचारले होते. लाडक्या बहिणींचे पैसे आले; किती हप्ते जमा? हे प्रश्न हो' किंवा नाही' अशा स्वरूपात द्यायचे होते. मात्र, प्रश्नांची रचना नकारात्मक आणि लांबलचक असल्याने ग्रामीण व निमशहरी भागातील महिलांचा गोंधळ उडाला. पहिल्या प्रश्नात कुटुंबात सरकारी कर्मचारी नसल्याची खात्री विचारली होती. अनेकांनी घाईगडबडीत किंवा प्रश्न न समजल्याने तिथे होय' वर क्लिक केले, ज्याचा अर्थ आमच्याकडे सरकारी कर्मचारी आहे' असा झाला आणि त्या अपात्र ठरल्या. कुटुंबातील केवळ एक विवाहित व एक अविवाहित महिला लाभ घेत असल्याबाबतच्या दुसऱ्या प्रश्नातही तांत्रिक चुका झाल्या.

### डिसेंबरपासूनचा हप्ता रखडला

ज्या महिलांची केवायसी यशस्वी झाली नाही किंवा ज्यांनी चुकीची उत्तरे नोंदवली, त्यांचे नाव सिस्टीममधून तात्पुरते बाजूला केले आहे. परिणामी, डिसेंबरचा हप्ता आणि त्यानंतरचे लाभ मिळणे बंद झाले आहे. हजारो महिला सध्या सेतू केंद्र आणि सरकारी कार्यालयांच्या फेऱ्या मारत आहेत.

लाडकी बहीण योजनेचे पैसे मिळत नसल्याने अनेक महिला तालुका व जिल्हास्तरीय महिला व बाल कल्याण विभागाकडे तक्रारी घेऊन येत आहेत. तिथे तपासणी केल्यानंतर केवायसी करताना पर्याय चुकल्याचे लक्षात आले आहे. ही चूक सुधारण्याची संधी शासनाने द्यावी, अशी मागणी लाडक्या बहिणी करीत आहेत.

Ahilyanagar Edition
Jan 22, 2026 Page No. 3
Powered by: erelego.com

# जिल्हा धुळे

**दै. लोकमत** **दि.२२ जानेवारी,२०२६**

लोकमत
जळगाव, गुरुवार, दि. २२ जानेवारी २०२६

# किराणा दुकान, टपऱ्यांवर कशा मिळतात सर्दी, डोकेदुखीच्या गोळ्या

## अन्न-औषध विभागाच्या अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष : डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय उपचार धोकादायक

लोकमत न्यूज नेटवर्क

**धुळे** : नियमानुसार डॉक्टरांच्या चिठ्ठीशिवाय मेडिकल व्यावसायिकांनी औषधी देणे गुन्हा आहे. तसेच, मेडिकल व्यावसायिकांनाच सर्व प्रकारच्या औषधांची विक्री करण्याची परवानगी आहे. असे असताना शहरासह ग्रामीण भागातील किराणा दुकानांवर व पान टपऱ्यांवर सहजपणे सर्दी-डोकेदुखीच्या गोळ्या सर्रास मिळत असल्याचा प्रकार समोर येत आहे. थेट किराणा दुकानात गोळ्या-औषधी मिळत असल्यामुळे धुळे विभागाचे अन्न व औषध प्रशासनाचे अधिकारी आहेत कुठे, असा प्रश्न संतप्त नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे.

विशेषत: ग्रामीण भागात रात्रीच्या वेळी डॉक्टर उपस्थित राहत नसल्यामुळे तेथील किराणा व्यावसायिक किंवा पानटपरी चालक सर्दी, ताप, अंगदुखी व जुलाबाच्या गोळ्या विक्री करत असतात. शहरातील मेडिकलवरून ठोक स्वरूपात गोळ्या-औषधी खरेदी करून त्या गावामध्ये दुपटीच्या दरात विकत असतात. विशेष म्हणजे यासाठी त्यांच्याकडे कुठलाही परवाना नसतो. शहरातील गल्लीबोळातील किराणा दुकाने, जनरल स्टोअर्सवर सर्दी, खोकला, डोकेदुखी व पोटदुखीच्या गोळ्यांची विक्री सर्रासपणे सुरू आहे. डॉक्टरच्या सल्ल्याशिवाय आणि फार्मासिस्ट



नसताना होणारी ही औषध विक्री नागरिकांच्या जिवावर बेतू शकते. मात्र, प्रशासनाला याचे सोयरसुतक नसल्याचे दिसून येत आहे.

दरम्यान, या प्रकाराबाबत अन्न व औषध विभागाच्या सहायक आयुक्त वर्षा महाजन यांच्यांशी संपर्क साधला असता, होऊ शकला नाही.

### अन्न व औषध प्रशासन नेमके करते काय ?

जिल्ह्यात विनापरवाना औषध विक्री रोखण्याची जबाबदारी 'अन्न व औषध प्रशासन' विभागाची आहे. मात्र, हा विभाग केवळ कागदी घोडे नाचवण्यात व्यस्त आहे. मनुष्यबळाची कमतरता असल्याच्या नावाखाली या विभागाच्या अधिकाऱ्यांचे कारवाईकडे सपशेल दुर्लक्ष झालेले दिसून येत आहे.

### कायद्यानुसार गुन्हा, पण बघतोय कोण ?

ड्रग्ज अँड कॉस्मेटिक्स ॲक्ट १९४० नुसार, कोणत्याही औषधाची विक्री करण्यासाठी परवाना आणि पात्र फार्मासिस्टची उपस्थिती अनिवार्य आहे. विनापरवाना औषध विक्री करणे हा अजामीनपात्र गुन्हा आहे. मात्र, धुळे जिल्ह्यात हा कायदा केवळ कागदावरच असल्याचे चित्र आहे. दुकानदाराकडून घेतलेली गोळी खाल्ल्यावर रिॲक्शन आल्यास किंवा विषबाधा झाल्यास त्याला जबाबदार कुणाला धरायचे ? असा प्रश्न यानिमित्ताने उपस्थित केला जात आहे.

### शहरातही वाढत चालले आहेत गैरप्रकार

पूर्वी केवळ दुर्गम भागात आरोग्य सुविधा नसल्याने हा प्रकार चालत असे. मात्र, आता तालुका मुख्यालयाचे शहर असलेल्या भागातही हे लोण पसरले आहे. शहरातील नवीन वस्त्या आणि मुख्य बाजारातील काही जनरल स्टोअर्समध्येही अँटीबायोटिक्स सारखी औषधे विनापरवाना विकली जात आहेत.

### बहुतांश दुकानांमध्ये औषधे निकृष्ट दर्जाची :

अनेकदा या दुकानांमध्ये मिळणारी औषधे ही 'बोगस' कंपन्यांची किंवा मुदत संपलेली असण्याची दाट शक्यता असते. कमी किमतीत मिळणारी ही औषधे आरोग्यासाठी फायद्यापेक्षा तोटाच जास्त करतात. योग्य साठवणूक नसल्याने रासायनिक घटक बदलतात.

### दुकान आणि टपऱ्यांमध्ये कुठून येतात या औषधी ?

औषधी विकण्यासाठी 'ड्रग लायसन्स'ची गरज असते. मात्र, काही ठोक विक्रेते जादा नफ्याच्या आमिषाने छुप्या मार्गाने या गोळ्या किराणा दुकानदारांना विक्री करतात. तसेच औषध कंपन्यांचे एमआरदेखील ओळखीच्या दुकानदारांना औषधी पुरवित असल्याचे विश्वसनीय सूत्रांनी सांगितले.

### नागरिकांचेही होत आहे आरोग्याकडे दुर्लक्ष :

किराणा दुकान व टपऱ्यांवर मिळणाऱ्या अशा औषधांमुळे नागरिकांच्या आरोग्यावरही विपरित परिणाम होण्याची शक्यता असते. बऱ्याचवेळी मुदत संपलेल्या गोळ्यांचींही विक्री होते. त्यामुळे अशा गोळ्या खरेदी करणाऱ्या नागरिकांचेही आरोग्याकडे दुर्लक्ष झाले असल्याचा सुर व्यक्त होत आहे.

लोकमत

मस्ट READ

# शिधापत्रिकांचे शुद्धीकरण, पावणेदोन लाख संशयास्पद लाभार्थींवर येणार गंडांतर

लोकमत न्यूज नेटवर्क

**धुळे** : राज्यातील सार्वजनिक वितरणप्रणालीमध्ये पारदर्शकता आणण्यासाठी आणि खऱ्या गरजूंना धान्याचा लाभ मिळावा, यासाठी राज्य सरकारने 'मिशन सुधार अभियान' हाती घेतले आहे. या मोहिमेचा मोठा फटका जिल्ह्यातील संशयास्पद लाभार्थींना बसणार असून, तब्बल १ लाख ८२ हजार २३२ कार्डधारक प्रशासनाच्या रडारवर आहेत. मृत, दुबार आणि बोगस लाभार्थींची नावे शिधापत्रिकेतून कायमची बाद करण्याची प्रक्रिया आता युद्धपातळीवर सुरू झाली आहे.

आधार क्रमांक आणि शिधापत्रिकांमधील माहितीच्या तांत्रिक तपासणीअंती सरकारने संशयास्पद लाभार्थींची यादी तयार केली आहे. ज्या शिधापत्रिकांमध्ये आधार क्रमांक जुळत नाहीत किंवा जे लाभार्थी गेल्या अनेक महिन्यांपासून धान्याचा लाभ घेत नाहीत, अशा लाभार्थींचे शुद्धीकरण केले जात आहे.

जिल्ह्यात अशा १ लाख ८२ हजार २३२ संशयास्पद लाभार्थींची नावे समोर आली असून, त्यांची आता प्रत्यक्ष पडताळणी केली जात आहे. पुरवठा निरीक्षकांनी घरोघरी जाऊन केलेल्या तपासणीचा अहवाल सादर केल्यानंतर, त्यावर अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार तहसीलदारांना देण्यात आले आहेत.




### तालुकानिहाय लाभार्थी

| | |
|---|---|
| धुळे | ५८,८४७ |
| साक्री | ५३,२६२ |
| शिंदखेडा | ३८,६२५ |
| शिरपूर | ३१,४९८ |
| एकूण | १,८२,२३२ |

> खऱ्या गरजू आणि पात्र लाभार्थींना हक्काचे धान्य मिळावे, यासाठी हे शुद्धीकरण अभियान राबविले जात आहे. मृत किंवा अपात्र लाभार्थींची नावे नागरिकांनी स्वतःहून कमी करावीत, अन्यथा तपासणीत दोषी आढळल्यास नियमानुसार कारवाई केली जाईल
>
> **महादेव खेडकर,** जिल्हा पुरवठा अधिकारी

### शिधापत्रिकांचे शुद्धीकरण अभियान

राज्यातील सार्वजनिक वितरण प्रणालीमध्ये पारदर्शकता आणण्यासाठी सरकारने 'मिशन सुधार' हाती घेतले आहे. या अभियानाचा मुख्य उद्देश रेशन कार्डावरील बोगस आणि अपात्र नावे काढून टाकणे हा आहे. यामुळे रेशनिंग व्यवस्थेतील गळती थांबून सरकारचा मोठा महसूल वाचणार आहे.

### घरोघरी जाऊन तपासणी सुरू

केवळ कागदपत्रांवर विसंबून न राहता, पुरवठा विभागाचे निरीक्षक आता थेट लाभार्थ्यांच्या दारापर्यंत पोहोचत आहेत. कुटुंबातील सदस्यांची प्रत्यक्ष उपस्थिती, त्यांचा पत्ता आणि एकूण स्थितीची जागेवरच पडताळणी केली जात आहे.

### मृत, संशयास्पद लाभार्थींच्या नावावर फुली

जे सदस्य मृत झाले आहेत पण त्यांचे नाव अजूनही कार्डवर आहे, ज्यांचे नाव दोन वेगवेगळ्या कार्डवर आहे (दुबार) किंवा जे संशयास्पदरीत्या लाभ घेत आहेत, अशांची नावे शोधून त्यावर आता कायमची फुली मारली जात आहे.

### यंत्रणेतील माहिती, आधार क्रमांक आधार

या मोहिमेचा मुख्य कणा 'आधार' कार्ड आहे. रेशन कार्डाला लिंक असलेल्या आधार क्रमांकामुळे एकाच व्यक्तीचे नाव दोन ठिकाणी असल्यास ते सॉफ्टवेअरच्या माध्यमातून तत्काळ पकडले जात आहे. आधुनिक तंत्रज्ञानामुळे बोगसगिरी रोखणे सोपे झाले आहे.

### धान्य उचल, वार्षिक उत्पन्नाची पडताळणी

केवळ नावांची पडताळणी न करता, संबंधित कुटुंब नियमित धान्य उचलते का? आणि त्यांचे वार्षिक उत्पन्न रेशनिंगच्या निकषात बसते का? याचीही कसून चौकशी केली जात आहे. उत्पन्नाची मर्यादा ओलांडलेल्या कुटुंबांचे धान्य बंद केले जाणार आहे.

लोकमत

# शिरपूर-चोपडा महामार्गावर काळाचा घाला

## अपघातात निमझरीतील पती-पत्नीचा मृत्यू

लोकमत न्यूज नेटवर्क

**थाळनेर :** शिरपूर-चोपडा महामार्गावरील सावेर फाट्याजवळ कार आणि दुचाकीच्या भीषण अपघातात निमझरी (ता. शिरपूर) येथील एका शेतकरी दाम्पत्याचा दुर्दैवी अंत झाला. या अपघातात जयदेव गोकुळ गुजर यांचा जागीच मृत्यू झाला, तर त्यांच्या पत्नी प्रतिभा गोकुळ गुजर यांनी नाशिक येथे उपचारादरम्यान अखेरचा श्वास घेतला. या घटनेमुळे निमझरी गावासह संपूर्ण तालुक्यात शोककळा पसरली आहे. याप्रकरणी शिरपूर तालुका पोलीस स्टेशनला अपघाताची नोंद झाली आहे.



जयदेव गुजर



प्रतिभा गुजर

जयदेव गुजर आणि प्रतिभा गुजर हे पती-पत्नी मंगळवारी सायंकाळच्या सुमारास आपल्या दुचाकीने (क्र. एमएच १८ बीबी ३१५७) चोपड्याकडे जात होते. सावेर फाट्यावर पेट्रोल पंपाजवळ समोरून येणाऱ्या कारने (क्र. एमएच १९ ईपी २८६९) त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली.

**या भीषण अपघातातील कारमधील प्रवासी सुदैवाने सुरक्षित आहेत.**

## मदतीसाठी धावले ग्रामस्थ जयदेव यांचा जागीच मृत्यू

अपघातानंतर मदतीसाठी ग्रामस्थ धावले. परंतू अपघातात जयदेव गुजर यांचा जागीच मृत्यू झाला. परिसरातील ग्रामस्थ छगन गोरख पाटील व प्रदीप वारुळे यांनी तातडीने गंभीर जखमी असलेल्या प्रतिभा गुजर यांना तात्काळ शिरपूर उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. मात्र, प्रकृती अधिक खालावल्याने त्यांना पुढील उपचारासाठी नाशिक येथे हलवण्यात आले. दुर्दैवाने, तिथे उपचार सुरू असतानाच त्यांची प्राणज्योत मालवली. अपघाताची नोंद करुन पोलीस तपास सुरु आहे.

दै. लोकमत

दि.२२ जानेवारी,२०२६

# कामगारांचा १२ रोजी देशव्यापी संप

## धुळे येथील सभेत वैद्यकीय व विक्री प्रतिनिधी संघटनेने व्यक्त केला निर्धार

**प्रतिनिधी | धुळे**

कामगारांच्या न्याय्य हक्कासाठी १२ फेब्रुवारी रोजी देशव्यापी संप पुकारला आहे. तो यशस्वी करण्याचा निर्धार महाराष्ट्र राज्य वैद्यकीय आणि विक्री प्रतिनिधी संघटनेच्या धुळे जिल्हा वार्षिक बैठकीत व्यक्त करण्यात आला.

महाराष्ट्र राज्य वैद्यकीय आणि विक्री प्रतिनिधी संघटनेची वार्षिक सर्वसाधारण सभा आयएमए हॉलमध्ये झाली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी योगेश माळी होते. व्यासपीठावर इंडियन मेडिकल असोसिएशन (इमा) संघटनेचे सचिव डॉ. ठाकरे, केमिस्ट आणि ड्रगिस्ट असोसिएशनचे भगत चौधरी, आयटकचे पोपटराव चौधरी,



बोलताना पोपटराव चौधरी.

सीआयटीयूचे एल. आर. राव, रितेश शाह, महाराष्ट्र राज्य वैद्यकीय आणि विक्री प्रतिनिधी संघटनेचे सचिन पारोळेकर आदी उपस्थित होते. त्यांनी कामगार संघटना व त्यापुढील आव्हाने व त्यासाठी करावयाचा संघर्षावर मार्गदर्शन केले. कामगारांच्या न्याय्य हक्कासाठी १२ फेब्रुवारी २०२६ रोजी देशव्यापी संप करण्याचा ठराव मंजूर केला. प्रास्ताविक राजेश कुळकर्णी व आभार राहुल पाटील यांनी मानले.

**नुतन पदाधिकाऱ्यांची झाली निवड**

बैठकीत संघटनेच्या नूतन पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. त्यात सेक्रेटरीपदी अंकित सूर्यवंशी यांची तर खजिनदारपदी राजेश कुळकर्णी यांची निवड करण्यात आली. या पदाधिकाऱ्यांचा यावेळी गौरव करण्यात आला आहे.

# महामार्गावर सुविधा माहिती फलकांचा अभाव प्रवाशांसाठी डोकेदुखी

**धुळे । प्रतिनिधी ।**

धुळे–सोलापूर महामार्ग हा महाराष्ट्रातील उत्तर व दक्षिण भागाला जोडणारा एक अत्यंत महत्त्वाचा रस्ता मार्ग म्हणून ओळखला जातो. या महामार्गामुळे खान्देश, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्र यांच्यातील दळणवळण अधिक सुलभ झाले असून व्यापारी, औद्योगिक, कृषी तसेच प्रवासी वाहतुकीच्या दृष्टीने हा मार्ग मोठ्या प्रमाणावर उपयोगी ठरत आहे. मात्र, एवढे महत्त्व असूनही या महामार्गावर सुविधा माहिती फलकांची तीव्र कमतरता असल्याने प्रवाशांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे.

धुळे जिल्ह्यातील धुळे शहरापासून सुरू होणारा हा महामार्ग नंदुरबार, जळगाव परिसराशी अप्रत्यक्ष संपर्क साधतो. पुढे हा मार्ग अहमदनगर, बीड, उस्मानाबाद (धाराशिव) जिल्ह्याच्या सीमावर्ती भागातून सोलापूरकडे जातो. सोलापूर हे वस्त्रोद्योग, साखर उद्योग आणि व्यापारी केंद्र असल्याने या मार्गावरून मोठ्या प्रमाणावर मालवाहतूक केली जाते. परिणामी, जड व हलकी वाहने,



खासगी वाहतूक तसेच प्रवासी वाहनांची या महामार्गावर सतत वर्दळ पाहायला मिळते.

**प्रवासी आणि कृषि माल वाहतूक**

या महामार्गामुळे धुळे, शिरपूर, साक्री परिसरातील शेतकऱ्यांना आपला शेतमाल बाजारपेठेत पोहोचविणे अधिक सुलभ झाले आहे. कापूस, केळी, कांदा, मका, डाळी यांसारख्या कृषी उत्पादनांची वाहतूक या मार्गावरून मोठ्या प्रमाणावर केली जाते. तसेच सोलापूर येथील कापड उद्योग, बीडी उद्योग आणि विविध औद्योगिक वसाहतींसाठी उत्तर महाराष्ट्राशी थेट संपर्क साधण्यास हा महामार्ग उपयुक्त ठरतो. त्यामुळे या मार्गाचे आर्थिक महत्त्व दिवसेंदिवस वाढत आहे. महामार्गाचे टप्प्याटप्प्याने रुंदीकरण, मजबुतीकरण व दुरुस्तीचे काम सुरू असून काही ठिकाणी चौपदरीकरण व सेवा रस्त्यांची सुविधा प्रस्तावित आहे. अपघातांचे प्रमाण कमी व्हावे यासाठी सिग्नल, दुभाजक, रस्त्याच्या कडेला संरक्षक कठडे आणि दिशादर्शक फलक बसविण्यात येत आहेत. मात्र, मूलभूत सुविधा दर्शविणारे माहिती फलक अपुरे असल्याने महामार्गावरील सोयी-सुविधांचा लाभ प्रवाशांना पूर्णपणे मिळत नसल्याचे चित्र आहे.

**माहिती, सूचना फलक पुरेसे नाहीत**

धुळे-सोलापूर महामार्गासह राज्यातील अनेक प्रमुख महामार्गावर इंधन पंप, शौचालये, विश्रांतीगृहे, पिण्याच्या पाण्याची सोय, रुग्णालये, ट्रॉमा केअर केंद्रे, पोलीस मदत केंद्रे, हॉटेल्स तसेच आपत्कालीन सेवांची माहिती देणारे फलक आवश्यक प्रमाणात नसल्याच्या तक्रारी वाढत आहेत.

**आपत्कालीन स्थितीत मोठा प्रश्न**

आपत्कालीन परिस्थितीत तर सुविधा माहिती फलकांचा अभाव अधिकच गंभीर ठरतो. अपघात झाल्यास जवळचे रुग्णालय, ॲम्ब्युलन्स सेवा किंवा पोलीस ठाण्याची माहिती तत्काळ मिळणे अत्यंत आवश्यक असते. परंतु फलक नसल्याने मदत मिळण्यास विलंब होतो. यामुळे जीवितहानीचा धोका वाढत असल्याची भावना प्रवासी व्यक्त करीत आहेत. रात्रीच्या वेळी किंवा अनोळखी भागातून प्रवास करणाऱ्यांसाठी ही समस्या अधिक त्रासदायक ठरते.

सकाळ

# शिक्षण विभागाचे कामकाज ठप्प होण्याची भीती

## अधिकाऱ्यांचा २७ पासून सामूहिक रजेचा इशारा

**सकाळ वृत्तसेवा**

धुळे, ता. २१ : शालेय शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांवर होणारी कारवाई आणि अटक सत्राविरोधात राज्यातील राजपत्रित अधिकाऱ्यांनी आता आक्रमक पवित्रा घेतला आहे. आपल्या न्याय्य मागण्यांकडे शासनाने वारंवार दुर्लक्ष केल्याने २७ जानेवारीपासून राज्यातील सर्व शिक्षण अधिकारी सामूहिक रजेवर जाणार असल्याचा इशारा अखिल महाराष्ट्र शिक्षण सेवा राजपत्रित अधिकारी संघाने सरकारला निवेदनातून दिला आहे.

गेल्या काही दिवसांपासून विभागातील अधिकाऱ्यांची प्रतिमा मलिन केली जात असून, कोणतीही ठोस चौकशी न करता थेट अटक केली जात असल्याचा आरोप संघाने केला आहे. यासंदर्भात ३० डिसेंबर आणि १ जानेवारीला सरकारला निवेदने देऊनही कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने अधिकाऱ्यांमधील अस्वस्थता वाढली आहे. प्रशासकीय कामकाजात अनियमितता असल्यास महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियमानुसार विभागीय चौकशी होणे आवश्यक आहे. मात्र, नैसर्गिक न्यायतत्त्वाचा विचार न करता निलंबन व अटकेची कारवाई केली जात आहे. जोपर्यंत एसआयटी चौकशीचा अंतिम अहवाल प्राप्त होऊन वेतन काढण्याबाबत स्पष्टता येत नाही, तोपर्यंत राज्यातील कोणताही अधिकारी खासगी अनुदानित शाळांच्या वेतन देयकांवर किंवा कोणत्याही आर्थिक बाबींवर स्वाक्षरी करणार नाही, अशी भूमिका घेण्यात आली आहे. शिक्षण विभागाने मांडलेल्या प्रमुख मागण्यांमध्ये बेकायदेशीर अटक सत्र थांबवून विभागाचे पालकत्व स्वीकारणे, नियुक्ती प्राधिकाऱ्यांच्या लेखी परवानगीशिवाय अटक न करणे, पोलिसांकडे प्राप्त तक्रारी शिक्षण विभागाकडे वर्ग करणे, निलंबित अधिकाऱ्यांना तत्काळ पदस्थापना देणे आणि कार्यालयीन वेळेतच दोन तासांच्या मर्यादेत व्हिडिओ कॉन्फरन्स घेणे या बाबींचा समावेश आहे. सरकारने तातडीने चर्चा करून लेखी आश्वासन न दिल्यास २७ जानेवारीपासून शिक्षण विभागाचे कामकाज पूर्णपणे ठप्प करण्याचा इशारा देण्यात आला आहे. निवेदनावर संघाचे अध्यक्ष शेषराव बडे, कार्याध्यक्ष रवींद्र वाणी, सरचिटणीस सरोज जगताप, कोशाध्यक्ष डॉ. ज्योती परिहार, कार्यालयीन सचिव समरजित पाटील आदींच्या सह्या आहेत.

सकाळ

# धुळे जिल्ह्यासाठी १०८ रुग्णवाहिका ठरतेय संजीवनी!

## जिल्ह्यात पावणेदोन लाख रुग्णांना वेळेवर उपचार; १८०८ बालकांचा रुग्णवाहिकेत जन्म

■ सकाळ वृत्तसेवा

**धुळे, ता. २१ : जिल्ह्यातील आपत्कालीन आरोग्य सेवेचा कणा मानली जाणारी '१०८' रुग्णवाहिका सेवा खऱ्या अर्थाने ग्रामीण आणि दुर्गम भागातील नागरिकांसाठी देवदूत ठरत आहे. २०१४ पासून सुरू झालेल्या या योजनेने जिल्ह्यात आतापर्यंत एक लाख ८० हजार ८०६ रुग्णांना प्रत्यक्ष सेवा देऊन जीवदान दिले आहे. विशेष म्हणजे दवाखान्यात जाईपर्यंत वेळ न उरल्याने एक हजार ८०८ मातांची रुग्णवाहिकेतच सुरक्षित प्रसूती करण्यात वैद्यकीय कर्मचाऱ्यांना यश आले. रस्ते अपघात, हृदयविकार, विषबाधा किंवा जळीत प्रकरणे अशा जीवघेण्या प्रसंगांत ही सेवा लाखो कुटुंबांसाठी आधारवड ठरली आहे.**

रुग्णवाहिकेतील सेवा केवळ ने-आण करण्यापुरती मर्यादित नसून ती एक "चालते-फिरते रुग्णालय" म्हणून ओळखली जात आहे. प्राप्त आकडेवारीनुसार रस्ते अपघातातील १७ हजार २७७ जखमींना या सेवेमुळे वेळेत उपचार मिळाले. हृदयविकाराचा झटका आलेल्या एक हजार २१ रुग्णांना "गोल्डन अवर"मध्ये औषधोपचार मिळाल्याने त्यांचे प्राण वाचले. तसेच, विषबाधा झालेल्या सहा हजार २५९ व्यक्तींना आणि ६६९ जळीत रुग्णांना या रुग्णवाहिकेतील अत्यावश्यक उपकरणांमुळे जीवदान मिळाले आहे. इतर विविध प्रकारच्या एक लाख ८ हजार ४९६ आपत्कालीन वैद्यकीय प्रकरणांमध्ये १०८ रुग्णवाहिका वेळेवर धावून आली आहे. रुग्णवाहिकेत असलेले प्रशिक्षित कर्मचारी आणि अत्यावश्यक औषधांचा साठा यामुळे रुग्णांना दवाखान्यात पोहोचण्यापूर्वीच प्राथमिक उपचार मिळणे सुलभ झाले आहे.



### यंत्रणेपुढील मोठी आव्हाने

■ जिल्ह्यात सध्या १८ रुग्णवाहिका २४ तास अहोरात्र सेवा देत असल्या तरी वाढत्या लोकसंख्येनुसार ही संख्या अपुरी पडत असल्याचे चित्र आहे. दुर्गम भागातील रस्त्यांची दुरवस्था आणि काही वेळा कॉल सेंटरशी संपर्क झाल्यानंतर रुग्णवाहिका पोहोचण्यास होणारा विलंब यांसारख्या तांत्रिक अडचणींवर मात करण्याचे आव्हान प्रशासनासमोर आहे. जिल्ह्याची भौगोलिक परिस्थिती लक्षात घेता रुग्णवाहिकांची संख्या वाढवण्याची मागणी नागरिकांकडून सातत्याने होत आहे. जिल्हा आरोग्य विभागाने या रुग्णवाहिकांच्या देखभालीकडे आणि मनुष्यबळाकडे विशेष लक्ष दिल्यास ही सेवा भविष्यात अधिक प्रभावी ठरेल.

### प्रसूतीसाठी ठरली वरदान

जिल्ह्यात १०८ क्रमांकाच्या रुग्णवाहिका सेवेने प्रसूती सुविधेच्या बाबतीत समाधानकारक कामगिरी केली आहे. गेल्या दहा वर्षांच्या काळात ४८ हजार ४३८ गर्भवती मातांना या रुग्णवाहिकेतून सेवा पुरवण्यात आली. मात्र अनेकदा दुर्गम भागातून रुग्णालयाकडे येताना प्रसूती कळा तीव्र झाल्याने रुग्णालयात पोहोचणे अशक्य होते. अशा एक हजार ८०८ आणीबाणीच्या प्रसंगांत रुग्णवाहिकेतील प्रशिक्षित डॉक्टरांनी गाडीतच यशस्वी प्रसूती पार पाडली. यामध्ये प्रामुख्याने साक्री आणि शिरपूर यांसारख्या अतिदुर्गम तालुक्यातील मातांचा समावेश अधिक आहे. प्रसूतीनंतर बाळ आणि मातेची योग्य निगा राखून त्यांना पुढील उपचारांसाठी सुरक्षितपणे रुग्णालयात हलविण्याचे कामही या यंत्रणेने बजावले आहे. ग्रामीण भागातील महिलांसाठी ही सेवा खऱ्या अर्थाने जीवनवाहिनी ठरली आहे.

> "दुर्गम भागातील रस्ते आणि वेळेचे आव्हान असतानाही १८ रुग्णवाहिकांच्या माध्यमातून प्रत्येक रुग्णापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करत आहोत. आतापर्यंत एक हजार ८०८ बालकांचा जन्म रुग्णवाहिकेत सुखरूप होणे हे या सेवेचे यश आहे. जिल्ह्यातील शेवटच्या घटकापर्यंत ही आपत्कालीन आरोग्य सेवा पोहोचवण्यासाठी कटिबद्ध आहोत.
>
> **- जयेश पाटील**, उपजिल्हा व्यवस्थापक, महाराष्ट्र वैद्यकीय आपत्कालीन सेवा

दै. देशोन्नती

दि.२२ जानेवारी,२०२६

देशोन्नती

# लाचखोर सहाय्यक रचनाकारासह तिघे एसीबीच्या जाळयात

देशोन्नती वृत्तसंकलन

धुळे - औद्योगिक प्रयोजनासाठी जमीन मंजूर करण्यासाठी तडजोडीअंती ३० हजारांची लाच स्वीकारताना धुळ्यातील नगर रचना विभागातीलसहा. रचनाकार(वर्ग २), सहा. आरेखक (वर्ग ३) व धुळे जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल सहाय्यकाला धुळे येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने रंगेहाथ पकडले आहे.

हे तिघे लाच घेतांना पकडले गेल्याने चांगलीच खळबळ माजली आहे. लाच प्रकरणी धुळे नगररचना वि सहा. रचनाकार कल्पेश चवरे व सहाय्यक आरेखक किशोर भोईतसेच जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल सहाय्यक आनंदा हटकर यांना लाच प्रकरणी अटक करण्यात आली आहे.

तक्रारदाराला औद्योगिक प्रयोजनसाठी दहा हजार चौरस मीटर शेतजमीन मंजूर करायची असल्याने ३१ ऑक्टोबर २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात ऑनलाईन प्रकरण सादर करण्यात आले तसेच ऑफलाईन कागदपत्रेही सादर करण्यात आली होती. धुळे जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल सहाय्यक आनंदा हटकर यांनी देखील बिनशेती आदेश देण्याच्या मोबदल्यात २० हजारांची लाचेची मागणी केल्यानंतर १० हजार रुपये देण्याचे ठरले होते तर नगर रचना विभागातील दोन्ही लाचखोरांनी ५० हजार रुपये मागितल्याने ३० हजार रुपये देण्यावर तडजोड झाली व धुळे एसीबीकडे तक्रार नोंदवण्यात आली. एसीबीने लाच पडताळणी केल्यानंतर दि. २१ जानेवारी रोजी सायंकाळी सापळा रचला कल्पेश चवरे यास लाच स्वीकारताच अटक करण्यात आली व नंतर दोन्ही लाचखोरानाही पकडण्यात आले.

ही धाडसी कारवाई धुळे लाच लुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलिस उपअधीक्षक सचिन साळुंखे यांच्या नेतृत्वात पोलिस निरीक्षक यशवंत बोरसे व सहकाऱ्यांनी केली. लाच प्रकरणी धुळे नगररचना विभागातील सहा. रचनाकार कल्पेश चौरे व सहाय्यकआरेखक किशोर भोईतसेच जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल सहाय्यक आनंदा हटकर हे जाळयात आल्याने कर्मचाऱ्यांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले होते. या संदर्भात परिसरात दबक्या आवाजात विविध चर्चांना चांगलेच उधाण आले होते.

**लाचखोर हादरले: धुळे एसीबीची नववर्षात पाचवी कारवाई**

धुळे जिल्ह्यात लाचखोरांविरोधात धुळे एसीबीने मोहिम तीव्र केल्याने लाचखोरांनी धसका घेतला आहे. नववर्षाच्या सुरुवातीला तब्बल चार बड्या कारवाया एसीबीने केल्यानंतर आता धुळे जिल्हाधिकारी कार्यालय तसेच नगररचना विभागातील साखळीच कारवाईनिमित्ताने समोर आल्याने खळबळ उडाली आहे. या कारवाईचे वृत्त हे परिसरात जावुन धडकताच घटनास्थळी बघ्यांनी एकच गर्दी केली होती. लाचखोर हे जाळयात आल्याने त्यांना एसीबीने जन्माची अद्दल घडविल्याची चर्चा परिसरात रंगत होती. यावेळी लाचखोर यांचे सात गेले आणि पाचच राहिले होते. या घटने संदर्भात पोलीस ठाण्यात रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याचे काम हे जारी असल्याने अधिक माहिती मात्र मिळु शकली नाही.

Dhule Edition
Jan 22, 2026 Page No. 1
Powered by: erelego.com

# जिल्हा जळगाव

लोकमत

मस्ट READ

# मृत व्यक्ती जिवंत दाखवून शेतजमीन लाटली

## यावलमध्ये ३ हेक्टरहून अधिक जमिनीचा बनावट दस्तऐवज घोटाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

**यावल :** मृत व्यक्तीच्या नावाने बनावट कागदपत्रे तयार करून त्याला जिवंत असल्याचे भासवत तब्बल ३ हेक्टर १९ आर शेतजमिनीची परस्पर विक्री केल्याचा धक्कादायक प्रकार यावल तालुक्यात उघडकीस आला आहे. या प्रकरणी जालन्याच्या एका महिलेने दिलेल्या तक्रारीवरून अंबरनाथ, नवी मुंबई, वसई आणि यावल येथील एकूण १२ जणांविरुद्ध यावल पोलिस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा मंगळवारी रात्री दाखल झाला आहे.

फिर्यादी कांचन संजय खत्री (वय ५२, रा. जालना) यांचे काका गेलाराम भुरोमल यांच्या नावे बोरावल खुर्द शिवारात गट क्रमांक १९३ मध्ये शेतजमीन होती. गेलाराम भुरोमल यांचे १ जानेवारी १९९५ रोजी निधन झाले होते. मात्र, आरोपींनी मृत व्यक्तीच्या नावाचा गैरवापर करत हा घोटाळा रचल्याचे तक्रारीत नमूद आहे. तक्रारीनुसार, आरोपी अजित तुळशीराम भंडारी (रा. अंबरनाथ) याने श्याम मनोहर मुंदडा (रा. वसई) याला बनावट 'गेलाराम' म्हणून दुय्यम निबंधक कार्यालयात उभे केले. त्यासाठी बनावट आधार कार्ड व पॅनकार्ड तयार करून सदर शेतजमीन अवघ्या ११ लाख १५ हजार रुपयांत विक्री केल्याचा आरोप आहे.

## बनावट खरेदीखताच्या आधारावर जमिनीचे केले तुकडे

बनावट खरेदीखताच्या आधारे आरोपींनी जमिनीचे दोन तुकडे केले. त्यापैकी १ हेक्टर ४५ आर जमीन सकूबाई दशरथ धनगर हिच्या नावावर, तर उर्वरित १ हेक्टर ७४ आर जमीन प्रशांत वसंतराव पाटील याने स्वतःच्या नावावर करून घेतली. या व्यवहारात नवी मुंबई व विरार येथील काही आरोपींनी खोटे साक्षीदार म्हणून स्वाक्षऱ्या केल्याचा आरोप आहे. स्थानिक स्तरावरील काही व्यक्तींनी जमीन मालकीची खातरजमा न करता संगनमताने भूमिका बजावल्याचे तक्रारीत नमूद आहे.

## यावल पोलिस ठाण्यात बारा जणांवर गुन्हा दाखल

या प्रकरणी यावल पोलिस ठाण्यात अजित भंडारी (रा. ठाणे), श्याम मुंदडा (रा. पालघर), सचिन राऊत (रा. नवी मुंबई), उमेश कदम (वय ४१), सकूबाई धनगर, शांताराम धनगर, रवींद्र धनगर, ईश्वर पाटील, दिलीप धनगर (सर्व रा. बोरावल खुर्द, ता. यावल), प्रशांत पाटील, किशोर माळी व शेख युसूफ शेख फारुख (तिघे रा. यावल) अशा १२ जणांविरुद्ध फसवणुकीसह संबंधित कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिस निरीक्षक रंगनाथ धारबळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक अनिल महाजन हे या प्रकरणाचा सखोल तपास करीत असून, बनावट कागदपत्रे, आर्थिक व्यवहार आणि इतर संबंधित बाबींची चौकशी सुरू आहे.

लोकमत

# विविध योजनांचा लाभ मिळत नसल्याची तक्रार

लोकमत न्यूज नेटवर्क

**अमळनेर :** केंद्र व राज्य सरकारच्या घरकूल योजनेसह विविध सामाजिक व कृषी योजनांचा लाभ लाभार्थ्यांना वेळेत मिळत नसल्याबाबत क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या वतीने अमळनेर प्रांताधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.

केंद्र व राज्य शासनांतर्गत राबविण्यात येणाऱ्या घरकूल योजना तसेच विधवा, परित्यक्ता, ज्येष्ठ महिला व पुरुषांसाठी सुरू असलेल्या संजय गांधी योजना, श्रावण बाळ योजना व इंदिरा गांधी योजना यांचा लाभ अनेक पात्र लाभार्थ्यांना मिळालेला नाही. तसेच शेतकऱ्यांना झालेल्या पीक नुकसानीबाबत शासनाने पीक विमा व नैसर्गिक आपत्ती अनुदान वेळेत का दिले नाही, असा सवालही निवेदनात उपस्थित करण्यात आला आहे.

**१४८**

गोठाशेडची कामे अमळनेर तालुक्यात सुरु आहेत.

महात्मा गांधी रोजगार हमी योजनेंतर्गत सिंचन विहिरी (२७३), गोठा शेड (१४८), शोषखड्डे (२७) व घरकूल (३८१७) या कामांसाठी कुशल व अकुशल मजुरीचे अनुदान संबंधित लाभार्थ्यांना पूर्णतः व वेळेत मिळालेले नाही.



## योजनांचा लाभ नसल्याने उपासमारीची वेळ

संजय गांधी योजना, श्रावण बाळ योजना व इंदिरा गांधी योजनेच्या हजारो लाभार्थ्यांना डीबीटी प्रणालीच्या नावाखाली लाभापासून वंचित ठेवण्यात आले असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.

**हे लाभार्थी हे बहुतांशी शेतमजूर वर्गातील असून, लाभ न मिळाल्याने त्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न गंभीर बनला आहे. त्यामुळे सर्व पात्र लाभार्थ्यांना तत्काळ योजनांचा लाभ देण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.**

निवेदनावर जिल्हाध्यक्ष शरद पाटील, उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष ईश्वर पाटील, उपाध्यक्ष दिलीप पाटील यांच्यासह संघटनेच्या पदाधिकाऱ्यांच्या सह्या आहेत.

लोकमत

# जळगाव - इंदूर विमानसेवा लवकरच होणार सुरू

## 'फ्लाय ९१' कंपनीकडून हालचालींना वेग

लोकमत न्यूज नेटवर्क

**जळगाव :** मुंबई, पुणे, गोवा आणि हैदराबाद या शहरांनंतर आता जळगाव लवकरच विमानसेवेद्वारे इंदूरशी जोडले जाणार आहे. 'फ्लाय ९१' या विमान कंपनीने या मार्गावर सेवा सुरू करण्यासाठी हालचाली सुरू केल्या आहेत. लवकरच याचे अधिकृत नियोजन पूर्ण होणार आहे.

छत्रपती संभाजीनगर पर्यटन विकास संस्थेच्या नागरी विमान वाहतूक समिती आणि जनसंपर्क समितीचे अध्यक्ष सुनील कोठारी यांनी यासंदर्भात माहिती दिली. जळगाव ते इंदूर या विमानफेरीचे नियोजन अंतिम टप्प्यात आहे.

**येत्या काही दिवसांत या सेवेचे वेळापत्रक आणि तिकीट दरांची घोषणा होण्याची शक्यता आहे.**

## नाइट लॅण्डिंगचा फायदा

जळगाव विमानतळावर अलीकडेच नाइट लॅण्डिंगसह इतर अत्याधुनिक सुविधा उपलब्ध झाल्या आहेत. या पायाभूत सुविधांमुळे नवीन विमान कंपन्यांना जळगावातून सेवा विस्तारणे सोपे झाले आहे. याच पार्श्वभूमीवर इंदूरची विमानसेवा विनाविलंब सुरू होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

## विकासाला चालना

सध्या जळगावमधून मुंबई, पुणे यासारख्या प्रमुख शहरांसाठी विमानसेवा सुरू असल्याने प्रवाशांचा वेळ वाचत आहे. आता इंदूरशी थेट कनेक्टिव्हिटी मिळाल्यास खान्देश आणि मध्य प्रदेशातील व्यावसायिक संबंध अधिक दृढ होतील. शैक्षणिक, वैद्यकीय आणि व्यापार या तिन्ही दृष्टींने ही सेवा जळगावकरांसाठी मोलाची ठरणार आहे.

लोकमत

# शिधापत्रिकांचे शुद्धीकरण; १० हजार संशयास्पद लाभार्थ्यांची नावे जाणार!

## 'मिशन सुधार अभियान' मध्ये आधार क्रमांक आणि तांत्रिक माहितीच्या आधारे पडताळणी

लोकमत न्यूज नेटवर्क

**जळगाव :** शासनाकडून 'मिशन सुधार अभियान' हाती घेण्यात आले आहे. या अभियानांतर्गत आता शिधापत्रिकांचे शुद्धीकरण करण्यात येत असून, जिल्ह्यातील सुमारे १० हजार संशयास्पद लाभार्थ्यांची नावे यादीतून वगळण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. आधार क्रमांक आणि तांत्रिक माहितीच्या आधारे ही पडताळणी केली जात असून, यामुळे खऱ्या गरजूंना धान्याचा लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

अंत्योदय, प्राधान्य कुटुंबासह विविध गटातील शिधापत्रिकाधारकांना राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेंतर्गत धान्याचा लाभ दिला जात आहे. परंतु, बऱ्याच ठिकाणी शिधापत्रिकेचा गैरवापर होत असल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे या गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी मयत, दुबार आणि स्थलांतरित लाभार्थ्यांची पडताळणी केली जात आहे. पडताळणीअंती शिक्कामोर्तब झाल्यानंतर संबंधितांचे रेशन कार्ड रद्द ठरविण्यात येत आहे.




### .. यांच्या नावावर फुली

निधन झाल्यानंतरही नाव कमी न केलेल्या, एकापेक्षा जास्त शिधापत्रिकेत नाव असलेल्या आणि माहितीमध्ये तफावत असलेले किंवा बोगस कागदपत्रे असलेल्यांची रेशन कार्ड रद्द करण्यात येत आहेत.

### अनेकांवर गंडांतर

जिल्ह्यात सुमारे १० हजार लाभार्थी संशयास्पद आढळले आहेत. या सर्वांची पडताळणी सुरू असून, निकषात न बसणाऱ्यांची नावे कायमची वगळली जाणार आहेत. यामुळे सरकारी धान्याची होणारी चोरी थांबणार आहे.

### घरोघरी तपासणी सुरू

संशयास्पद नावांची यादी घेऊन पुरवठा निरीक्षक आणि कर्मचारी हे थेट लाभार्थ्यांच्या घरी जाऊन पाहणी करीत आहेत. सदस्यांची संख्या व कागदपत्रांची खातरजमा केली जात आहे.

### आधार क्रमांकाचा आधार

हे शुद्धीकरण पूर्णपणे तंत्रज्ञानावर आधारित आहे. शिधापत्रिकेला लिंक असलेला आधार क्रमांक आणि 'ई-पॉस' (E-PoS) मशिनमधील डेटा यांचा वापर करून ही संशयास्पद यादी तयार करण्यात आली आहे. 'वन नेशन वन रेशन' अंतर्गत डेटा मॅचिंग केल्यामुळे दुबार नावे सहज समोर येत आहेत.

### अधिकार तहसीलदारांना

पुरवठा निरीक्षकांनी घरोघरी जाऊन अहवाल सादर केल्यानंतर, संबंधित नाव वगळायचे की नाही, याचे अंतिम अधिकार तहसीलदारांना देण्यात आले आहेत. पात्र व्यक्तीवर अन्याय होऊ नये, यासाठी तहसीलदार स्तरावर या अहवालांची छाननी केली जाईल.

> **नियमित धान्य वितरणातील पारदर्शकता वाढविण्यासाठी नागरिकांनी तपासणीसाठी येणाऱ्या कर्मचाऱ्यांना योग्य ती माहिती देऊन सहकार्य करावे.**
>
> **- रूपेश बिजेवार,** सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी

### अपात्र लाभार्थी असे...

| तालुका | रद्द कार्ड | तालुका | रद्द कार्ड |
|---|---|---|---|
| अमळनेर | ५६३ | एरंडोल | २६४ |
| भडगाव | १७६ | जळगाव | २,५१७ |
| भुसावळ | ४८४ | जामनेर | ९९८ |
| बोदवड | ९१ | मुक्ताईनगर | ४५४ |
| चाळीसगाव | ६६६ | पारोळा | १८१ |
| चोपडा | ५८८ | रावेर | २८९ |
| धरणगाव | ३२० | यावल | १,२२७ |

एकूण १०,३१६

लोकमत

# केळी पीक विम्याबाबत थांबलेली पडताळणी पुन्हा केली जाणार!

## आता 'सॅटेलाइट'द्वारे तपासणी : शेतकऱ्यांची संख्या वाढल्यामुळे शंका वाढली

लोकमत न्यूज नेटवर्क

**जळगाव:** केळी पीक विमा योजने अंतर्गत यंदा जळगाव जिल्ह्यातून विक्रमी १ लाखांहून अधिक शेतकऱ्यांनी विमा काढला आहे. मात्र, या विक्रमी नोंदणीत काही प्रमाणात बोगस विमा काढला असल्याची शक्यता कृषी विभाग आणि विमा कंपनीने वर्तवली आहे. शेतात केळीची लागवड नसतानाही विमा काढल्याची शंका असल्याने, विमा काढणाऱ्या शेतकऱ्यांची पडताळणी पुन्हा सुरू होणार आहे.

डिसेंबर महिन्यात कृषी आयुक्तालयाच्या पथकाने काही तालुक्यांमध्ये प्रत्यक्ष शेतात जाऊन पडताळणी मोहीम राबवली होती.

### 'एमआरसॅक' तंत्रज्ञानाचा घेणार आधार

यंदाची पडताळणी ही केवळ कागदोपत्री नसून ती आधुनिक 'एमआरसॅक' उपग्रह तंत्रज्ञानाच्या आधारावर केली जाणार आहे. यामुळे ज्या शेतकऱ्यांनी शेतात प्रत्यक्षात केळी नसताना केवळ कागदोपत्री विमा भरला आहे, त्यांचे बिंग फुटणार आहे. तसेच, काही शेतकऱ्यांनी एकाच गटात ४ हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्रावर विमा काढल्याने संशय अधिक बळावला आहे.



### यंदा अपात्रचा आकडा वाढणार

काही कारणास्तव थांबलेली ही मोहीम आता पुन्हा नव्याने सुरू केली जाणार असल्याची माहिती कृषी विभागाच्या सूत्रांनी दिली आहे. गेल्या हंगामात ५ ते ८ हजार शेतकरी अपात्र ठरले होते, मात्र यंदा हा आकडा दुपटीने म्हणजेच १० हजारांपर्यंत जाण्याची भीती व्यक्त होत आहे.

### बोगसगिरी रोखण्यासाठी कृषी विभाग आक्रमक

१ जिल्हा कृषी अधीक्षक कुर्बान तडवी यांच्याशी या संदर्भात संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता तो होऊ शकला नाही.

२ मात्र, कृषी विभागातील सूत्रांनुसार, खऱ्या आणि गरजू शेतकऱ्यांना विम्याचा लाभ मिळावा आणि सरकारी निधीचा अपव्यय थांबावा, यासाठी ही विशेष तपासणी मोहीम राबवण्यात येणार आहे.

३ चुकीची माहिती देऊन विमा हप्ता भरणाऱ्यांचे विमा अर्ज बाद केले जाणार आहेत.

Jalgaon Main
Page No. 2 Jan 22, 2026
Powered by: erelego.com

लोकमत

मस्ट READ

# मृत व्यक्ती जिवंत दाखवून शेतजमीन लाटली

## यावलमध्ये ३ हेक्टरहून अधिक जमिनीचा बनावट दस्तऐवज घोटाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

**यावल :** मृत व्यक्तीच्या नावाने बनावट कागदपत्रे तयार करून त्याला जिवंत असल्याचे भासवत तब्बल ३ हेक्टर १९ आर शेतजमिनीची परस्पर विक्री केल्याचा धक्कादायक प्रकार यावल तालुक्यात उघडकीस आला आहे. या प्रकरणी जालन्याच्या एका महिलेने दिलेल्या तक्रारीवरून अंबरनाथ, नवी मुंबई, वसई आणि यावल येथील एकूण १२ जणांविरुद्ध यावल पोलिस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा मंगळवारी रात्री दाखल झाला आहे.

फिर्यादी कांचन संजय खत्री (वय ५२, रा. जालना) यांचे काका गेलाराम भुरोमल यांच्या नावे बोरावल खुर्द शिवारात गट क्रमांक १९३ मध्ये शेतजमीन होती. गेलाराम भुरोमल यांचे १ जानेवारी १९९५ रोजी निधन झाले होते. मात्र, आरोपींनी मृत व्यक्तीच्या नावाचा गैरवापर करत हा घोटाळा रचल्याचे तक्रारीत नमूद आहे. तक्रारीनुसार, आरोपी अजित तुळशीराम भंडारी (रा. अंबरनाथ) याने श्याम मनोहर मुंदडा (रा. वसई) याला बनावट 'गेलाराम' म्हणून दुय्यम निबंधक कार्यालयात उभे केले. त्यासाठी बनावट आधार कार्ड व पॅनकार्ड तयार करून सदर शेतजमीन अवघ्या ११ लाख १५ हजार रुपयांत विक्री केल्याचा आरोप आहे.

### बनावट खरेदीखताच्या आधारावर जमिनीचे केले तुकडे

बनावट खरेदीखताच्या आधारे आरोपींनी जमिनीचे दोन तुकडे केले. त्यापैकी १ हेक्टर ४५ आर जमीन सकूबाई दशरथ धनगर हिच्या नावावर, तर उर्वरित १ हेक्टर ७४ आर जमीन प्रशांत वसंतराव पाटील याने स्वतःच्या नावावर करून घेतली. या व्यवहारात नवी मुंबई व विरार येथील काही आरोपींनी खोटे साक्षीदार म्हणून स्वाक्षऱ्या केल्याचा आरोप आहे. स्थानिक स्तरावरील काही व्यक्तींनी जमीन मालकीची खातरजमा न करता संगनमताने भूमिका बजावल्याचे तक्रारीत नमूद आहे.

### यावल पोलिस ठाण्यात बारा जणांवर गुन्हा दाखल

या प्रकरणी यावल पोलिस ठाण्यात अजित भंडारी (रा. ठाणे), श्याम मुंदडा (रा. पालघर), सचिन राऊत (रा. नवी मुंबई), उमेश कदम (वय ४१), सकूबाई धनगर, शांताराम धनगर, रवींद्र धनगर, ईश्वर पाटील, दिलीप धनगर (सर्व रा. बोरावल खुर्द, ता. यावल), प्रशांत पाटील, किशोर माळी व शेख युसूफ शेख फारुख (तिघे रा. यावल) अशा १२ जणांविरुद्ध फसवणुकीसह संबंधित कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिस निरीक्षक रंगनाथ धारबळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक अनिल महाजन हे या प्रकरणाचा सखोल तपास करीत असून, बनावट कागदपत्रे, आर्थिक व्यवहार आणि इतर संबंधित बाबींची चौकशी सुरू आहे.

लोकमत

# विविध योजनांचा लाभ मिळत नसल्याची तक्रार

लोकमत न्यूज नेटवर्क

**अमळनेर :** केंद्र व राज्य सरकारच्या घरकूल योजनेसह विविध सामाजिक व कृषी योजनांचा लाभ लाभार्थ्यांना वेळेत मिळत नसल्याबाबत क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या वतीने अमळनेर प्रांताधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.

केंद्र व राज्य शासनांतर्गत राबविण्यात येणाऱ्या घरकूल योजना तसेच विधवा, परित्यक्ता, ज्येष्ठ महिला व पुरुषांसाठी सुरू असलेल्या संजय गांधी योजना, श्रावण बाळ योजना व इंदिरा गांधी योजना यांचा लाभ अनेक पात्र लाभार्थ्यांना मिळालेला नाही. तसेच शेतकऱ्यांना झालेल्या पीक नुकसानीबाबत शासनाने पीक विमा व नैसर्गिक आपत्ती अनुदान वेळेत का दिले नाही, असा सवालही निवेदनात उपस्थित करण्यात आला आहे.

**१४८**
गोठाशेडची कामे अमळनेर तालुक्यात सुरु आहेत.

महात्मा गांधी रोजगार हमी योजनेंतर्गत सिंचन विहिरी (२७३), गोठा शेड (१४८), शोषखड्डे (२७) व घरकूल (३८१७) या कामांसाठी कुशल व अकुशल मजुरीचे अनुदान संबंधित लाभार्थ्यांना पूर्णतः व वेळेत मिळालेले नाही.



## योजनांचा लाभ नसल्याने उपासमारीची वेळ

संजय गांधी योजना, श्रावण बाळ योजना व इंदिरा गांधी योजनेच्या हजारो लाभार्थ्यांना डीबीटी प्रणालीच्या नावाखाली लाभापासून वंचित ठेवण्यात आले असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.

**हे लाभार्थी हे बहुतांशी शेतमजूर वर्गातील असून, लाभ न मिळाल्याने त्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न गंभीर बनला आहे. त्यामुळे सर्व पात्र लाभार्थ्यांना तत्काळ योजनांचा लाभ देण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.**

निवेदनावर जिल्हाध्यक्ष शरद पाटील, उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष ईश्वर पाटील, उपाध्यक्ष दिलीप पाटील यांच्यासह संघटनेच्या पदाधिकाऱ्यांच्या सह्या आहेत.

लोकमत

# केळी पीक विम्याबाबत थांबलेली पडताळणी पुन्हा केली जाणार!

## आता 'सॅटेलाइट'द्वारे तपासणी : शेतकऱ्यांची संख्या वाढल्यामुळे शंका वाढली

लोकमत न्यूज नेटवर्क

जळगाव: केळी पीक विमा योजने अंतर्गत यंदा जळगाव जिल्ह्यातून विक्रमी १ लाखांहून अधिक शेतकऱ्यांनी विमा काढला आहे. मात्र, या विक्रमी नोंदणीत काही प्रमाणात बोगस विमा काढला असल्याची शक्यता कृषी विभाग आणि विमा कंपनीने वर्तवली आहे. शेतात केळीची लागवड नसतानाही विमा काढल्याची शंका असल्याने, विमा काढणाऱ्या शेतकऱ्यांची पडताळणी पुन्हा सुरू होणार आहे.

डिसेंबर महिन्यात कृषी आयुक्तालयाच्या पथकाने काही तालुक्यांमध्ये प्रत्यक्ष शेतात जाऊन पडताळणी मोहीम राबवली होती.

### 'एमआरसॅक' तंत्रज्ञानाचा घेणार आधार

यंदाची पडताळणी ही केवळ कागदोपत्री नसून ती आधुनिक 'एमआरसॅक' उपग्रह तंत्रज्ञानाच्या आधारावर केली जाणार आहे. यामुळे ज्या शेतकऱ्यांनी शेतात प्रत्यक्षात केळी नसताना केवळ कागदोपत्री विमा भरला आहे, त्यांचे बिंग फुटणार आहे. तसेच, काही शेतकऱ्यांनी एकाच गटात ४ हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्रावर विमा काढल्याने संशय अधिक बळावला आहे.



### यंदा अपात्रचा आकडा वाढणार

काही कारणास्तव थांबलेली ही मोहीम आता पुन्हा नव्याने सुरू केली जाणार असल्याची माहिती कृषी विभागाच्या सूत्रांनी दिली आहे. गेल्या हंगामात ५ ते ८ हजार शेतकरी अपात्र ठरले होते, मात्र यंदा हा आकडा दुपटीने म्हणजेच १० हजारांपर्यंत जाण्याची भीती व्यक्त होत आहे.

### बोगसगिरी रोखण्यासाठी कृषी विभाग आक्रमक

१ जिल्हा कृषी अधीक्षक कुर्बान तडवी यांच्याशी या संदर्भात संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता तो होऊ शकला नाही.

२ मात्र, कृषी विभागातील सूत्रांनुसार, खऱ्या आणि गरजू शेतकऱ्यांना विम्याचा लाभ मिळावा आणि सरकारी निधीचा अपव्यय थांबावा, यासाठी ही विशेष तपासणी मोहीम राबवण्यात येणार आहे.

३ चुकीची माहिती देऊन विमा हप्ता भरणाऱ्यांचे विमा अर्ज बाद केले जाणार आहेत.

लोकमत

# शिधापत्रिकांचे शुद्धीकरण; १० हजार संशयास्पद लाभार्थ्यांची नावे जाणार!

## 'मिशन सुधार अभियान' मध्ये आधार क्रमांक आणि तांत्रिक माहितीच्या आधारे पडताळणी

लोकमत न्यूज नेटवर्क

जळगाव : शासनाकडून 'मिशन सुधार अभियान' हाती घेण्यात आले आहे. या अभियानांतर्गत आता शिधापत्रिकांचे शुद्धीकरण करण्यात येत असून, जिल्ह्यातील सुमारे १० हजार संशयास्पद लाभार्थ्यांची नावे यादीतून वगळण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. आधार क्रमांक आणि तांत्रिक माहितीच्या आधारे ही पडताळणी केली जात असून, यामुळे खऱ्या गरजूंना धान्याचा लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

अंत्योदय, प्राधान्य कुटुंबासह विविध गटातील शिधापत्रिकाधारकांना राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेंतर्गत धान्याचा लाभ दिला जात आहे. परंतु, बऱ्याच ठिकाणी शिधापत्रिकेचा गैरवापर होत असल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे या गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी मयत, दुबार आणि स्थलांतरित लाभार्थ्यांची पडताळणी केली जात आहे. पडताळणीअंती शिक्कामोर्तब झाल्यानंतर संबंधितांचे रेशन कार्ड रद्द ठरविण्यात येत आहे.




### .. यांच्या नावावर फुली

निधन झाल्यानंतरही नाव कमी न केलेल्या, एकापेक्षा जास्त शिधापत्रिकेत नाव असलेल्या आणि माहितीमध्ये तफावत असलेले किंवा बोगस कागदपत्रे असलेल्यांची रेशन कार्ड रद्द करण्यात येत आहेत.

### अनेकांवर गंडांतर

जिल्ह्यात सुमारे १० हजार लाभार्थी संशयास्पद आढळले आहेत. या सर्वांची पडताळणी सुरू असून, निकषात न बसणाऱ्यांची नावे कायमची वगळली जाणार आहेत. यामुळे सरकारी धान्याची होणारी चोरी थांबणार आहे.

### घरोघरी तपासणी सुरू

संशयास्पद नावांची यादी घेऊन पुरवठा निरीक्षक आणि कर्मचारी हे थेट लाभार्थ्यांच्या घरी जाऊन पाहणी करीत आहेत. सदस्यांची संख्या व कागदपत्रांची खातरजमा केली जात आहे.

### आधार क्रमांकाचा आधार

हे शुद्धीकरण पूर्णपणे तंत्रज्ञानावर आधारित आहे. शिधापत्रिकेला लिंक असलेला आधार क्रमांक आणि 'ई-पॉस' (E-PoS) मशिनमधील डेटा यांचा वापर करून ही संशयास्पद यादी तयार करण्यात आली आहे. 'वन नेशन वन रेशन' अंतर्गत डेटा मॅचिंग केल्यामुळे दुबार नावे सहज समोर येत आहेत.

### अधिकार तहसीलदारांना

पुरवठा निरीक्षकांनी घरोघरी जाऊन अहवाल सादर केल्यानंतर, संबंधित नाव वगळायचे की नाही, याचे अंतिम अधिकार तहसीलदारांना देण्यात आले आहेत. पात्र व्यक्तीवर अन्याय होऊ नये, यासाठी तहसीलदार स्तरावर या अहवालांची छाननी केली जाईल.

> नियमित धान्य वितरणातील पारदर्शकता वाढविण्यासाठी नागरिकांनी तपासणीसाठी येणाऱ्या कर्मचाऱ्यांना योग्य ती माहिती देऊन सहकार्य करावे.
>
> **- रूपेश बिजेवार,** सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी

### अपात्र लाभार्थी असे...

| तालुका | रद्द कार्ड | तालुका | रद्द कार्ड |
|---|---|---|---|
| अमळनेर | ५६३ | एरंडोल | २६४ |
| भडगाव | १७६ | जळगाव | २,५१७ |
| भुसावळ | ४८४ | जामनेर | ९९८ |
| बोदवड | ९१ | मुक्ताईनगर | ४५४ |
| चाळीसगाव | ६६६ | पारोळा | १८१ |
| चोपडा | ५८८ | रावेर | २८९ |
| धरणगाव | ३२० | यावल | १,२२७ |

एकूण १०,३१६

लोकमत

# जळगाव - इंदूर विमानसेवा लवकरच होणार सुरू

## 'फ्लाय ९१' कंपनीकडून हालचालींना वेग

लोकमत न्यूज नेटवर्क

**जळगाव :** मुंबई, पुणे, गोवा आणि हैदराबाद या शहरांनंतर आता जळगाव लवकरच विमानसेवेद्वारे इंदूरशी जोडले जाणार आहे. 'फ्लाय ९१' या विमान कंपनीने या मार्गावर सेवा सुरू करण्यासाठी हालचाली सुरू केल्या आहेत. लवकरच याचे अधिकृत नियोजन पूर्ण होणार आहे.

छत्रपती संभाजीनगर पर्यटन विकास संस्थेच्या नागरी विमान वाहतूक समिती आणि जनसंपर्क समितीचे अध्यक्ष सुनील कोठारी यांनी यासंदर्भात माहिती दिली. जळगाव ते इंदूर या विमानफेरीचे नियोजन अंतिम टप्प्यात आहे.

येत्या काही दिवसांत या सेवेचे वेळापत्रक आणि तिकीट दरांची घोषणा होण्याची शक्यता आहे.

## नाइट लॅण्डिंगचा फायदा

जळगाव विमानतळावर अलीकडेच नाइट लॅण्डिंगसह इतर अत्याधुनिक सुविधा उपलब्ध झाल्या आहेत. या पायाभूत सुविधांमुळे नवीन विमान कंपन्यांना जळगावातून सेवा विस्तारणे सोपे झाले आहे. याच पार्श्वभूमीवर इंदूरची विमानसेवा विनाविलंब सुरू होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

## विकासाला चालना

सध्या जळगावमधून मुंबई, पुणे यासारख्या प्रमुख शहरांसाठी विमानसेवा सुरू असल्याने प्रवाशांचा वेळ वाचत आहे. आता इंदूरशी थेट कनेक्टिव्हिटी मिळाल्यास खान्देश आणि मध्य प्रदेशातील व्यावसायिक संबंध अधिक दृढ होतील. शैक्षणिक, वैद्यकीय आणि व्यापार या तिन्ही दृष्टींने ही सेवा जळगावकरांसाठी मोलाची ठरणार आहे.

दै.तरुण भारत

दि.२२ जानेवारी,२०२६

तरुण भारत
22 Jan 2026 - Page 8
epaper.tarunbharatlive.com

# शेतकऱ्यांनो सावधान! 'ई-पीक पाहणी'साठी उरले फक्त ३ दिवस

## तहसीलदार डॉ. उल्हास देवरे यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**पारोळा, २१ जानेवारी**

रब्बी हंगाम २०२५ ची 'ई-पीक पाहणी' करण्याची अंतिम मुदत आता संपत आली आहे. राज्यात १ डिसेंबर २०२५ पासून रब्बी पीक पाहणीची प्रक्रिया सुरू झाली होती. या प्रक्रियेची अंतिम तारीख २४ जानेवारी २०२६ ही निश्चित करण्यात आली आहे. म्हणजेच शेतकऱ्यांच्या हातात आता केवळ ३ दिवस शिल्लक आहेत.

ज्या शेतकरी बांधवांनी अद्याप आपल्या पिकांची ई-पीक पाहणी केलेली नाही, त्यांनी कोणत्याही तांत्रिक अडचणीची वाट न पाहता आजच ही प्रक्रिया पूर्ण करावी. आपला हक्क सुरक्षित करण्यासाठी ही



शेवटची संधी असल्याचे तहसीलदार डॉ. उल्हास देवरे यांनी प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.

**पीक कर्ज**

बँकेकडून कर्ज घेताना पीक पाहणीचा अहवाल आवश्यक असतो. नैसर्गिक आपत्ती: मदत पिकांचे नुकसान झाल्यास शासकीय मदत मिळवण्यासाठी याची नोंद अनिवार्य आहे. धान्य विक्री : सरकारी खरेदी केंद्रावर धान्य विकण्यासाठी सातबाऱ्यावर पिकाची नोंद असणे आवश्यक आहे.

### पीक पाहणी का महत्त्वाची आहे?

शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी ई-पीक पाहणी हा सर्वात महत्त्वाचा पुरावा मानला जातो. जर शेतकऱ्यांनी वेळेत पीक पाहणी पूर्ण केली नाही, तर त्यांना अडचणींना सामोरे जावे लागू शकते. पीक विम्याचे संरक्षण मिळवण्यासाठी अडचण येऊ शकते.

दै.नवराष्ट्र
दि.२२ जानेवारी,२०२६

नवराष्ट्र Jalgaon | 22 January 2026 | Page 3

# मुदतीत प्रक्रिया न केल्यास अनुदान बंद!

## हयातीचा दाखला ३० जानेवारीपर्यंत देणे अनिवार्य

▶ एरंडोल (वा.) तालुक्यातील राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्ती वेतन योजना आणि इंदिरा गांधी विधवा वेतन योजनेच्या सर्व पात्र लाभार्थ्यांनी २० ते ३० जानेवारी या कालावधीत आपला 'हयातीचा दाखला' सादर करणे बंधनकारक आहे. विहित मुदतीत ही प्रक्रिया पूर्ण न करणाऱ्या लाभार्थ्यांचे अनुदान बंद करण्यात येईल, असा इशारा तहसीलदार गोपाळ पाटील व नायब तहसीलदार अमोल बन यांनी दिला आहे. शासनाने लाभार्थ्यांची गैरसोय टाळण्यासाठी 'बेनेफिशरी सत्यापन' हे नवीन मोबाईल ॲप्लिकेशन विकसित केले आहे. या ॲपमुळे लाभार्थ्यांना आता घरबसल्या किंवा जवळच्या सेतू केंद्रावर किंवा तहसील कार्यालय संजय गांधी निराधार योजना शाखा एरंडोल येथे जाऊन अत्यंत सुलभरीत्या आपली हयातीची नोंद करता येणार आहे. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या निर्णयानुसार, दरवर्षी ही पडताळणी करणे कायदेशीररीत्या आवश्यक आहे. लाभार्थ्यांनी हयातीचे सत्यापन करण्यासाठी अद्ययावत आधार कार्ड व आधार कार्डशी लिंक असलेला मोबाईल क्रमांक आवश्यक आहे. तहसील प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, तालुक्यातील सर्व सेतू चालक आणि सीएससी सेंटर्सनी लाभार्थ्यांना या ॲपद्वारे पडताळणी करून देण्यास सहकार्य करावे.




### लाभार्थ्यांकडून कोणतेही शुल्क नाही

विशेष म्हणजे या कामासाठी लाभार्थ्यांकडून कोणतेही शुल्क आकारू नये, अशा सूचना प्रशासनाकडून देण्यात आल्या आहेत. शासकीय नियमानुसार दरवर्षी हयातीचा दाखला देणे आवश्यक आहे. लाभार्थ्यांनी शेवटच्या तारखेची वाट न पाहता त्वरित आपली नोंदणी पूर्ण करावी, जेणेकरून त्यांचे निवृत्ती वेतन विनाव्यत्यय सुरू राहील, असे आवाहन प्रशासन, तहसील कार्यालय एरंडोल यांनी केले आहे.

**प्रयत्न** ● समृद्धी महामार्ग प्रकल्पात पद्मालयाच्या समावेशाची मागणी

# पर्यटन विकासाचे नवे दालन उघडणार

▸ एरंडोल, (वा.) मुंबई ते नागपूर या समृद्धी महामार्गाला जळगाव शहर जोडण्याच्या नियोजित प्रकल्पात आता 'श्रीक्षेत्र पद्मालय' या तीर्थक्षेत्राचा समावेश करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. नेरी येथून पद्मालय या मार्गाचे अंतर कमी असल्याने हा जोडप्रकल्प साकारल्यास खान्देशातील या जागृत देवस्थानाचा कायापालट होऊन पर्यटनाचे नवे पर्व सुरू होईल असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

पद्मालय हे केवळ श्रद्धास्थान नसून ते जगातील एक अनन्यसाधारण तीर्थक्षेत्र आहे. येथे एकाच पीठावर उजव्या आणि डाव्या सोंडेची गणेश मूर्ती विराजमान आहे. असे दर्शन संपूर्ण जगात अन्य कोठेही उपलब्ध नाही. समृद्धी महामार्गाच्या कनेक्टिव्हिटीमुळे या वैशिष्ट्याचा प्रचार व प्रसार होऊन विदर्भ, मराठवाडा आणि थेट मुंबईपर्यंत होऊन भाविकांच्या संख्येत विक्रमी वाढ होऊन पर्यटन विकासाला चालना मिळेल.



## पर्यटकांसाठी पर्याय...

विशेष म्हणजे शहरी गजबजाटातून बाहेर पडून निसर्गाच्या सानिध्यात वेळ घालवू इच्छिणाऱ्या 'हाय-प्रोफाईल' पर्यटकांसाठी पद्मालय हा उत्तम पर्याय ठरू शकतो. डोंगरमाथ्यावर वसलेले हे स्थळ सृष्टी सौंदर्याने नटलेले आहे.अजिंठा-वेरूळ लेणी पाहण्यासाठी येणाऱ्या परदेशी पर्यटकांनाही हा मार्ग जवळ असल्याने, पद्मालय त्यांच्यासाठी एक प्रमुख आकर्षण ठरू शकते.

## स्थानिक बेरोजगारांना मिळणार रोजगार

परिणामी हॉटेल व्यवसाय, वाहतूक आणि गाईडस अशा विविध माध्यमातून स्थानिक बेरोजगारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. तसेच स्वयंरोजगार, उद्योग व व्यवसाय यांची भरभराट होईल. जळगाव जिल्ह्यातील केंद्रीय मंत्री, राज्यातील मंत्री आणि स्थानिक आमदार अमोल पाटील यांनी शासन स्तरावर पाठपुरावा करून या जोडप्रकल्पात पद्मालयाचा समावेश करावा, अशी आग्रही मागणी भाविक, स्थानिक नागरिक आणि पर्यटकांकडून केली जात आहे. यासाठी लोकप्रतिनिधींनी यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. राजकारण बाजुला सारून हे काम शक्य होईल.

नवराष्ट्र Jalgaon | 22 January 2026 | Page 2

## प्रयत्न ● समृद्धी महामार्ग प्रकल्पात पद्मालयाच्या समावेशाची मागणी

# पर्यटन विकासाचे नवे दालन उघडणार

▶ एरंडोल, (वा.) मुंबई ते नागपूर या समृद्धी महामार्गाला जळगाव शहर जोडण्याच्या नियोजित प्रकल्पात आता 'श्रीक्षेत्र पद्मालय' या तीर्थक्षेत्राचा समावेश करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. नेरी येथून पद्मालय या मार्गाचे अंतर कमी असल्याने हा जोडप्रकल्प साकारल्यास खान्देशातील या जागृत देवस्थानाचा कायापालट होऊन पर्यटनाचे नवे पर्व सुरू होईल असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

पद्मालय हे केवळ श्रद्धास्थान नसून ते जगातील एक अनन्यसाधारण तीर्थक्षेत्र आहे. येथे एकाच पीठावर उजव्या आणि डाव्या सोंडेची गणेश मूर्ती विराजमान आहे. असे दर्शन संपूर्ण जगात अन्य कोठेही उपलब्ध नाही. समृद्धी महामार्गाच्या कनेक्टिव्हिटीमुळे या वैशिष्ट्याचा प्रचार व प्रसार होऊन विदर्भ, मराठवाडा आणि थेट मुंबईपर्यंत होऊन भाविकांच्या संख्येत विक्रमी वाढ होऊन पर्यटन विकासाला चालना मिळेल.



## पर्यटकांसाठी पर्याय...

विशेष म्हणजे शहरी गजबजाटातून बाहेर पडून निसर्गाच्या सानिध्यात वेळ घालवू इच्छिणाऱ्या 'हाय-प्रोफाईल' पर्यटकांसाठी पद्मालय हा उत्तम पर्याय ठरू शकतो. डोंगरमाथ्यावर वसलेले हे स्थळ सृष्टी सौंदर्याने नटलेले आहे.अजिंठा-वेरूळ लेणी पाहण्यासाठी येणाऱ्या परदेशी पर्यटकांनाही हा मार्ग जवळ असल्याने, पद्मालय त्यांच्यासाठी एक प्रमुख आकर्षण ठरू शकते.

## स्थानिक बेरोजगारांना मिळणार रोजगार

परिणामी हॉटेल व्यवसाय, वाहतूक आणि गाईडस अशा विविध माध्यमातून स्थानिक बेरोजगारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. तसेच स्वयंरोजगार, उद्योग व व्यवसाय यांची भरभराट होईल. जळगाव जिल्ह्यातील केंद्रीय मंत्री, राज्यातील मंत्री आणि स्थानिक आमदार अमोल पाटील यांनी शासन स्तरावर पाठपुरावा करून या जोडप्रकल्पात पद्मालयाचा समावेश करावा, अशी आग्रही मागणी भाविक, स्थानिक नागरिक आणि पर्यटकांकडून केली जात आहे. यासाठी लोकप्रतिनिधींनी यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. राजकारण बाजुला सारून हे काम शक्य होईल.

शिल्पकार विकासाचा...
देशदूत
जळगाव आवृत्ती
epaper.deshdoot.com
22 Jan 2026 - Page 3

# पाडळसे मोर नदी पात्रात चार डंपर, एक पोकलँड महसूल विभागाकडून जप्त

यावल । प्रतिनिधी



तालुक्यातील पाडळसे शिवारातील मोर नदीपात्रातून सुरू असलेल्या वाळू उपसा रोखणाऱ्या जागरूक तरुणांनी महसूल विभागाला कळवून रात्रीच्या वेळी होणारी वाहतूक थांबविली व चार डंपर आणि एक पोकलँड यावल तहसीलदार व पथकाने ताब्यात घेतले व त्याच्यावर दंडात्मक कारवाईसाठी यावल तहसील कार्यालयात पाठवण्यात आले आहे यासाठी पोलीस पाटील सुरेश खैरनार यांची महत्त्वाची भूमिका ठरली.

अकलूद ते फैजपूर कारखाना महामार्गाच्या कामासाठी गेल्या महिनाभरापासून मोर नदी पात्रातून वाळूचा उपसा सुरू होता २० तारखेला रात्री दहा वाजेच्या सुमारास पाडळसे येथील तरुणांनी अवैध उपसा करणारे चार डंपर व एक पोकलँड पोलीस पाटील यांच्या स्वाधीन केले आणि पोलीस पाटलांनी तातडीने यावल तहसीलदार यांच्याशी संपर्क साधला व घटनास्थळी सर्कल तलाठी यांचा फौज फाटा या ठिकाणी दाखल झाला व सदरची वाहने महसूल खात्याने ताब्यात घेऊन रात्री उशिरापर्यंत यावल तहसील कार्यालयामध्ये पाठविले या ठिकाणी ग्रामस्थ व अधिकाऱ्यांमध्ये बोला बोली सुद्धा झाली त्यात वातावरण तापले.

सदर कारवाई मध्ये चार डंपर व एक जेसीबी जप्त करण्यात आला असून त्यात डंपर नंबर एम एच १० cy ४१०७ एम एच १९ cy ४१ ०८ एम एच १९ cy ४१ ०५ एम एच १९ cy ३१ ८७ नंबरचे डंपर व विना नंबरची पोकलँड जप्त केले. याकामी तहसीलदार मोहनमाला नाझीरकर निवासी नायब तहसीलदार बी एम पवार सर्कल सचिन जगताप रशीद तडवी दीपक गवई मीना तडवी आणि दहा ते बारा तलाठी व कोतवाल स्टाफनेही कारवाई दि.२० जानेवारी मंगळवार रात्री दहा ते तीन वाजेपर्यंतच्या दरम्यान केली.

यावेळी फैजपूर पोलीस स्टेशनचे पीएसआय सय्यद यांना बोलवून घेण्यात आले होते, या मोठ्या कारवाईमुळे यावल तालुक्यात एकच खळबळ उडाली आहे.

कारवाई संदर्भात तहसीलदार मोहनमाला नाझीरकर यांनी प्रांत अधिकारी फैजपूर विभाग फैजपूर यांच्याकडे सदर वाहनांवर दंडात्मक कारवाईसाठी अवगत केले आहे.

दै.साईमत दि.२२ जानेवारी,२०२६

साईमत

# वीजबिल भरा, नाहीतर अंधारात रहा! महावितरणचा थकबाकीदारांना इशारा

## चार हजार ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित

**जळगाव । प्रतिनिधी**

जळगाव, धुळे व नंदुरबार जिल्ह्यात महावितरणने वीजबिल थकबाकीदारांविरुद्ध धडक मोहीम सुरू आहे. वारंवार आवाहन करूनही बिल भरण्यास प्रतिसाद न देणाऱ्या जवळपास चार हजार ग्राहकांचा वीजपुरवठा चालू महिन्यात खंडित करण्यात आला आहे. थकबाकीदारांनी बिल न भरल्यास त्यांना अंधारात राहण्याची वेळ येणार आहे.

जळगाव परिमंडलात वीजबिलांच्या प्रचंड थकबाकीमुळे महावितरणसमोर अडचणी निर्माण झाल्या आहेत. जळगाव, धुळे व नंदुरबार या तिन्ही जिल्ह्यात कृषी वर्गवारी वगळता महावितरणची ११२९ कोटी २९ लाख रुपयांची थकबाकी आहे. यात जळगाव जिल्ह्यात ५६८ कोटी ६६ लाख, धुळे जिल्ह्यात ३३० कोटी १० लाख व नंदुरबार जिल्ह्यात २३०कोटी ५३लाख रुपयांची थकबाकी आहे. वारंवार आवाहन करूनही अनेक ग्राहकांनी वीजबिल न भरल्याने महावितरणच्या थकबाकीचा आकडा दिवसेंदिवस वाढत आहे.

महावितरणने आता थकबाकीदारांची वीजजोडणी खंडित करण्याची धडक मोहीम सुरू केली आहे. या महिन्यात जळगाव जिल्ह्यातील २११०, धुळे जिल्ह्यातील १०८४ व नंदुरबार जिल्ह्यातील ५३६ ग्राहकांचा वीजपुरवठा तात्पुरता खंडित करण्यात आला




आहे.

महावितरणने ऑनलाइन वीजबिल भरण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. यूपीआय नेट बँकिंग, वॉलेट्स, मोबाईल अॅप्सवरील फोन पे, गुगल पे आणि महावितरणच्या वेबसाइटद्वारे घरबसल्या वीजबिल भरण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. विशेष म्हणजे ऑनलाईन व वेळेत पेमेंट करणाऱ्यांना महावितरणकडून भरघोस सूट दिली जाते.

**कारवाईत अडथळे आणल्यास गुन्हे दाखल होणार**

थकबाकी वसुलीसाठी महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची विशेष स्वतंत्र पथके तैनात करण्यात आली आहेत. काही संवेदनशील भागांत कर्मचाऱ्यांना विरोध होण्याची शक्यता लक्षात घेता, ही कारवाई पोलिस बंदोबस्तात केली जाणार आहे. कोणत्याही प्रकारची गुंडगिरी किंवा राजकीय दबावाला बळी न पडता ही मोहीम अधिक गतिमान केली जाणार असल्याचे सांगण्यात आले. मोहिमेत अडथळा आणणाऱ्यांवर पोलिसांत गुन्हे दाखल करण्याचा इशारा महावितरणने दिला आहे.

**डिस्कनेक्शनचा मन:स्ताप व रिकनेक्शनचा भुर्दंड टाळा**

महावितरणने आपले वीज कनेक्शन तोडण्याची वाट न पाहता ग्राहकांनी चालू महिन्याच्या वीजबिलासह थकबाकीची रक्कम विनाविलंब भरून सहकार्य करावे. थकबाकीसाठी कनेक्शन तोडल्यास बिलाच्या रकमेसह पुनर्जोडणी शुल्क भरावे लागते. सिंगल फेज जोडणीसाठी 310 रुपये तर थ्री फेजजोडणीसाठी 520 रुपये पुनर्जोडणी शुल्क आकारले जाते. हा भुर्दंड टाळण्यासाठी वेळेत वीजबिल भरणे आवश्यक असल्याचे महावितरणने म्हटले आहे.

महावितरणतर्फे सर्व वर्गवारीतील ग्राहकांनी तातडीने थकीत वीजबिल भरणे नियमाने गरजेचे आहे. अन्यथा महावितरणचे कर्मचारी कधीही त्यांच्या घरी जाऊन वीजपुरवठा खंडित करू शकतात. त्यामुळे होणारी गैरसोय टाळण्यासाठी थकित वीजबिल भरून महावितरणला सहकार्य करावे.

आय.ए. मुलाणी, मुख्य अभियंता, महावितरण, जळगाव परिमंडल

# जिल्हा नंदुरबार

**दै.लोकमत** **दि.२२ जानेवारी,२०२६**

लोकमत

# एआयच्या माध्यमातून आदिवासी बोलीभाषा येणार जागतिक पटलावर

## महाराष्ट्रातील पहिलाच प्रयोग; आदिवासी समुदायांना सक्षम करण्यासाठी केला जातोय प्रयत्न

रमाकांत पाटील
लोकमत न्यूज नेटवर्क

**नंदुरबार :** अनादिकाळापासून बोलली जाणारी आदिवासी बोलीभाषा अद्याप पुरेशी लिपीबद्ध झाली नसली तरी ही भाषा आता एआयच्या माध्यमातून डिजिटल होत असून लवकरच ती जागतिक पटलावर पोहोचणार आहे. नंदुरबार जिल्हा प्रशासन व महाराष्ट्र शासनाच्या पुढाकाराने आदिवासी बोलीभाषा एआय प्रकल्प हाती घेण्यात आला असून आतापर्यंत जवळपास ४० हजार वाक्यांचे भाषांतराचे संकलन पूर्ण झाले आहे. पुढील महिन्यात त्याला 'ग्लोबल' स्वरूप देण्याचा प्रयत्न आहे.

सातपुड्यात व परिसरात आदिवासींच्या सुमारे ३१ जमातींचे वास्तव्य आहे. त्यातील सर्वाधिक लोकसंख्या भिल्लांची आहे. या भागात प्रामुख्याने देहवाली भिली, मथवाडी भिली, पावरी आणि मावची या भाषा बहुतांश लोक बोलतात. त्यापैकी देहवाली भिली ही भाषा एआय प्रकल्पासाठी निवडण्यात आली असून आतापर्यंत साधारणतः कृषी व शेतीविषयक संबंधीत ४० हजार वाक्यांचे भाषांतर करून त्याचे संकलन करण्यात आले आहे.

खरे तर आदिवासी बोलीभाषेला लिपीबद्ध करण्यासाठी शासनाने १९९१ मध्ये विचार सुरू केला होता. आदिवासी मुलांना त्यांच्याच बोली भाषेत शिक्षण द्यावे यासाठी बालभारतीने स्वतंत्र पुस्तक तयार केले होते. १९९४ मध्ये प्रत्यक्षात आदिवासी भिलोरी भाषेतील पुस्तक तयार झाले. मात्र, अभ्यासक्रमात ते लागू करण्याबाबत व त्यातील त्रुटी अधिक चर्चेत राहिल्याने तो प्रयोग फसला.



> राज्य शासनाच्या पुढाकाराने आदिवासी भाषांचा एआय प्रणालीमध्ये समावेश केला जात असून त्यासाठी देहवाली भिली भाषेला प्राधान्य दिले आहे. पुढील टप्प्यात या प्रणालीमध्ये टेक्स्ट टू स्पीच (टीटीएस) तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येणार आहे.
>
> **डॉ.मित्ताली सेठी, जिल्हाधिकारी.**

### आता नैसर्गिक संभाषणावर आधारित वाक्यांवर भर...

आता नैसर्गिक संभाषणावर आधारित वाक्यांच्या भाषांतराची प्रक्रिया सुरू आहे. एकूणच आदिवासींच्या व्यवहारात बोलली जाणारी देहवाली बोलीभाषा या प्रकल्पात समाविष्ट करण्यासाठी प्रयत्न सुरू असून साधारणतः फेब्रुवारी महिन्यात त्याला जागतिक पटलावर आणण्याची तयारी सुरू झाली आहे. त्यानुसार आदिवासी भाषाआधारित एआय प्रणालीचे महाविस्तार प्लॅटफार्मशी ते एकत्रीकरण करण्याचे नियोजन सुरू झाले आहे.

**४० हजार** वाक्यांचे आतापर्यंत भाषांतर करण्यात आले आहे. त्यामुळे त्याचे संकलन करून ते एआयच्या वापरात आणले जाणार आहे.

**विविध वाक्यांचे करण्यात आले भाषांतर**

### बोलीभाषा लिपीबद्ध करण्यासाठी झाला प्रयत्न

१. बडोदा येथील भाषा संशोधन केंद्रानेही आदिवासी बोलीभाषेला लिपीबद्ध करण्यासाठी व या भाषेच्या प्रसारासाठी प्रयत्न केले. शासनालाही नंदुरबारसारख्या आदिवासी जिल्ह्यात सातपुड्यातील लोकांमध्ये जनजागृतीसाठी आदिवासी भाषेतील काही चित्रफिती तयार केल्या.

२. आता ही भाषा एआयच्या माध्यमातून डिजिटलायझेशन करण्यासाठी जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी यांनी पुढाकार घेतला. जिल्हा प्रशासनाच्या माध्यमातून त्यांनी स्थानिक बोलीभाषेतील एआय प्रकल्पाचा पहिला प्रयोग सुरू केला.

३. महाराष्ट्र शासनालाही हा उपक्रम स्तुत्य वाटल्याने शासनाने त्याला व्यापक स्वरूप देऊन जागतिक पटलावर ते आणण्याचा निर्णय घेतला आहे. त्याचे काम सुरू झाले आहे. 'कार्या' या संस्थेच्या माध्यमातून हे काम सुरू असून परिसरातील सुमारे ७०० ते ८०० देहवाली भिलीभाषा बोलणारे जाणकार त्यात सहभागी झाले आहेत. आतापर्यंत कृषी व शेती संदर्भातील वाक्यांचे भाषांतर करून ते डिजिटलायझेशन करण्यात आले आहे. त्यामुळे आता त्याबाबत उत्सूकता लागून आहे.



लोकमत

# वातावरणातील बदलामुळे गारठा कमी, रब्बीवर परिणाम

लोकमत न्यूज नेटवर्क

**नंदुरबार :** वातावरणातील बदलामुळे रब्बी हंगामावर परिणाम होण्याची शक्यता आहे. महिनाभरात चारवेळा हवामानात बदल झाला आहे. बुधवारी देखील सकाळपासूनच ढगाळ वातावरण होते. त्यामुळे गारठा काहीसा कमी झाला आहे. आता येत्या काळात थंडीचे प्रमाण कमी होत जाणार असल्याचे कृषी हवामान केंद्रातर्फे स्पष्ट करण्यात आले.

जानेवारी महिन्यात वारंवार वातावरण बदलाचा अनुभव जिल्हावासीय घेत आहेत. ढगाळ वातावरण, तुरळक पावसाच्या सरी, तीव्र गारठा आणि वातावरणातील आर्द्रते वाढ अशा संमिश्र हवामानामुळे रब्ब पिकांवर परिणाम होत आहे. किमा तापमानात देखील वाढ होत आहे. सध्य रब्बी पिकांना गारठ्याची ती आवश्यकता असता गारठा कमी होत आहे.

**४**

वेळा वातावरण चालू महिन्यात बदलले आहे.

बुधवारी सकाळपासूनच ढगा वातावरण होते. गुरुवा आणि शुक्रवारी देखी जिल्ह्यात अंशतः ढगा वातावरण राहणार असल्याचे कृ विज्ञान केंद्राच्या जिल्हा हवामा केंद्रातर्फे स्पष्ट करण्यात आले आ सध्या मात्र रब्बी हंगामातील गहू, हरभ या पिकांना थंडीची आवश्यकता आ परंतु थंडी कमी होत आहे.

लोकमत

# जिल्हा रुग्णालयात आता ब्रेन हेल्थ क्लिनिक सुरू

लोकमत न्यूज नेटवर्क

**नंदुरबार :** नीती आयोगाच्या आकांक्षित जिल्हा उपक्रमांतर्गत शासकीय रुग्णालयात 'ब्रेन हेल्थ क्लिनिक'ची सुरुवात करण्यात आली आहे. यामुळे जिल्ह्यातील संबंधित रुग्णांना धुळे, नाशिक किंवा इतर शहरांत जाण्याची गरज राहणार नाही.

मेंदू संबंधित रुग्णांना उपचारांसाठी इतर शहरात जावे लागत असते. त्यामुळे वेळ व पैसा खर्च करावा लागत असतो. ही बाब लक्षात घेता आकांक्षित जिल्हा उपक्रमांतर्गत नंदुरबारातच अशी सुविधा उपलब्ध करून द्यावी याकरिता प्रयत्न सुरू होते. जिल्हा रुग्णालयात ही सुविधा सुरू करण्यात आली आहे.

मेंदूवरील उपचारासाठी धुळे, नाशिक शासकीय रुग्णालयात जावे लागत होते.

या ब्रेन हेल्थ क्लिनिकचा मुख्य उद्देश हा मेंदू व मानसिक आरोग्याशी संबंधित आजारांचे लवकर निदान व्हावे. वेळेत उपचार मिळावे. रुग्ण व नागरिकांमध्ये मेंदू व मानसिक जनजागृती.

ग्रामीण व आदिवासी भागातील नागरिकांपर्यंत सुलभ, दर्जेदार व समन्वित उपचार सेवा पोहोचविणे. या उपक्रमामुळे मेंदू व मानसिक आरोग्याशी संबंधित आजारांबाबत असलेली भीती, गैरसमज दूर होऊन उपचारासाठी पुढे येण्यास नागरिकांना प्रोत्साहन मिळणार आहे.

या ठिकाणी न्यूरो-रिहॅबिलिटेशन, स्ट्रोक, पार्किंसन, मिर्गी, स्पाइनल इंजरी, ब्रेन इंजरी, मल्टिपल स्क्लेरोसिस, डोकेदुखी, चक्कर येणे, स्मृतीभ्रंश, डिप्रेशन, झोप न येणे, हात-पाय सुन्न होणे, आदी आजारांवर उपचार व पुनर्वसन सेवा राहणार आहे. शिवाय मानसिक आरोग्य वैद्यकीय तपासणी व औषधोपचार. तणाव, चिंता, नैराश्य, भावनिक समस्या यावर समुपदेशनाद्वारे मार्गदर्शन. बोलण्यात अडचण येणाऱ्या रुग्णांसाठी विशेष उपचार. मज्जासंस्था व हालचालींशी संबंधित अडचणींवर फिजिओथेरपी, आदी सुविधा उपलब्ध राहणार आहेत.

जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी व जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. विनय सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली ही सेवा सुरू करण्यात आली आहे. जिल्हा समन्वयक म्हणून ओजस भवसार राहणार आहेत. नंदुरबार जिल्ह्यातील नागरिकांना मेंदू व मानसिक आरोग्याच्या उपचारांसाठी आता जिल्ह्याबाहेर जाण्याची गरज राहणार नाही.

लोकमत
जळगाव, गुरुवार, दि. २२ जानेवारी २०२६

# तीन वर्षांत प्रथमच सोयाबीन पाच हजारी, अजून किती वाढणार भाव?

## सोयाबीनच्या भावात वाढ; पण शेतकऱ्यांची झोळी रिकामीच, बाजार समित्यांमध्ये आवक कमी

लोकमत न्यूज नेटवर्क

**नंदुरबार :** गेल्या तीन ते साडेतीन वर्षांपासून मंदीच्या गर्तेत अडकलेल्या सोयाबीन दराने अखेर नंदुरबारच्या बाजारपेठेत उभारी घेतल्याचे पहायला मिळत आहे. सोयाबीनचे दर थेट ५,००० रुपये प्रतिक्विंटलपर्यंत पोहोचल्याने बाजारपेठेत चैतन्याचे वातावरण आहे. मात्र, या दरवाढीचा आनंद साजरा करावा की दुःख, अशा द्विधा मनःस्थितीत इथला शेतकरी अडकला आहे. याचे मुख्य कारण म्हणजे, अनेक शेतकऱ्यांनी आपला माल यापूर्वीच कमी दरात विकून टाकला आहे.

नंदुरबार जिल्ह्यात खरीप हंगामात पेरणी केलेल्या बहुतांश सोयाबीनला अतीवृष्टीचा फटका बसला होता. यातून मालाची प्रत खालावली होती. परिणामी शेतकऱ्यांनी मिळेल त्या दरात सोयाबीनची विक्री केली होती. नंदुरबार व शहादा या प्रमुख दोन बाजार समित्यांमध्ये सोयाबीनची प्रामुख्याने विक्री करण्यात येते. गेल्या काही दिवसांपासून नंदुरबार बाजारात सोयाबीनला प्रतिक्विंटल ४ हजार २०० ते ५ हजार २०४ रुपयांचा दर मिळत आहे. चांगल्या प्रतीचा सोयाबीन असल्यास त्याला पाच हजारांचा भाव मिळत आहे. गेल्या तीन वर्षांतील हे सर्वाधिक दर असल्याची माहिती शेतकरी देत आहेत. ज्यांच्याकडे सोयाबीन शिल्लक होता, त्यांनी माल बाजारात आणून विक्री केली होती. आठवडाभरापासून सोयाबीन तेलाच्या किमतीत वाढ झाली आहे, तर दुसरीकडे बाजारात सोयाबीनची आवक मंदावली आहे. त्यामुळे पुढील काही दिवस सोयाबीनच्या दरात तेजी राहण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.



### नाफेड आणि खासगी व्यापाऱ्यांचा काय भाव ?

शासनाने सोयाबीनचा हमीभाव ५ हजार ३२८ रुपये जाहीर केला. तर, खासगी व्यापाऱ्यांकडे सोयाबीनला सध्या ५ हजार रुपयांपर्यंत भाव मिळत आहे. येणाऱ्या दिवसांत भाव वाढण्याची शक्यता वर्तविली जात आहे. जिल्ह्यात खरीप हंगामातील बहुतांश सोयाबीनची विक्री झाली आहे. नाफेडच्या खरेदी केंद्रापेक्षा शेतकऱ्यांनी खासगी व्यापाऱ्यांना सोयाबीन दिला आहे.

### ७५ टक्के शेतकऱ्यांकडील माल आधीच संपला

जिल्ह्यातील शेतकऱ्यांकडे सोयाबीन उपलब्ध होऊन सुमारे दोन महिने उलटले. आज-उद्या भाव वाढतील, या आशेवर शेतकऱ्यांनी प्रतीक्षा केली. मात्र, भाव वाढत नसल्याने जवळपास ७५ टक्के शेतकऱ्यांनी सोयाबीन विक्री केली. आता भाव वधारले असले, तरी याचा शेतकऱ्यांना लाभ होत नसल्याचे चित्र आहे. नंदुरबार कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मोंढ्यात १५ दिवसांत क्विंटलमागे ३०० ते ४०० रुपयांची भाववाढ झाली आहे. सध्या मोंढ्यात सरासरी ४ हजार ४०० ते ५ हजार २०५ रुपयांपर्यंत भाव मिळत आहे.

**५ हजार**

२०५ रुपये प्रतिक्विंटल दरापर्यंत सध्या बाजारात सोयाबीनची खरेदी व्यापारी करत आहेत. एफक्यू दर्जाचा सोयाबीन सध्या व्यापाऱ्यांची पहिली पसंती ठरत आहे.

**चांगल्या प्रतीचा माल खरेदी करण्यास पसंती**

### ५ हजार ५०० रुपयांचा टप्पा गाठण्याची शक्यता

१. सोयाबीन हे नंदुरबार जिल्ह्यातील मुख्य नगदी पीक आहे. मागील तीन वर्षांपासून भाव ३,८०० ते ४,२०० रुपयांच्या दरम्यान रेंगाळत होते. उत्पादन खर्चही निघणे कठीण झाल्याने अनेक अल्पभूधारक शेतकरी कर्जबाजारी झाले होते.

२. घरची हालाखीची स्थिती, मुलांचे शिक्षण आणि पुढील हंगामाच्या तयारीसाठी पैशांची निकड असल्याने बहुतांश शेतकऱ्यांनी ३,८०० ते ४,२०० रुपये दर असतानाच सोयाबीनची विक्री केली. आता याच दरात एक हजार रुपयांची वाढ झाली आहे. हे दर येत्या काळात वाढण्याची चिन्हे आहेत.

३. नंदुरबारातील प्रमुख व्यापाऱ्यांच्या मते, जागतिक बाजारपेठेतील घडामोडी आणि पुरवठ्यातील घट पाहता, येत्या काही दिवसांत सोयाबीनचे दर ५,५०० रुपयांच्या वर जाण्याची दाट शक्यता आहे. सोयाबीनची आवक मर्यादित असून, मागणी मात्र वाढलेली आहे. मंदीचे सावट दूर झाल्याने व्यापाऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण असले, तरी मालाचे प्रमाण अपेक्षेपेक्षा कमी आहे.

### भाववाढीमागे कारणे काय?

आंतरराष्ट्रीय बाजारात पामतेलाच्या किमती वाढल्यास, तेलाची मागणी सोयाबीनकडे वळते, ज्यामुळे सोयाबीनच्या भावांना आधार मिळतो. शिवाय जास्त पाऊस, दुष्काळ किंवा किडींचा प्रादुर्भाव यामुळे सोयाबीनच्या पिकाचे उत्पादन घटते, ज्यामुळे पुरवठा कमी होऊन भाव वाढण्यास मदत होते.